





# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार ८ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०








## 60 टक्क्यांहून अधिक मतदान म्हणजे NDA ची सत्ता परतणार

### ■ बिहारबाबत अमित शाहांचा दावा ■

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर, आता दुस-या टप्प्यातील मतदानावर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. मात्र, पहिल्या टप्प्यातील मतदानच्या टक्केवारीवरुन राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. टक्केवारी



वाढल्यामुळे एकीकडे विरोधक विजयाचा दावा करत आहेत, तर दुसरीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बहुमताने विजयाचा दावा केला आहे. अमित शाह यांनी आजतकशी संवादात सांगितले की, ही निवडणूक एकतर्फा आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) प्रचंड बहुमताने सत्तेत पुनरागम करणार आहे. याबाबत माज्या मनात कोणतीही शंका नाही की, NDA 160 पेक्षा जास्त जागा जिंकून दोन-तृतीयांश बहुमतासह सत्ता स्तापन करेल. सीमांचल प्रदेशातील किशनगंज, अररिया, कटिहार आणि पूर्णिया या जिल्ह्यांमध्ये झालेल्या मोठ्या मतदानाचा हवाला देत शाह म्हणाले की, महिला, युवक, शेतकरी आणि कामगार सर्वच घटक NDA च्या बाजूने मतदान करत आहेत. शाह पुढे म्हणाले, या निवडणुकीत ६० टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे आणि हा आकडा NDA च्या परतीचा स्पष्ट संकेत देतो. जनतेला नितीश कुमार आणि नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास आहे. विकासावरच हे मतदान झाले आहे. राजदच्या रोजगाराच्या आश्वासनांवर प्रतिक्रिया देताना शाह म्हणाले, ज्यांची सरकार बनण्याची शक्यता नाही, त्यांच्या आश्वासनांना कोण ऐकेल? आश्वासन त्यांचेच ऐकले जाते, जो सत्तेत येणार आहे, असा दावा त्यांनी केला.

## 'टेस्ला'चे मस्क ठरतील जगातील पहिले खर्वाधिश

**न्यू यॉर्क/ वृत्तसंस्था-**जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि टेस्लाचे सीईओ एलन मस्क यांनी आणखी एक विक्रम स्थापित



केला आहे. टेस्लाच्या भागधारकांनी मस्क यांच्यासाठी विक्रमी १ ट्रिलियन डॉलर (सुमारे ८८ लाख कोटी रुपये किंवा त्याहून अधिक) पगार पॅकेजला मंजुरी दिली आहे. या पॅकेजमधील एक दिवसाची रक्कम सुमारे २४ हजार कोटी रुपये ( २४०,०००,०००,०००) इतकी होते, जे कोणत्याही कार्पोरेट लीडरला दिले गेलेले आतापर्यंतचे सर्वात मोठे पेमेंट आहे.कंपनीने आपल्या वार्षिक बैठकीत सांगितले की, मतदान करणा-या ७५% हून अधिक भागधारकांनी या अभूतपूर्व वेतन योजनेच्या बाजूने मतदान केले. यापूर्वी, जर त्यांना हे पॅकेज मिळाले नाही, तर आपण कंपनी सोडून देउ, अशी धमकी मस्क यांनी दिली होती. मस्क यांना हा मोठा पगार पॅकेज इतक्या सहजासहजी मिळणार नाही. त्यासाठी त्यांना पुढील दशकात कामगिरीचे अनेक मोठे लक्ष्य पूर्ण करावे लागतील. यामध्ये १० वर्षांत २ कोटी (२० दशलक्ष) गाड्यांची डिलिव्हरी करणे समाविष्ट आहे. ही संख्या मागील १२ वर्षांत टेस्लाने तयार केलेल्या गाड्यांच्या संख्येच्या दुप्पटहून अधिक आहे. याव्यतिरिक्त, त्यांना कंपनीचे बाजार मूल्य आणि ऑपरेटिंग नफा वाढवावा लागेल. तसेच, १० लाख (१ दशलक्ष) रोबोट्सच्या डिलिव्हरीवर लक्ष ठेवावे लागेल उल्लेखनिय म्हणजे टेस्लाने अद्याप कोणताही रोबोट वितरित केलेला नाही.

## बेकायदा बांधकामांबाबत राज्यातील सर्वच महापालिका निद्रावस्थेत

### उच्च न्यायालयाचे ताशेरे

**मुंबई** : राज्यभरातील वाढत्या बेकायदा बांधकामांबाबत उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा संताप व्यक्त केला. तसेच ही समस्या वाढत असताना राज्यातील महापालिका प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचे



ताशेरेही न्यायालयाने ओढले.पोलिस ठाण्यासाठी तसेच कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामासाठी राखीव असलेल्या जागेवरील अतिक्रमणांविरुद्ध कारवाई न करणा-या मालेगाव महानगरपालिकेच्या निष्क्रियतेवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने बोट ठेवताना राज्यभरातील बेकायदा बांधकामांना अभय देणा-या महापालिकांच्या भूमिकेबाबत संताप व्यक्त केला. या बेकायदा अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे आदेश दिले गेले होते.

तथापि, बेकायदा बांधकामे हटवण्याबाबतच्या तक्रारींवर कारवाई केली न जाणे यातून मालेगाव महानगरपालिकेची (पान २ वर)

# पार्थ पवार भूखंड प्रकरणाचा व्यवहार रद्द

## अजित पवार म्हणाले, 'मी मुख्यमंत्री फडणवीसांना कॉल केला

**मुंबई/प्रतिनिधी :** 'मी आधीच सांगितलं आहे की, मला या व्यवहाराबद्दल माहिती नव्हतं. याची चर्चा सुरू झाल्यानंतर मी मुख्यमंत्र्यांना कॉल केला होता. त्यांना सांगितलं की, तुम्ही राज्याचे प्रमुख म्हणून तुम्हाला चौकशी करायची असेल, समिती नेमायची असेल; त्या सगळ्या गोष्टींना माझा पाठिंबा आहे', असे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जमीन व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती दिली. या प्रकरणात एका पैशाचाही व्यवहार झालेला नव्हता, असा खुलासाही त्यांनी केला. अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, 'मी आधीच स्पष्टपणे सांगितलं होतं की, मी आजपर्यंतच्या जीवनात नियम सोडून काम केलेलं नाही. माझ्यावर आधी आरोप झाले, त्यात अनियमितता होती. पण, काही सिद्ध झाले नाही', असे सिंचन घोटाळ्याबद्दल बोलले.'

'या व्यवहाराबद्दल मला अजिबात काही माहिती नव्हतं. माहिती असतं, तर मी सांगितलं असतं की, मला माहिती आहे. या व्यवहाराबद्दल चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली. त्यावेळी आपले मुख्यमंत्री नागपूरला होते. त्यावेळी मी त्यांच्याशी फोनवरून संपर्क केला. मी त्यांना सांगितलं की, जरी माझ्या घरच्यांशी संबंधित असणारा हा विषय असला, तरी तुम्ही राज्याचे प्रमुख




आहात. तुम्हाला जे काही नियमाप्रमाणे करावे लागेल, चौकशी करायची असेल. माझा त्या गोष्टीला पाठिंबाच राहील', अशी माहिती अजित पवारांनी दिली. 'आरोप करणं सोप्पं असतं. पण, आरोपातील तथ्य जनतेला कळणंही तितकंच महत्त्वाचं असतं. याबद्दलची माहिती घेतल्यानंतर या व्यवहारात एक रुपयाही दिला गेला नाहीये. तरी मोठंमोठे आकडे सांगितले गेले. विरोधकांनीही आम्हाला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला. साहजिकच आहे विरोधकांचा तो अधिकार आहे', असेही अजित पवार म्हणाले. 'मला आज संध्याकाळी कळालं की, या व्यवहाराबद्दल जे कागदपत्रे झाली होती, ती रद्द करण्यात आली आहे. जो व्यवहार झाला होता, तो रद्द करण्यात आला आहे', अशी माहिती अजित पवार यांनी दिली.

## सरकार कुणालाही पाठीशी घालणार नाही, अहवालात जो दोषी आढळेल त्याच्यावर कारवाई

**नागपूर/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीला अठराशे कोटींची जमीन तीनशे कोटींत मिळाल्याच्या प्रकरणाची



सखोल चौकशी सुरू आहे. या प्रकरणात सरकारला काहीही लपवायचे नाही व कुणालाही पाठीशी घालणार नाही. चौकशी समितीच्या अहवालात जो दोषी आढळेल त्याच्यावर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. नागपुरात शुक्रवारी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.या प्रकरणाबाबत सरकार गंभीर आहे. अहवालात जो कोणी दोषी आढळेल त्याच्यावर कारवाई होईल. उपमुख्यमंत्री अजित पवारदेखील माझ्या या मताशी सहमत असतील. आम्ही एकाही मिनिटाची प्रतिक्षा न करता संबंधित अधिका-यांना निलंबित केले व गुन्हे दाखल केले. या प्रकरणात अनियमितता करणा-यांवर कारवाई करण्यात येईल. चौकशी समितीदेखील सखोल तपास करत आहे. याची व्याप्ती किती आहे व आणखी कोण सहभागी आहे याची माहिती यातून समोर येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. माझ्याकडे (पान २ वर)

## पुणे जमीन प्रकरणाच्या चौकशीसाठी खारगे समिती नियुक्त

### एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्याशी संबंधित कंपनीच्या जमीन व्यवहाराची चौकशी करण्यासाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली



पाच सदस्यांची चौकशी समिती सरकारने स्थापन केली आहे. यासंदर्भातील शासन आदेश शुक्रवारी जारी झाला. या समितीला एक महिन्यात अहवाल द्यायचा आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार भागीदार असलेल्या अमेडिया होल्डिंग्स एलएलपी या कंपनीने पुण्यातील १८०० कोटींची जमीन ३०० कोटींना खरेदी केल्याचा आरोप आहे. सदरची जमीन महार वतन जमीन (पान २ वर)

## माझी आणि जरांगेंची नार्को टेस्ट करा

### जरांगेंच्या आरोपांवर धनंजय मुंडेंचे प्रत्युत्तर

**परळी/प्रतिनिधी :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार गट)नेते धनंजय मुंडे यांवर हत्येचा कट रचल्याचा गंभीर आरोप केला आहे. या आरोपांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, या आरोपांना उत्तर देण्यासाठी धनंजय मुंडेंनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी जरांगेंचे आरोप फेटाळले आणि नार्कोटेस्टची मागणी केली.



यावेळी मुंडे म्हणाले, जरांगे ऑन एअर म्हणतात, मला संपवून टाकतील. या विधानानंतर राज्यात कायदा आणि सुव्यवस्था आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. गेली ३० वर्ष मी सामाजिक आणि राजकीय जीवनात आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे आणि अण्णांनी जात पात पाहायची नाही असे शिकवले. मी आजवर कधीही जात पाहून काम केले नाही. माझे जीवन आणि मरण हे गरीबातील गरीब माणसाला मोठे करण्यासाठी आहे. जरांगेंचे आता अति होत आहे. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी मी मुख्यमंत्र्यांकडे करणार आहे. याशिवाय, माझी आणि जरांगेंची ब्रेन मॅपिंग, नार्को टेस्ट करावी, असेही मुंडेंनी यावेळी म्हटले.

निवडणुकीच्या तोंडावर काही तरी नावे घेतात. मी दर सोमवारी गेस्ट हाउसला बसतो. अनेक लोक येउन भेटतात. अटक केलेल्यांपैकी कुणी भेटले असेल, बाजूला जाउन बोलले असेल. मी सामान्य सरळ माणूस आहे. भेटल्याने आणि बाजूला बोलल्याने मला कळत नाही यात कसला कट रचला जातो. अटक झालेले कार्यकर्ते त्यांचेच. बोलणारे कार्यकर्ते त्यांचेच, कबुली जबाब देणारे त्यांचेच. आरोप मात्र माझ्यावर करत आहेत. माझ्या जीवनात मर्डरर म्हणून माझी ईमेज केली जात आहे असा दावाही त्यांनी यावेळी केला. मुंडे पुढे म्हणाले, मी स्वतः नेहमी मराठा समाजाच्या मागण्यांना समर्थन देत आलो आहेत. मी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सातत्याने आवाज उठवला आहे. विरोधी पक्षनेता असताना मी आंदोलनांचे समर्थन केलो. नगरमधील बलात्कार प्रकरणात मी स्वतः जाउन आरोपीला पकडून दिले होते. जरांगेंना वाटते की, धनंजय मुंडे हा व्यक्ती पृथ्वीवरच नसावा. समाजात जातीय फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे असा आरोपही त्यांनी केला.

**सत्य बाहेर येउ द्या :** मुंडे मी जातपातीत अडकलेलो नाही. माझे सर्व स्तरांतील मित्र आहेत. पण काही लोकांना माझा सामाजिक आणि राजकीय प्रभाव आवडत नाही. म्हणूनच मला लक्ष्य केले जात आहे. मी १७ तारखेला सभेत जरांगे यांना दोन प्रश्न विचारले, मराठा समाजाला ओबीसीत फायदा आहे की ईडब्ल्यूएस मध्ये? यावर चर्चा करूया, पण अजून उत्तर नाही. महाराष्ट्राच्या जनतेसमोर एकदा खुली चर्चा होउ द्या. सत्य बाहेर येउ द्या, असे जाहीर आव्हान त्यांनी यावेळी जरांगेंना दिले.

## माझ्या नव-याला दारू पाजून जरांगे विरुद्ध षडयंत्र रचले

### *अमोल खुणेच्या बायको, आईने हंबरडा फोडला*

**जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेत



माजी मंत्री तथा राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. माझ्या हत्येचा कट धनंजय मुंडेंच्या सांगण्यावरुनच रचण्यात आल्याचे जरांगे यांनी म्हटले आहे. यामुळे सबंध राज्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी गेवराई येथून जालना पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. गेवराई तालुक्यातील धानोरा येथील अमोल खुणे यांचा या अटकेत समावेश आहे. याबाबत अमोल खुणेच्या पत्नीने प्रतिक्रिया दिली आहे, माझ्या नव-याला महिन्याभरापासून दारु पाजून मनोज जरांगे यांच्या विरुद्ध षडयंत्र रचायला लावल्याची माहिती पत्नीने दिली आहे. (पान २ वर)

## हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासूनच

**नागपूर/प्रतिनिधी :** विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाबाबत सुरू असलेल्या सर्व तर्कवितर्कांना आता पूर्णविराम मिळाला आहे. हिवाळी अधिवेशन येत्या ८ डिसेंबरपासून सुरू होउन १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. नागपूर विधानभवन सचिवालयाचे कामकाज २८ नोव्हेंबरपासून नागपुरात सुरू होईल.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि ठेकेदारांकडून अधिवेशनाच्या तयारीची कामे बंद केल्याच्या पार्श्वभूमीवर, यंदा सत्र मुंबईतच होईल अशी चर्चा रंगली होती. दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सत्रात आठ ते दहा दिवसांचा विलंब होउ शकतो, असे सूचक वक्तव्य केल्याने या चर्चांना अधिक वेग आला होता. मात्र, विधानभवन सचिवालयाने शुक्रवारी नागपूर विधानभवनातील कक्ष अधिकारी कैलाश पाझारे आणि स्नेहलता खोब्रागडे यांना पत्र पाठवून स्पष्ट केले की, सत्र ८ डिसेंबरलाच सुरू होईल. पत्रात विधानभवनातील



### दोन आठवड्यांचे कामकाज; २८ नोव्हेंबरपासून सचिवालय नागपुरात

पीठासीन अधिकारी आणि इतर अधिकारी यांच्या कक्ष व निवास व्यवस्थेची तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, २६ नोव्हेंबरपासून मुंबईहून साहित्याचे आगमन सुरू होईल, तर अधिकारी व कर्मचारी २७ नोव्हेंबरपर्यंत नागपुरात पोहोचतील अशी (पान २ वर)


## राजभवनात 'वंदे मातरम'चे सूर निनादले



**मुंबई/प्रतिनिधी :** बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेल्या वंदे मातरम् या गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त राजभवन येथे संपूर्ण वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, एडीसी अभयसिंह देशमुख यांसह राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व जवानांनी वंदे मातरमचे सामूहिक गायन केले. सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणा-या वंदे मातरम या गीतास दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने राजभवन (पान २ वर)








## रिलायन्स पॉवरला मोठा झटका!

### बनावट बँक गॅरंटी प्रकरणी ED कडून तिसरी अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** उद्योगपती अनिल अंबानी यांच्या मालकीच्या रिलायन्स पॉवर कंपनीशी संबंधित ६८ कोटी रुपयांच्या बनावट बँक गॅरंटी प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने तिसरी अटक केली आहे. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव अमर नाथ दत्ता आहे. दत्ता यांना गुरुवारी ताब्यात घेण्यात आले असून त्यांना चार दिवसांची रिमांड मिळाली आहे. या बनावट बँक गॅरंटी प्रकरणाच्या तपासाच्या अंतर्गत ईडीने आतापर्यंत तीन प्रमुख व्यक्तींना अटक केली आहे. हा संपूर्ण घोटाळा रिलायन्स पॉवरची उपकंपनी असलेल्या रिलायन्स एनयू बीईएसएस लिमिटेडशी संबंधित आहे. या कंपनीने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडकडे ६८.२ कोटी रुपयांची बँक गॅरंटी




जमा केली होती. ईडीच्या तपासणीत ही बँक गॅरंटी बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही कंपनी यापूर्वी महाराष्ट्र एनर्जी जनरेशन लिमिटेड या नावाने ओळखली जात होती.

**ईडीचा बिस्वाल ट्रेडलिंकवर गंभीर आरोप-** ईडीने आरोप केला आहे की, बिस्वाल ट्रेडलिंक बिझनेस ग्रुप हा ८% कमिशनवर 'बनावट' बँक गॅरंटी जारी करण्याचे रॅकेट चालवत होता. या प्रकरणी दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने नोव्हेंबर २०२४ मध्ये मनी लॉंडरिंगचा गुन्हा दाखल केला होता. यावर रिलायन्स ग्रुपने यापूर्वी स्पष्टीकरण दिले होते की, अनिल अंबानी हे साडेतीन वर्षांहून अधिक काळ 'बोर्ड ऑफ रिलायन्स पॉवर लिमिटेड'मध्ये नाहीत आणि या प्रकरणाशी त्यांचा कोणताही संबंध नाही. मात्र, माजी CFO ला अटक झाल्यामुळे कंपनी अडचणीत आली आहे.



# शें.घाट, मोर्शी न.प.करिता विशेष अनुदान योजनेंतर्गत ५ कोटी मंजुर

## आ.उमेश यावलकर यांच्या प्रयत्नाना यश!

**वरूड -** वरूड मोर्शी मतदार संघाचे आमदार चंदु उर्फ उमेश यावलकर यांच्याकडे शेंदुरजनाघाट येथे शिवाजी उद्यान विकसित करण्यासाठी व मोर्शी येथे सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. या दोन्ही शहरातील स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार दोन्ही नगरपरिषद क्षेत्रातील विकासकामाबाबत नगरविकास मंत्रालयाकडे आ.यावलकर यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. अखेर त्या मागणीला ४ नोव्हेंबर रोजी नगरविकास मंत्रालयाकडुन शासनमान्यता देण्यात आली व त्या कामांकरिता ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.



प्राप्त माहितीनुसार, शेंदुरजनाघाट येथील तिवसारोडवरील प्रभाग क्रमांक १ मधील शिवाजी उद्यानमध्ये क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्राती ज्योती सावित्रीबाई फुले स्मारकासह छत्रपती शिवाजी उद्यान येथील पायाभुत सुविधेसह विविध विकसित कामे करण्याकरीता तसेच मोर्शी शहरातील प्रभाग क्रमांक १२ मधील मंगलदिप कालनीतील सभागृह व वाल कंपाउंडचे बांधकाम करण्याकरीता आ. यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर या दोन्ही कामांना नगरविकास मंत्रालयाकडुन वैशिष्ट्यपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेंतर्गत ५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरात देण्यात आल्याने आ.यावलकर यांच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले. यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजनेंतर्गत शेंदुरजनाघाट नगरपरिषदेकरीता ४ कोटी रुपयांची तर मोर्शी नगरपरिषदेकरीता १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सदर विकास कामांकरिता शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याने शासन निर्णयानुसार जिल्हाधिका-यांनी संबंधित कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करावी असे कळविण्यात आले आहे. निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी आ.यावलकर यांचे तसेच आ.यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहे.

# निवृत्त जेष्ठ नागरिक संघाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन रविवारी

### विविध विषयांवर होणार चर्चा



**अमरावती /प्रतिनिधी-**महाराष्ट्र वीज निवृत्त जेष्ठ नागरिक संघाचे प्रदेश रौप्य महोत्सवी अधिवेशनाचे उद्या रविवार ९ नोव्हेंबर सकाळी धर्मदाय काटन फंड येथे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनात सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती आज शुक्रवार ७ नोव्हेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की अधिवेशनाचे उद्घाटन रविवारी सकाळी ११ वाजता कामगार व श्रम मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते संघाचे प्रदेशाध्यक्ष जयकृष्ण घोंगडे यांच्या अध्यक्षतेत होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय मजदूर संघाचे अनिल ढुमणे, विद्युत संघटनचे महामंत्री अरुण देवांगन ,मजदूर संघाचे महामंत्री गजानन गटलेवार, सुभाष भावसार उपस्थित राहणार आहे. सेवानिवृत्त कामगारांना सेवा निवृत्ती नंतर त्यांची संपूर्ण नोंदी असलेली सेवा पुस्तके ची फोटो प्रत मागण्याचा अधिकार प्राप्त करून दिला आहे तेही प्रशासन कुठेही शुल्क न घेता देणार आहे. सेवानिवृत्त कामगारांना ओळखपत्र मागण्याचा अधिकार आहे ते त्यांना शुल्क न आकारता देण्यात यावे. पेन्शन योजना लागू करावी. परिपत्रक ६८५ नुसार सामान्य आदेश ७४ चा तिसरा लाभ देताना जी अट टाकण्यात आली आहे,ती रद्द करावी. रोजंदारी कामगार म्हणून केलेली सेवा ग्रॅच्युटीप्रमाणे सामान्य आदेश ७४ चा तिसरा लाभ देताना ग्राह्य धरावे. ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे तिकीटवर मिळणारी व सध्या बंद करण्यात आलेली सवलत पुन्हा सुरू करावी. वीज कंपन्यांमध्ये कार्यरत कामगार यांना मिळणा-या मेडिक्लेम योजना चा फायदा कामगार व त्यांच्या पती व पत्नीला मिळावे. मयत होणा-या कामगारांना मयत निधी त्यांचे कुटुंबीयांना देण्यात यावे या मागण्यावर सखोल चर्चा अधिवेशनात करण्यात येणार आहे. पत्रकार परिषद मध्ये जय कृष्ण घोंगडे, हरिहर धोटे, सुभाष भावसार, अधीर बेदरकर, गोपाळ शेवतकर, सुधाकर पेटकर, दिवाकर देशमुख, रवींद्र शिराळकर, गजानन गव्हाळे, दिलीप विघे, हेमंत मस्करे आदि उपस्थित होते.

# माजी राज्यमंत्री प्रविण पोटे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा






**अमरावती /प्रतिनिधी ?-** महाराष्ट्राचे माजी राज्यमंत्री, माजी पालकमंत्री ,पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांचा वाढदिवस जनसंपर्क कार्यालयात मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरा करण्यात आला.या खास दिवशी अमरावती शहरातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देउन शुभेच्छा देत त्यांच्यावरील आपले प्रेम व स्नेह, आदर व्यक्त केला. अमरावती शहर व जिल्ह्यातील आमदार, खासदार, मित्र मंडळ, उद्योजक, व्यापारी वर्ग, भाजपा पदाधिकारी, माजी नगरसेवक, सर्व मंडळ प्रमुख, कार्यकर्ते यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.प्रविण पोट पाटील यांचेमुळे जिल्ह्याच्या विकासाला गती मिळाली त्यांच्या कार्यकाळात महत्वपूर्ण कार्य जिल्ह्यात विकासाला गेले. त्यांच्या नेतृत्वात पूरग्रस्त भागातील नागरिक यांना मदत, शेतकरी, गरजू व्यक्तींना मदत तसेच निराधार नागरिकांची सेवा यासारखे सामाजिक कार्यातील भरीव योगदान, शैक्षणिक क्षेत्रात असलेली पकड आणि तरुणांना प्रोत्साहित करणारे नेतृत्वगुणामुळे त्यांची ओळख ही प्रेरणादायी आहे.

पान १ व १० वरून

## बेकायदा बांधकामांबाबत राज्यातील

उदासीनता आणि कर्तव्यातील निष्काळजीपणा दिसून येतो. महामुंबईमध्ये हा निष्काजीपणा सर्रास आढळून येते, असा टोलाही न्यायालयाने लगावला.सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाने बेकायदा बांधकामांवर ताशेरे ओढून त्यासंदर्भात अनेक निर्णय दिले आहेत. त्यानंतरही, राज्यभरातील महानगरपालिका अजूनही गाढ झोपेत असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले. याचिकेत उपस्थित मुद्दा हा अंतर्गत वाद आहे. त्यामुळे, त्याकडे लक्ष देण्याऐवजी सार्वजनिकरित्या महत्वाच्या कामांकडे पालिका लक्ष देत असल्याचे महापालिकेने प्रतिज्ञापत्रात म्हटले होते. या दाव्याचाही न्यायालयाने समाचार घेतला व त्याबाबत आश्चर्य व्यक्त केले. याचिकाकर्त्यांच्या भूखंडावरील बेकायदा बांधकामांकडे लक्ष न देणे हे महापालिकेचे वक्तव्य धक्कादायक असून हे एकप्रकारे जबाबदारीपासून पळ काढण्यासारखे असल्याची टीका न्यायालयाने केली.

## हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासूनच

शक्यता आहे. हिवाळी अधिवेशनाचा कार्यक्रम १९ डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आला असून, सत्राचे दिवस वाढण्याची कोणतीही शक्यता नाही. दोन आठवड्यांच्या या सत्रात एकूण १० दिवसांचे कामकाज प्रस्तावित आहे. सत्राच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकार पूरक मागण्या सादर करणार आहे, तर १० डिसेंबरला त्यावर चर्चा आणि मतदान होईल. त्यानंतर पूरक मागण्या मंजूर केल्या जातील.

## राजभवनात ‘वंदे मातरम’चे

येथे वंदे मातरम या गीताच्या सामूहिक गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**मंत्रालयात सामूहिक वंदे मातरम गीताचे गायन**

जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंर्त्यलढ्यात सर्वांनी वंदे मातरम म्हटले होते. वंदे मातरम हा स्वातंर्त्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी वंदे मातरमच्या सामूहिक गायनाने संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामूहिक वंदे मातरम गीत गायनप्रसंगी केले. मंत्रालयात वंदे मातरम गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास, रोजगार, नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ सनदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सरकार कुणालाही पाठीशी

जी माहिती आहे त्यानुसार जो करार झाला होता त्यात पैशांचा व्यवहार बाकी होता. मात्र रजिस्ट्री झाली होती. दोन्ही पक्षांनी रजिस्ट्री रद्द करावी असा अर्ज केला आहे. रजिस्ट्री रद्द करताना नियमानुसार पैसे भरावे लागतात. पैसे भरण्याबाबत त्यांना नोटीस पाठविण्यात आली आहे. हे जरी झाले तरी जो फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे तो संपणार नाही. सगळ्या प्रकारची चौकशी करण्यात येईल व कुणालाही यात सोडले जाणार नाही. या संपूर्ण घटनाक्रमाच्या तळाशी जाण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अधिकृत स्वाक्षरी करणा-या व्यक्तींवरच गुन्हा दाखल

अशा प्रकरणांत जे प्रत्यक्ष स्वाक्षरी करतात किंवा करारात सहभागी असतात त्यांच्यावर गुन्हा दाखल होतो. या प्रकरणात ज्यांनी विक्री केली, स्वाक्षरी केली, चुकीची नोंदणी, फेरफार केली त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आत्ताच्या गुन्ह्यात कुणालाही डावलले नाही. अधिकृत स्वाक्षरी करणारा व्यक्ती व प?वर ऑफ अट?र्नी असलेल्यांवर गुन्हा दाखल केला आहे. मात्र चौकशीदरम्यान आणखी कुणी दोषी आढळला तर निश्चित त्याच्यावर कारवाई होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## पुणे जमीन प्रकरणाच्या चौकशीसाठी

असल्याने या जमिनीच्या हस्तांतराणास कोणी परवानगी दिली, १८ कोटींचे मुद्रांक शुल्क माफ करून केवळ ५०० रुपयांच्या मुद्रांकावर नोंदणी कशी झाली असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले असून विरोधकांनी या प्रकरणाच्या चौकशीची आणि अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालच या जमीन व्यवहाराची चौकशी केली जाईल असे जाहीर केले होते. त्यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चौकशी समिती स्थापन करण्याचे आदेश आज जारी केले. महसूल, मुद्रांक व नोंदणी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीत पुणे विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे जिल्हाधिकारी व मुद्रांक विभागाचे सहसचिव असे पाच सदस्य आहेत.

**सखोल चौकशी होणार : बावनकुळे**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, चौकशी समितीला प्रस्तुत प्रकरणात नेमकी अनियमितता झाली आहे किंवा नाही, याबाबत सखोल चौकशी करणे, अनियमितता झाल्याचे आढळल्यास त्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आणि त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस शासनाकडे करणे, अनियमितता सिद्ध झाल्यास, सदर जमीन तिच्या मूळ स्थितीवर (पूर्वःस्थितीवर) आणण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सुचविणे, तसेच भविष्यात अशा प्रकारची प्रकरणे पुन्हा घडू नयेत, यासाठी ठोस उपाययोजना सुचविण्यास सांगण्यात आले आहे.

## माझ्या नव-याला दारू पाजून

मागील एक महिन्यापासून माझ्या पतीला दारु पाजत होते. त्या नशेमध्ये त्यांच्याकडून हे सगळं करून घेतलं जात होते. मात्र माझे पती मराठा आंदोलक जरांगे पाटलांचे सुरु वातीपासून कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मोबाईलमध्ये व स्टेटसला नेहमी जरांगे पाटलांचे फोटो असतात. ते जरांगे पाटलांना देव मानतात. माझ्या पतीला या प्रकरणात अडकवले जात आहे. त्यांचा काहीही संबंध नाही, असा धक्कादायक दावा आरोपी अमोल खुणे याची पत्नी आणि आईने केला आहे. त्यामुळे या प्रकरणात ट्विस्ट निर्माण झाला आहे. माझ्या मुलाचा या प्रकरणात काहीही संबंध नाही असे म्हणत अमोल खुणेच्या आईला अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. याप्रकरणी आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

## शिराळा परिसरातील

चाकूने केलेले १५ ते २० घाव मिळून आले आहे. पुरावे मिटवण्याचे दृष्टीने हत्या करून त्याचा मृतदेह जाळण्यात आला. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलीस खूनाच्या दिशेने तपास करीत आहे. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. प्रकरणाचे गांभीर्य पाहता डीसीपी गणेश शिंदे, फिंगरप्रिंट एक्सपर्ट, डॉग स्कॉड घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तूर्तास आकस्मिक मृत्यूचा गुन्हा नोंदविला आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट नंतर अधिकृत गुन्हा दाखल करण्यात येईल. मृतकांची ओळख पटवण्यासाठी पोलीस युद्ध स्तरावर प्रयत्न करत आहे. वलगांव पोलीस स्टेशन हद्दीतील अनेक मिसिंग प्रकरणाचा शोध घेण्यात येत आहे. प्रेत पूर्ण जळाले असल्याने त्याची ओळख पटवण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

## परतवाडा आगार प्रमुखाविरोधात

दारूबंदी अधिनियम अंतर्गत कलम ८५(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक स्वरूपात सुरक्षा व दक्षता अधिकारी विभागीय कार्यालयाचे अधिकारी यांनी कारवाई केल्याची माहिती मिळाली आहे. पण आतापर्यंत कार्यालयाला अहवाल न आल्याने यासंदर्भात माहिती देऊ शकत नाही .

-निलेश बेलसरे ,विभागीय नियंत्रक ,म.रा.परिवहन महामंडळ ,अमरावती.

## युती झाली नाहीतर

शहर प्रमुख योगेश थाये, चांदूररेल्वे गोलू यादव, नांदगाव खंडेश्वर तालुका प्रमुख पवन ठाकरे,शहर प्रमुख अनुप पिंजरकर, महिला जिल्हा प्रमुख जयश्री कातकिडे, तालुका प्रमुख अलका कलावटे,शहर प्रमुख रूपाली भोयर, उपतालुकाप्रमुख रंजना मरसकोल्हे, रंजना सिडाम,सोनाली दुबे,सुचिता गुल्हाने,वैशाली शिरभाते, संतोष मुरायते, अनिल वानखडे,अतुल शिरभाते, अतुल मोरे, नंदू सोवगिरकर,कैलास गावंडे, बालकृष्ण यादव, संतोष मगर व शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## तुटलेल्या विज तारांच्या

विजेच्या तारांची त्वरित दुरुस्ती न केल्याने त्या तुटलेल्या तारांच्या संपर्कात येऊन शॉक बसून त्या चार ही गाईंचा मृत्यू झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

मृत्यूमुखी पडलेल्या गाईंमध्ये सौरव ठाकरे यांच्या दोन गाई, हरिभाऊ कट्यारमल यांची एक व सौरभ राऊत यांची एक अशा चार जर्सी गाईंचा समावेश आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले असून पशु पालनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. या दुर्घटनेनंतर परिसरातील शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना महावितरण कडुन त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी आणि अशी घटना पुन्हा होऊ नये या करिता जबाबदारांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## चांदूर रेल्वेत पहिल्याच

त्यामुळे याबाबत तोडगा काढावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**काही शेतकऱ्यांनाच फायदा-** पूर्वी उपलब्ध असलेली ओटीपी आधारित नोंदणी प्रणाली (ध्ऊझ्-्ी ्रिंगदह) शेतकऱ्यांसाठी सोपी आणि सुलभ होती. पण ती बंद करून बायोमेट्रिकची सक्ती लावल्याने अनेक पात्र शेतकरी नोंदणीपासून वंचित राहात आहेत. बायोमेट्रिक पडताळणीच्या नावाखाली सरकार खरेदी मर्यादित ठेवला जात आहे.

शासनाने बायोमेट्रिक प्रणाली तात्काळ रद्द करावी व पूर्वीप्रमाणे सुलभ नोंदणी प्रक्रिया पुन्हा सुरू करावी. शेतकऱ्यांना वेठीस धरण्यापेक्षा त्यांना न्याय द्यावा.

-गोविंदराव देशमुख, अध्यक्ष, खरेदी-विक्री सहकारी संस्था, चांदूर रेल्वे

बाजार समितीत रांगाच रांगा -

चांदूररेल्वे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शासनाकडून सोयाबीन खरेदी केन्द्र व नोंदणी होतांच शासनाला शेत माल सोयाबीन खरेदी करून देण्यासाठी रागाचं रांगा लागलेल्या दिसत आहे.सरकारी खरेदी केंद्रावर शेतकऱ्याची गर्दी वाढली.

## मनपा आयुक्तांची स्वच्छता

नाल्यांची स्वच्छता, तसेच जनजागृती उपक्रम राबविले जात आहेत.

तसेच, आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सदर परिसरात आवश्यक तेथे सफाई कामगारांची तात्काळ नियुक्ती करून परिसर पूर्णपणे स्वच्छ करण्यात यावा अशा सूचना संबंधित विभाग प्रमुखांना दिल्या. त्यांनी स्वच्छता कामकाज नियमित व प्रभावी पद्धतीने चालविण्यासाठी देखरेख ठेवण्याचे निर्देशही दिले. आयुक्त यांच्या या पाहणीदरम्यान संबंधित विभाग प्रमुख, स्वच्छता निरीक्षक आणि स्थानिक अधिकारी उपस्थित होते. त्यांनी प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष निरीक्षण करून सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींवर चर्चा केली.

शहरातील नागरिकांकडून स्वच्छतेसाठी सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. या पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डिक्याव, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

## खासदार वानखडे, आ.गजानन

लागू केली. अमरावती जिल्ह्यातही नगरपरिषद, नगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू केल्यानंतर खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी यांनी दर्यापूर पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या कामाची भूमिपूजन केले. भूमिपूजनाचे बोर्ड उभारने, शासकीय जागेचा व साधनांचा वापर करणे, लोकप्रतिनिधींची जाहीर उपस्थिती दर्शवणे ही सर्व कृती आदर्श आचारसंहिता नियम ७, १०, १६ चे उल्लंघन करणारी आहे. संदर्भातील तक्रार भाजपच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे. त्यामुळे संबंधितांवर आदर्श आचारसंहिता भंग केल्याचे गुन्हे दाखल करावे अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

## राष्ट्रवादीची स्थानिक स्वराज्य

यांनी अमरावती जिल्ह्यातील महानगर पालिका , जिल्हा परिषद, १० नगर पालिका , २ नगरपंचायती मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची परिस्थिती, गत काळातील पार्श्वभूमी, मतदारसंघनिहाय परिस्थिती, संघटनात्मक बळकटी आणि संभाव्य इच्छूक उमेदवार आदींबाबत विस्तृतपणे माहिती दिली. यावेळी बैठकीला उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, रुपाली चाकणकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आ.संजय खोडके ,जेष्ठ नेतेगण तसेच अमरावती जिल्हातील जेष्ठ महिला पदाधिकारी सुरेखा ठाकरे, यश खोडके, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष ( शहर) प्रशांत डवरे, ग्रामीण अध्यक्ष संतोष महात्मे, माजी सभापती अविनाश मार्डीकर, माजी महापौर अ?ड. किशोर शेळके, माजी उपमहापौर शेख जफर आदींसह स्थानिक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## काँग्रेसतर्फे नगराध्यक्ष व

या मुलाखतींसाठी उपस्थिती लावली.

या मुलाखती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण) चे अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलु देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आल्या. यावेळी खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी आमदार राजकुमार पटेल, जिल्हा प्रभारी सिद्धार्थ हत्तीअंभिरे, हरिभाऊ मोहोड, मुकद्दर का पठाण, प्रवीण मनोहर, दयाराम काळे, प्रशांत पाचोडे, सुधाकर भारसाकळे, अक्षय राऊत आणि प्रदीप देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पक्षांतर्गत चाचपणी आणि निवड प्रक्रिया पारदर्शक करण्याच्या दृष्टीने या मुलाखती घेण्यात आल्याचे जिल्हा काँग्रेसतर्फे सांगण्यात आले. उमेदवारांची अंतिम नावे लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

## क्षुल्लक वादात तिघांवर

एका जखमीच्या कुटुंबीयांनी पण उपचारावरून रुग्णालयात वाद घातला. यामुळे रुग्णालयात खळबळ उडाली होती. तणावपूर्ण परिस्थिती येथे निर्माण झाली होती. डॉक्टर विरुद्ध लेखी तक्रार कुटुंबीयांनी केली. पोलिसांनी तपास सुरू केला आहे. एका समाजसेवकाच्या मध्यस्थीतीनंतर परिस्थिती नियंत्रणात आली. गंभीर जखमी शेख अहफाज शेख शफी याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली.

## बालविवाह रोखण्यासाठी

माता आणि बालकांचे चांगले पोषण होत नसल्याने मातामृत्यू आणि बालमृत्यूची स्थिती चिंताजनक आहे. त्यामुळे कमी वयात होणारे विवाह रोखणे आवश्यक आहे. यासाठी प्रामुख्याने शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हाभरात किशोरी मेळाव्यांसारखे उपक्रम राबविण्यात यावे. मेळघाटात कोरकू बोलीभाषा असल्यामुळे जनजागृतीसाठी त्यांच्याच भाषेचा उपयोग करावा.

शाळेतून मुलींची अनुपस्थिती ही मुख्याध्यापकांना पहिल्यांदा जाणवते. त्यामुळे मुख्याध्यापकांनी अचानक शाळेत मुलींची गैरहजेरी जाणविल्यास याबाबत समितीला माहिती द्यावी. अशा मुलींचे बालविवाह होत असल्यास तातडीने याची माहिती देण्यात यावी. तसेच गावातील ग्रामसेवक, सरपंच यांनाही गावातील विवाहाची माहिती होत असल्याने त्यांच्यावरही जबाबदारी सोपविण्यात यावी. गावात बालविवाह झाल्यास ग्रामसेवकांवर कार्यवाही करावी. बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती ही महत्वाची असल्याने येत्या बालकदिनी बालविवाह रोखण्याची शपथ सर्व शाळांमध्ये घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिली.

बेटी बचाओ, बेटी पढाओ या अभियानाबाबत जनजागृती करण्यात यावी. यासाठी कृति आराखडा तयार करण्यात यावा. यात कार्यक्रमाचे नियोजन करून जिल्ह्यात राबविण्यात यावेत. तसेच गावातीलच महिलांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविले असल्यास अशांचा सत्कार करण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी उपस्थितांनी बालविवाह रोखण्याची शपथ घेतली.

## इयत्ता बारावीच्या परीक्षेची

दि. ४ ते १० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आवेदनपत्रे भरावयाची असून विलंब शुल्काने आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क ऊउए/ंइंऊ द्वारे मंडळाकडे भरणा करावयाचा कालावधी दि. ४ ते ११ नोव्हेंबर आहे. तसेच उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी ऊउए/ंइंऊ ची पावती चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट १२ नोव्हेंबरपर्यंत विभागीय मंडळाकडे जमा कराव्यात. परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरण्यासंदर्भात तसेच अनुषंगीक सूचना, माहितीसाठी विद्यार्थ्यांनी मंडळाच्या .ैस्र्स्र्ंदे्.ग्ह या अधिकृत संकेतस्थळाचे अवलोकन करावे, असे आवाहनही मंडळाव्दारे करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# जिल्हा क्रीडांगणावर निनादला भारतभूमीच्या गौरवाचा सूर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**स्वातंत्र्य सेनानी व थोर कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी क्रांतीची जाज्वल्य ज्योत आपल्या गीतातून सबंध देशभर पेटवली. देशप्रेम, निष्ठा आणि अभिमानाचे प्रतीक असलेले 'वंदे मातरम' हे गीत आज पुन्हा एकदा प्रत्येकाच्या ओठांवर झंकारले. वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त साजरा होत असलेला 'वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सव' वाशिम जिल्ह्यातही उत्साहात पार पडला.**



## ■ देशप्रेम, निष्ठा आणि अभिमानाचे प्रतीक असलेले 'वंदे मातरम' गीत झंकारले
## ■ राष्ट्रीय गीतनिर्मितीला १५० वर्षे पूर्ण
## ■ सार्धशताब्दी महोत्सवाला उत्साहात सुरुवात

'वंदे मातरम' या गीत रचनेला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत जिल्हा क्रीडांगणावर दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वा. 'वंदे मातरम' गायनाचा सामूहिक सोहळा संपन्न झाला. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मंगेश बोरा, प्रमुख अतिथी वाशिम तहसीलदार निलेश पळसकर, प्रमुख वक्ते जिल्हा सरकारी अभियोक्ता ?ड अभिजित व्यवहारे, प्राचार्य प्रविण गुल्हाने, जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी सचिन नखाते, गटनिदेशक श्री परळीकर, नायब तहसीलदार प्रतिभा चौधरी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रास्ताविक वैभव आढाव यांनी केले .'वंदे मातरम' गीताच्या सार्धशताब्दीचे औचित्य सांगत, या गीताचा इतिहास, त्यातून व्यक्त होणारी देशभक्ती आणि मातृभूमीवरील प्रेम याची सुंदर मांडणी केली. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात या गीताने निभावलेली प्रेरणादायी भूमिका त्यांनी उपस्थितांसमोर उलगडून सांगितली. प्रमुख वक्ते अभिजीत व्यवहारे म्हणाले, 'वंदे मातरम' या गीताचा इतिहास आणि त्यामागील प्रेरणादायी पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना समजून घेतली पाहिजे, असे त्यांनी व्यक्त केले. त्यांनी विद्यार्थ्यांना या गीताने स्वातंत्र्यलढ्यात निर्माण केलेल्या राष्ट्रीय एकतेची आणि देशभक्तीची जाणीव करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मंगेश बोरा यांनी विद्यार्थ्यांना देशहितासाठी आपली कर्तव्ये पार पाडण्याचे आवाहन केले. 'वंदे मातरम' मधून मिळणाऱ्या प्रेरणेचा उपयोग जीवनात करून देशसेवेच्या कार्यात योगदान द्यावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले. या कार्यक्रमात जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांनी एकत्र येत 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन करून देशभक्तीचा जागर केला. यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी वंदेमातरम् या गीताचे महत्व पटवून देणारी लघु नाटिका सादर केली. तर राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी या गीतावर नृत्य सादर केले नृत्य सादर केले. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात 'वंदे मातरम्' या गीताचा विशेष उल्लेखनीय प्रभाव राहिला आहे आणि हे गीत स्वातंत्र्यसैनिकांसाठी प्रेरणास्त्रोत बनले होते. सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली रचलेल्या 'वंदे मातरम' या गीताला शुक्रवारी, ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान एकूण चार टप्प्यात विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

याअंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे मंत्रालयात 'वंदे मातरम्' गीत 'सार्ध शताब्दी' महोत्सवासाची आज सुरुवात झाली आहे. या महोत्सवासाच्या माध्यमातून कौशल्य विकास विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. आजच्या जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे संचालन शिल्प निदेशक माधुरी शेळके तर उपस्थितांचे आभार पंजाबराव चव्हाण यांनी मानले. शालेय विद्यार्थी, तरुण, महिला, ज्येष्ठ वाशिमकर या उपक्रमात सहभागी झाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समिती अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. सामूहिक वंदे मातरम गीत गायनासाठी हॅपी फेसेस शाळेच्या शिक्षकांनी नेतृत्व केले.

## 'वंदे मातरम' सार्धशताब्दी निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात देशभक्तीचा जल्लोष



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारत माता आणि देशभक्तीचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' या अमर गीताला यंदा १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून 'वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवाच्या निमित्ताने आज ७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात सामूहिक वंदे मातरम गायनाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देशभक्तीच्या भावना व्यक्त करत एकसुरात वंदे मातरमचे गायन केले. कार्यालय परिसर देशभक्तीच्या जयघोषांनी दुमदुमून गेला. कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. यावेळी जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सवाने सर्वांमध्ये देशप्रेम, एकता आणि अभिमानाची भावना जागवली.

## मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**अकोला :** सामाजिक व सांस्कृतिक सेवा कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळ व राधाकिसन तोष्णीवाल पब्लिक ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत सावतराम चाळ परिसरातील मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात हे एक दिवशीय भव्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे.

## सैनिक कल्याण विभागात लिपिक-टंकलेखक पदांची भरती; ७२ पदासाठी अर्ज मागविले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये लिपिक टंकलेखक (गट-क) या एकूण ७२ पदांच्या भरतीसाठी फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. या पदांपैकी एक पद दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव असून, किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या उमेदवारांमधून गुणवत्ता आणि उपलब्धतेनुसार भरती करण्यात येणार आहे. सदर भरती प्रक्रिया टिसीएस-आयओएन (TCS-iON) यांच्या मार्फत पार पडणार असून, अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जातील. अन्य माध्यमातून आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि विजय अनंत वैद्य, रेणुका विजय वैद्य व विपिन विजय वैद्य यांनी रजिस्ट्रर खरेदीखता नुसार दस्त क्र. १७०१ / २००९ अन्वये दिनांक १३/०५/२००९ रोजी विकत घेतली आहे. विजय अनंत वैद्य, रेणुका विजय वैद्य व विपिन विजय वैद्य हेच खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे मालक आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत हि आमचे पक्षकार विजय माणिकराव राजगुरे, मनीष मोतीराम पिंपळे यांना विकण्याचे कबुल केलेले आहे. तसेच सदर मिळकत हि पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असून, त्यांच्या व्यतीरिक्त अन्य कोणीही सदर मिळकतीचे वारस नाहीत. त्यावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा चार्ज, कर्ज बोजा, गहाण, दान, बक्षीस, लीज, लीन, ईसार पावती, खरेदी, वारसा हक्क, लेखी या तोंडी करार अगर इतर कोणत्याही स्वरूपाचा हक्क व हितसंबंध नाही असा भरवसा त्यांनी दिलेला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की वरील मिळकतीबाबत कोणीही विजय अनंत वैद्य, रेणुका विजय वैद्य व विपिन विजय वैद्य यांच्या सोबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये अन्यथा त्याची सर्वस्वी जबाबदारी व्यवहार करणार यांच्यावर राहील, करिता या जाहीर नोटीस द्वारे कळविले आहे.

तरी देखील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीत कोणीही वारस असतील वा कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क या अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून आठ (८) दिवसांचे आंत मूळ कागदपत्रांसह लेखी हरकत कळवून आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत हि पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे, असे गृहित धरून सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याने तो जाणीव पूर्वक सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट :-** मिळकतीचे वर्णन : पोट तुकडी, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम तसेच दुय्यम निबंधक कारंजा (लाड), यांचे हद्दीतील तसेच वाशीम जिल्हा परिषद हद्दीतील / स्थळासमेतील गाव मौजे म्हसला येथिल जमीन मिळकती

**खालील प्रमाणे :-** शेत सर्व्हे / गट नं ७४, हे . आर १७ . ३४ ०४ . ०४, आ .रू. ५९ . ९८ १२ . ७२, पो .ख ०२ . ९७०० .००, हिस्सा यातील पुर्ण शेतजमीन

शिक्का

सही
अॅड. व्ही. व्ही. ठाकरे
शॉप नं. एल १०, वर्धमान प्लाझा,
स्टेट बँक समोर, कारंजा (लाड), जि. वाशीम
मो. नं. ९७६६८८०७६४, ९१४६०४८३१४

### टेंडर नोटीस
### (सन २०२५-२०२६)

संत गजानन महाराज नाविण्यपूर्ण कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मर्या. उमरा कापसे ता. जि. वाशीम, नोंदणी क्रमांक डब्ल्यु. एस. एम.पी. आर. जी. (ऐ) १००२/२०१८

वाशिम तालुका भरड धान्य व कडधान्य राज्यशासन व नाफेड खरेदीसाठी हंगाम २०२५-२०२६ साठी आमच्या संस्थेला राजगांव, वाशीम खरेदीचे केंद्र मंजुरी दिली आहे. हंगाम २०२५-२६ मध्ये मुग, उडीद, सोयाबीन, तुर, चना ज्वारी, मका, धान व शेतमालाची शासनाच्या किमान आधारभूत हमीभावानुसार राज्यशासना मार्फत खरेदी करण्यात येणार आहे. हंगाम २०२५-२६ साठी आमच्या संस्थेला राजगांव वाशीम केंद्रावर शेतमाल खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे साहित्य, मशीनरी, हमाल, मापारी व मालाची ग्रेडींग करण्यासाठी बि.एस.सी. ॲग्री डिप्लोमा प्राप्त व्यक्ति, माल वाहतूकीसाठी ट्रकची आवश्यकता आहे. ईच्छुकांनी दि. १०/११/२०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत संस्थेच्या वाशीम येथील कार्यालयात आपले दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये सादर करावेत.

**१)** खरेदी केंद्रावर माल काढणे, चाळणी करणे, मोजणे यासाठी हंगाम २०२५-२६ साठी लागणारे मनुष्यबळाची (हमाल, मापारी) आवश्यकता आहे. यासाठी हमाल, मजुर सहकारी कामगार संस्था, रेल्वे मजूर, हमाल कामगार सहकारी संस्था व इतर मजूर कामगार सहकारी संस्था, वैयक्तीक हमाल व मुकादम हे पात्र राहतील.

**२)** राज्यशासन भरड धान्य, कडधान्य खरेदी अंतर्गत खरेदी केलेले धान्य तहसीलदार व वखार महामंडळ यांच्या अधिपत्याखाली असलेल्या गोदामामध्ये करण्यात येणार आहे. तर नाफेड मार्फतची खरेदी केंद्र राजगांव पासून वाशीम, मालेगाव, मंगरुळपीर, मानोरा, कारंजा (लाड) येथे शासनाच्या वखार महामंडळाच्या गोदामामध्ये पोहोचविण्यासाठी ट्रान्सपोर्ट कंपनी व वैयक्तीक ट्रक मालक निविदा व दरपत्रक सादर करण्यासाठी पात्र राहतील.

**३)** ईलेक्ट्रॉनिक्स वजन काटे ६ नग, ४) जनरेटर - २ नग, ५) ताडपत्री २५ नग, ६) संगणकसंच २ नग, ७) मॉइश्चर मशीन - २ नग, ८) स्केल काटे २ नग, ९) शिलाई मशीन ६ नग, १०) पोते शिवण्यासाठी सुतळी (धागा) १५ पेटी, ११) लोखंडी कपाट २ नग, १२) जेके बॉंड पेपर कागद १५० रिम, १३) चाळणी व पत्ते ५+५ नग, १४) नोंदणी अर्ज - २५,००० नग, १५) डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचे प्रती अर्ज ऑनलाईन करण्यासाठी दरपत्रक.

**संस्था कार्यालय पत्ता**
वाशिम कृषी उत्पन्न बाजार समिती
व्यापारी संकुल, दुकान क्र. ७८
रेल्वे स्टेशन रोड, वाशीम
मोबाईल संपर्क - ७७४१८४०८५८
वाशिम दि. ०८/११/२०२५

**अध्यक्ष**
**नथ्युजी कापसे**


## वेदांत पब्लिक स्कूल, कारंजा येथे उत्साहात विद्यार्थी दिवस साजरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील वेदांत पब्लिक स्कूल येथे शुक्रवार, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री गडेकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षणप्रेम, संघर्षमय जीवन आणि समाजासाठी केलेल्या योगदानाबद्दल प्रेरणादायी मार्गदर्शन दिले. विद्यार्थी दिवस हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ दरवर्षी ७ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने २७ ऑक्टोबर २०१७ रोजी या दिवसाला 'विद्यार्थी दिवस' म्हणून मान्यता दिली आहे.

या कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थी, शिक्षकवृंद, कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षकांनी तर आभारप्रदर्शन विद्यार्थ्यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमात देशभक्ती व प्रेरणादायी वातावरण अनुभवायला मिळाले.

## कोल्हापुरी बंधाऱ्यात गेट टाकण्यासंदर्भात कार्यकारी अभियंता यांना निवेदन



■ प्रतिनिधी | रिसोड ■

कार्यकारी अभियंता, लघुपाट बंधारे विभाग वाशिम, यांना दि.०७ नोव्हेंबर रोजी निवेदनाद्वारे पैनगंगा नदीवरील असलेले कोल्हापुरी बंधारे ते अद्याप पर्यंत गेट टाकून बंद करण्यात आले नाहीत. आपल्या विभागाकडून १५ ऑक्टोबर पर्यंत संबंधित बंधाऱ्यांमध्ये गेट टाकून पाणी अडवणे गरजेचे होते. परंतु अद्याप तरी आसेगावपेण येथील कोल्हापुरी बंधारा अडवण्यात (पाणी) आला नाही. व त्यामध्ये अडकलेले, वाहून आलेली लाकडे व काडीकचरा अद्यापही काढण्यात आला नाही. त्यामुळे आपण जाणून बुजून आपल्या कार्यात कुचराई करत आहात व शेतकऱ्यांना वेठीस धरत आहात. असे यावरून लक्षात येते. गेट टाकून तयार व्हायला पाहिजे होते. त्यामुळे रब्बी हंगामात पाणी मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी वारंवार पण केले.पण प्रतिसाद दिला नाही. जर आपण शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य आठ दिवसाच्या आत पूर्ण केले नाही तर आपल्या कार्यालयामध्ये शेतकरी घेऊन आपल्या कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन का करण्यात येऊ नये?, हे कार्य आठ दिवसाच्या आत पूर्ण झाले नाही तर नाईलाजाने भविष्यात आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागेल. असेही निवेदनात शिवसेनेचे तालुकाप्रमुख नारायण आरोप यांनी म्हटले आहे. व होणाऱ्या परिणामाचे घडणारे परिणाम आपले कार्यालयास व आपल्याला भोगावे लागतील व याबाबत आपणच सर्वस्वी जबाबदार असाल भविष्यात होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस आपण स्वतः व आपले कार्यालय जबाबदार असेल याची कोणतीही जबाबदारी भविष्यात आमच्यावर (शेतकऱ्यांवर) नसेल. याबाबतचे निवेदन कार्यवाहीस्तव निवेदन सादर कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग वाशिम यांना देऊन शेतकरी बंधाऱ्यात गेट टाकण्याची (आसेगाव पेन ता. रिसोड येथील कोल्हापुरी बंधाऱ्यात गेट टाकणे बाबत) वाट पाहत आहेत.

## महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ चे आयोजन रविवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी वाशिम शहरातील एकूण पाच परीक्षा उपकेंद्रांवर करण्यात आले आहे. परीक्षेदरम्यान कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच गैरप्रकार घडू नयेत, यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (३) अन्वये जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर (भा.प्र.से.) यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत लागू राहतील. आदेशानुसार खालील कृतींवर बंदी घालण्यात आली आहे.

## शेकडो समर्थकांसह डॉ. सोमटकरांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**राजकीय वर्तुळात खळबळ, निवडणुकीची समिकरणे बदलण्याची शक्यता**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मागील अनेक वर्षापासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत डॉ.विशाल सोमटकर यांनी शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादीचे नेते तथा वाशिम जिल्हयाचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे, राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, चंद्रकांतदादा ठाकरे जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या नेतृत्वात दि. ५ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गटात )प्रवेश घेतला. ऐन निवडणुकीच्या धामधुमीतील या पक्ष प्रवेशाने जिल्हयातील राजकीय समिकरणे बदलण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

काँग्रेस पक्षात युवक काँग्रेस ते सेवादल अशा विविध कक्षात डॉ. विशाल सोमटकर यांनी काम केले. अनेक वर्ष काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या या युवा नेत्याने पक्षातील वरिष्ठांच्या मनमानीला कंटाळून शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यावेळी त्यांच्या खांदयावर शहरप्रमुख पदाची जबाबदारी देखील सोपविण्यात आली. यानंतर अवघ्या काही दिवसातच शिवसेनेला सोडचिठ्ठी देत ते समाजकारणात व्यस्त झाले होते. त्यामुळे डॉ. सोमटकरांच्या पुढील राजकीय धोरणाविषयी चर्चा होवू लागल्या. दरम्यान, त्यांनी बुधवारी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. ऐन निवडणुकीच्या काळात डॉ. सोमटकरांच्या पक्ष प्रवेशाने राष्ट्रवादीला बळ मिळाले असून याचा परिणाम आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसून येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. यावेळी डॉ. सोमटकर यांच्या समवेत अब्दुल आतिक अब्दुल सिद्दिक, अनिल भडके, गोपाल सारसकर, गोपाल सोमटकर, वैभव कांबळे, विजय इनहोल, सचिन इंगोले, अजय रायतकर, अजय वाकुडकर, संतोष बोरकर, प्रणव घायाळ, भागवत मुंडे, अमोल हनवटे, अनिकेत भालेराव, आसिफ अब्दुल आतीक, सय्यद शफी सय्यद शकील, मो.फाजील मो.सलीम खान, सलीम पठाण, शामु वेलडर आदिंसह बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

## जुन्या वाहनांना ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' लावणे अनिवार्य

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार सर्व मोटार वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या आदेशानुसार दि. १ एप्रिल २०१९ नंतर उत्पादित सर्व नव्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' बसविणे बंधनकारक असून, आता राज्य शासनाने हा निर्णय जुन्या वाहनांनाही लागू केला आहे. रस्ते सुरक्षा, वाहनांची स्पष्ट ओळख व बनावटगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' बसविणे अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत निर्देश दिले असून, त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' बसविण्याचा निर्णय घेतला आहे.

या अंमलबजावणीसाठी वाशिम जिल्ह्यासाठी Rosmerta Safety Systems Ltd. या अधिकृत संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. नागरिकांनी आपल्या वाहनासाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' बुकिंग करण्यासाठी https://mhhsrp.com या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. जुन्या वाहनांवर जर नक्कल केलेल्या किंवा तत्सम नंबर प्लेट बसविलेल्या असतील, तर त्या दि. ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी अधिकृत हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' ने बदलाव्यात.

## मंगरूळपीर तहसील कार्यालयात 'वंदे मातरम'च्या सामूहिक गायनाने साजरा झाला सार्धशताब्दी महोत्सव



■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशभक्तीच्या सुरांनी आज मंगरूळपीर तहसील कार्यालयाचा प्रांगण दुमदुमला. 'वंदे मातरम' गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त सामूहिक गायनातून भारतमातेप्रती कृतज्ञता आणि राष्ट्रीय अभिमान व्यक्त करण्यात आला.

भारत माता आणि देशभक्तीचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' या अमर गीताला यंदा १५० वर्षे पूर्ण झाली असून जिल्ह्यात 'वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सव' उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने मंगरूळपीर तहसील कार्यालयात आज सामूहिक वंदे मातरम गायनाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार डॉ. मिलींद जगदाळे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल क्षिरसागर, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त बी.डी. बिक्कड, नायब तहसीलदार रवी राठोड तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. 'वंदे मातरम'च्या या सार्धशताब्दी महोत्सवाने मंगरूळपीर तालुक्यात देशभक्तीचा उत्साह आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पसरवला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्वांनी देशभक्तीच्या भावनेने वंदे मातरमचे गायन करून या ऐतिहासिक गीताला अभिवादन केले.



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३९ ■ शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## केळझरच्या गणेश कुंडात सापडला तरुणीचा मृतदेह

### -गावात खळबळ; आत्महत्येची शक्यता व्यक्त

**सेलू जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील सुप्रसिद्ध धार्मिक स्थळ असलेल्या केळझरच्या सिद्धिविनायक गणपती मंदिरातील गणेश कुंडात आज (७ नोव्हेंबर) एका तरुणीचा मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृत तरुणीची ओळख साक्षी खुशाल देहारे (वय २०, राहणार सिंदी मेघे, वर्धा) अशी पटली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार साक्षी वर्ध्यातील एका कॅफेमध्ये नोकरीस होती. गुरुवारी (६ नोव्हेंबर) ती घरी एकटीच होती. दुपारी तिने वर्ध्यातून केळझरकडे निघाल्याचे समजते. गावात तिचे काही नातेवाईक असूनही ती थेट सिद्धिविनायक मंदिराच्या परिसरात गेली. दुपारी साडेतीनच्या सुमारास तिने गणेश कुंडाचा फोटो आपल्या मित्राला पाठवला होता. त्याने ही माहिती साक्षीच्या नातेवाईकांना दिल्यानंतर तिचा शोध घेण्यास सुरुवात झाली. मात्र ती कुठेच न सापडल्याने वर्धा पोलीस ठाण्यात बेपत्ता तरुणीची नोंद करण्यात आली होती.आज दुपारी मंदिर परिसरातील गणेश कुंड विहिरीत गावचे पोलिस पाटील प्रकाश



खंडाळे यांनी पाहणी केली असता पाण्यावर एक बॅग तरंगताना दिसली. गावकऱ्यांच्या मदतीने गळ टाकून शोध घेतला असता कुंडात साक्षीचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती तातडीने सेलू पोलीसांना देण्यात आली.ठाणेदार मनोज गभणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी गणेश राऊत, देवा वणवे आणि लोकेश पवनकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. गाळ भरलेल्या विहिरीतून नागरिकांच्या मदतीने दोन तासांच्या प्रयत्नानंतर मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृतदेह बाहेर येताच गावात मोठी गर्दी जमली.प्राथमिक तपासातून आत्महत्येची शक्यता व्यक्त केली जात असून नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी सेलू ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे सिंदी मेघे परिसरात शोककळा पसरली आहे.

## फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्याकडून १४ लाखांचा गैरव्यवहार

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील आरती टॉकीज चौकातील इसाफ स्मॉल फायनान्स बँकेतील कर्मचाऱ्याकडून १४ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बचतगटातील ४१ महिलांकडून कर्जाची वसुली करून ती रक्कम बँकेत न जमा करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याची माहिती मिळाली आहे. प्रज्वल शेंडे असे या कर्मचाऱ्याचे नाव असून तो बँकेत एसओ पदावर कार्यरत होता. बँकेच्या माध्यमातून बचतगटांना देण्यात आलेल्या कर्जाची वसुली करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. त्याने विविध महिलांकडून मिळून १४ लाख ११ हजार ९२१ रुपये वसूल केले; परंतु ती संपूर्ण रक्कम बँकेत जमा केली नाही. तसेच संबंधित महिलांना एटीएम कार्डही देण्यात आले नव्हते.बँकेचा अंतर्गत तपास सुरू होताच प्रज्वल शेंडे याने पैशांच्या अफरातफरची कबुली दिली होती व रक्कम भरण्यासाठी वेळ मागितला होता. मात्र त्याने पैसे परत न केल्याने बँकेचे एरिया मॅनेजर प्रफुल्ल मगर यांनी शहर पोलिस ठाण्यात औपचारिक तक्रार नोंदवली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

### -४१ महिलांकडून वसुली करून रक्कम बँकेत न जमा तक्रारीनंतर आला उघडकीस प्रकार

## विश्वाला दिशा देणारा भारत घडविण्यासाठी 'वंदे मातरम'चा संकल्प करूया: मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंत्र्यलढ्याच्या काळात सर्व भारतीय एकत्र येऊन वंदे मातरम् म्हटले होते. त्या गीताने स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा दिली होती. आजही या भावनेतून विश्वाला दिशा देणारा भारत घडविण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मतेचा संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मंत्रालयात 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग तसेच सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक वंदे मातरम् गायनाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर आणि मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्या संगीत संयोजनात सर्व मान्यवरांनी सामूहिक गायनातून राष्ट्रभावनेचा संकल्प व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वंदे मातरम् हे फक्त गीत नाही, ती देशाला जोडणारी भावना आहे. स्वातंत्र्यलढ्यात प्रभातफेऱ्या, आंदोलनं, अधिवेशनं यामधून हे गीत सतत घुमत राहिले. जात, धर्म, पंथ यांच्या भिंती ओलांडत हे गीत भारतीय समाजाला एकत्र बांधणारे ठरले. ते पुढे म्हणाले, वंदे मातरम् हे कोणत्याही धर्माचे नाही, ते सर्वांना प्रेरणा देणारे राष्ट्रगीत आहे.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'वंदे मातरम्'चे गायन देशभरात पोहोचविण्याची संकल्पना मांडली असून महाराष्ट्रातही हा उपक्रम प्रत्येक शाळा, महाविद्यालय आणि संस्थांमध्ये होत आहे. विकासासोबत वारसा जोपासत विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवूया. या वेळी मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले की, वंदे मातरम् हे क्रांतीकारकांना प्रेरणा देणारे समरगीत आहे. या गीताचे शब्दच स्फुरण चढवतात. सर्व धर्म, जाती, भाषांतील लोक याचे सामूहिक गायन करतात, यातून एकात्मतेचा संदेश मिळतो, असे ते म्हणाले.कार्यक्रमात पूर्वा निर्मिती विश्वतर्फे 'वंदे मातरम्'वर पथनाट्य सादर करण्यात आले. त्यात विविध धर्म, संस्कृती आणि भाषांतील युवकांनी वंदे मातरम् फलक हातात घेऊन एकता आणि राष्ट्रभावनेचा संदेश दिला.कार्यक्रमानंतर दिल्लीहून दूरदृश्य माध्यमाद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करत 'वंदे मातरम' गायनात सहभागी झाले.

## जिल्ह्यात सर्व तालुकाठिकाणी वंदे मातरम् गिताचे सामुहिक गायन





**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रभक्तीचे प्रतीक वंदेमातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात राष्ट्रभक्तीच्या वातावरणात आज वंदेमातरम् गीताचे सामुहिक गायन करण्यात आले. वर्धा शहरात पांडुरंग सदाशिव खानखोजे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने केसरीमल कन्या विद्यालयाच्या मैदानावर सामुहिक गायनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला.

तहसिलदार संदीप पुंडेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी वुमेन्स शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माधव पंडित, सचिव ॲड संध्या पुरेकर, प्राचार्य जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहाय्यक संचालक निता औघड, नायब तहसिलदार अजय धर्माधिकारी, आयएमसीचे अध्यक्ष दिलीपकुमार, केसरी कन्या विद्यालयाच्या प्राचार्य एम.एम. सालोडकर यांची तर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन अतुल शेंडे यांची उपस्थिती होती. स्वातंत्र्य संग्रामात वंदेमातरम् या गीताचा विशेष उल्लेखनीय प्रभाव राहिला आहे आणि हे गीत स्वातंत्र्य सैनिकांसाठी प्रेरणा स्त्रोत बनले होते.

थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली या गिताची रचना केली होती. आज या गीताला १५० वर्ष पूर्ण झाले असून या गीतामुळे स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या स्वातंत्र्य सेनानींमध्ये स्वातंत्र्याप्रती चेतना जागविण्याचे या गीताने केले.

यावेळी केसरी कन्या विद्यालय व न्यु इंग्लीश कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वंदेमातरम् गितावर तासेच स्वच्छ भारत अभियानावर पथनाट्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाला तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी प्रफुल्ल व्यास, निसर्ग सेवा समितीचे मुरलीधर बेलखोडे, अजय हेडाऊ, शासकीय आयटीआयचे सर्व प्राद्यापक, शाळेचे विद्यार्थी सामुहिक गित कार्यक्रमात सहभागी होऊन गिताचे गायन केले.

## बजाज चौकात वाहतूक कोंडी; रुग्णवाहिका अडकल्या, नागरिकांचा संताप

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील बजाज चौक परिसरात शुक्रवारी रात्री भीषण वाहतूक कोंडी झाली. नगरपरिषदेने सुरू केलेल्या एकलमार्गी सिग्नल आणि कमी वेळेच्या सिग्नल स्विचमुळे चौकाच्या चारही दिशांना वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या. अंदाजे दोनशे ते तीनशे वाहने अडकून राहिली, तर रुग्णालयाकडे निघालेल्या दोन रुग्णवाहिकांना देखील मोकळा मार्ग मिळू शकला नाही.वाहतूक ठप्प झाल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. रुग्णवाहिका बराच वेळ अडकून राहिल्याने नातेवाईकांनी प्रशासनावर ताशेरे ओढत संताप व्यक्त केला. नागरिकांचे म्हणणे आहे की, सिग्नल प्रणाली लागू करण्यापूर्वी योग्य नियोजन न केल्याने संपूर्ण वाहतूक विस्कळीत झाली आहे. तसेच, काही वाहतूक कर्मचारी गर्दी नियंत्रणाऐवजी चलान वसुलीत गुंतल्याची तक्रारही करण्यात आली.सुमारे अर्धातासानंतर वाहतुकीचा गोंधळ काही प्रमाणात निवळला. नागरिकांनी शहरातील प्रमुख चौकांवरील सिग्नल वेळापत्रक पुनर्रचित करण्याची, वाहनतळ



व्यवस्था सुधारण्याची आणि वाहतूक पोलिसांची अतिरिक्त तैनाती करण्याची मागणी केली आहे. अन्यथा अशा घटनांमुळे गंभीर प्रसंग संभवू शकतात, असा इशारा नागरिकांनी दिला.

**वाहतूक विभागाचे स्पष्टीकरण**

कोंडी होताच कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून वाहतूक सुरळीत केली. अशा परिस्थितीत चलानाऐवजी समज देऊन वाहनधारकांना सोडविण्यात येईल, अशी माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी दिली.

## २,७५ लाखांचा बेकायदेशीर कृषी पेस्टिसाईड साठा उघड

### -कृषी विभागाची धडक कारवाई; मात्र दोनच आरोपी ठरवून मोठ्यांना सुटका

**वर्धा जनमाध्यम ;** पावडे चौकातील इमारतीवर कृषी विभागाने पोलिसांसह टाकलेल्या छाप्यात तब्बल २.७५ लाखांचा बेकायदेशीर कृषी पेस्टिसाईड साठा जप्त करण्यात आला. हे पेस्टिसाईड्स थेट शेतकऱ्यांना विकले जात असून त्यामागे कोणाचा वरदहात आहे, हा प्रश्न आता शेतकऱ्यांच्या गप्पांच्या वर्तुळात गाजू लागला आहे. या प्रकरणात फक्त दोनच आरोपींवर गुन्हा दाखल करून मोठ्या माशांना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा शहरात आहे.

**नियम धाब्यावर बसवून साठवण आणि विक्री-** राशी पॅथॉलॉजीजवळील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर शेतकऱ्यांना थेट कृषी पेस्टिसाईड्स विक्री केली जात होती. कृषी विभागाच्या गुणनियंत्रण अधिकारी राजश्री चाफले यांच्या नेतृत्वाखाली टाकलेल्या धाडीत अनधिकृत साठा उघडकीस आला. याठिकाणी अनंत नागरी पतसंस्था व ग्रामीण शिक्षक पतसंस्थांची कार्यालये असून त्याच इमारतीत बेकायदेशीरपणे पेस्टिसाईड साठवले जात होते. नियम, परवाना, परवानगी यांचं काहीही भान न ठेवता हा धंदा सुरू असल्याचं धक्कादायक वास्तव यातून समोर आलं आहे.

**दोन नावं पुरेशा की अजून नावे ?-** कृषी विभागाने केवळ पुण्याचे श्रीजित शिवकुमार पनीकर आणि स्वप्निल टापरे या दोघांच्याच नावांवर गुन्हा दाखल केला. एवढ्या मोठ्या प्रमाणातील मालाच्या साठ्यामागे दोनच माणसं असूच शकत नाहीत, असं स्थानिकांनी स्पष्ट सांगितलं. पोलिस प्रशासनाच्या दुर्लक्षाला नेमका कोणाचा हात आहे, हा प्रश्न आता जनतेला भेडसावत आहे.

**कृषी विभागाचे १४ नमुने प्रयोग शाळेकडे-** कारवाई दरम्यान १४ पेस्टिसाईड नमुने घेत प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले आहेत. हे नमुने निकृष्ट दर्जाचे अथवा बनावट ठरल्यास शेतकऱ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या टोळीवर आरोप अधिक गंभीर होणार आहेत.

**पोलिस तपास गतीमान, अटक मात्र अद्याप नाही-** ६ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर ७ तारखेच्या संध्याकाळी साडेसहा वाजेपर्यंतही आरोपींना अटक झाली नव्हती. तपास अधिकारी मात्र पुरावे गोळा करत आहोत या वाक्यावरच ठाम आहेत. या ढिसाळ कारवाईमुळे कृषी विभागाने माशी मारली, पण डंख वाचवला अशी टीका सुरू झाली आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात विविध निर्बंध लागू

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वर्धा, देवळी, पुलगाव, हिंगणघाट, आर्वी व सिंदी रेल्वे या नगर परिषद क्षेत्रात संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी विविध बाबींवर निर्बंध लागू केले आहे. निर्बंध आदेश संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहणार आहे.

**शासकीय कार्यालय व विश्रामगृहे परिसरात सभा घेण्यास निर्बंध :** जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि शासकीय विश्रामगृहाच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने सभा घेण्यास मनाई करण्यात आली आहे. शासकीय आवारात राजकीय कामासाठी रॅली काढणे, निवडणूकी संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट, पेंटींग्स, होर्डींग्ज लावणे, निवडणूक विषयक राजकीय घोषवाक्य लिहीणे किंवा सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणुकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे.

**ध्वनी क्षेपकाचे वापरावर निर्बंध :** निवडणुकीच्या प्रचार मोहिमेच्या कालावधीत निवडणूक लढविणारे उमेदवार, राजकीय पक्षाचे उमेदवार, त्यांचे कार्यकर्ते, हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामुळे पोलिस परवानगी शिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सकाळी ६ वाजेपुर्वी व रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचारासाठी फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा. ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल.

**धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध :** जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध राहील.

सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरणास प्रतिबंध : नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामीण भागात निवडणुकीच्या कालावधीमध्ये होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स व भिंतीवर जाहिरात प्रदर्शित करतांना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर ते दुर करुन ईमारती, मालमत्ता पुर्ववत करुन घेणे, जाहिराती तात्काळ काढून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे निवडणूकीच्या कालावधीमध्ये शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपता करण्यास निर्बंध लावण्यात आले आहे.

**नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध :** राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा हितचिंतकांने, मुद्रकाच्या मालकाने व इतर सर्व माध्यमांव्दारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना इतर उमेदवारांचे नाव व त्यांना नेमून दिलेले चिन्ह वापरणे. नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे. तसेच आयोगाने निश्चित केलेल्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे यावर निर्बंध घालण्यात आले आहे. उपरोक्त आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ३ डिसेंबर अंमलात राहतील, असेही जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## घरातून मोबाइल, रोकड लंपास करणारा पकडला

### -शहर गुन्हे शोध पथकाची प्रशंसनीय कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** गोंडप्लॉट परिसरातील एका महिलेकडून सांधेदुखीवर औषध देण्याचा बनाव करून घरात प्रवेश करणाऱ्या चोरट्याने मोबाइल आणि रोकड रक्कम पळविली होती. या घटनेतील आरोपीला शहर गुन्हे शोध पथकाने अटक करण्यात यश मिळविले आहे.मनोहर बेनपे (रा. हेटी, ता. आर्वी) असे अटक आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार गोंडप्लॉट येथील एका महिलेशी उपचाराच्या निमित्ताने संवाद साधत आरोपीने घरात प्रवेश केला. त्यानंतर १० हजारांची रोकड आणि मोबाइल चोरून पसार झाला. घटनेची तक्रार शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. तक्रारीनंतर गुन्हे शोध पथकाने तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे आरोपीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून ७ हजार रुपये रोकड



आणि चोरीचा मोबाइल असा १४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई शहर गुन्हे शोध पथकाने केली.

## पत्नीला पेट्रोल ओतून केले आगीच्या हवाली पतीही भाजला

### वडनेर येथील घटना

**वडनेर जनमाध्यम :** कौटुंबिक वादातून संतापलेल्या पतीने पत्नीवर पेट्रोल ओतून तिला आगीच्या हवाली केल्याची धक्कादायक घटना वडनेर येथे घडल्याचे ७ आक्टोबर रोजी उघडकीस आले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, पीडित महिला गंभीररीत्या भाजली आहे. तिच्यावर नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपी पतीही या घटनेत भाजल्याने त्याला सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, शीतल (वय ३०) हिचा वडनेर येथील शरद मंगरुळकर (वय ४०) याच्याशी १२ वर्षांपूर्वी विवाह झाला. त्यांना एक मुलगाही आहे. मात्र, दोघांमध्ये किरकोळ कारणांवरून नेहमी वाद होत असत. ६ नोव्हेंबरच्या दुपारी त्यांच्यात पुन्हा तीव्र वाद झाला. त्यावेळी संतापलेल्या शरदने घरात ठेवलेली पेट्रोलची बाटली आणून शीतलवर ओतली आणि तिला आगीच्या हवाली केले. या घटनेत शीतल गंभीररीत्या भाजली असून, शरदही भाजल्याचे समजते. भाजलेल्या शीतलला तात्काळ शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी तिला नागपूरच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तिची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जाते. शरदला सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी वडनेर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

## विरूळ आकाजी येथे १३ नोव्हेंबरपासून आबाजी महाराज यात्रा महोत्सवाची धामधूम

### -तीन दिवसांची धार्मिक-सांस्कृतिक पर्वणी; विदर्भातून भाविकांची गर्दी अपेक्षित

**विरूळ (आ) जनमाध्यम :** परंपरा, श्रद्धा आणि उत्साह यांचा संगम असलेला आबाजी महाराज यात्रा महोत्सव यंदा १३ नोव्हेंबरपासून मोठ्या जल्लोषात सुरू होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या धार्मिक-सांस्कृतिक पर्वणीसाठी ग्रामस्थ आणि परिसरातील भाविकांनी तयारी पूर्ण केली आहे.

पहिल्या दिवशी दिंडी स्पर्धेने उत्सवाचा शुभारंभ होणार असून, संध्याकाळी रंगतदार दहीहंडी स्पर्धा रंगणार आहे. दुसऱ्या दिवशी १४ नोव्हेंबर रोजी रामपाल धारकर महाराज यांचे राष्ट्रीय कीर्तनाचे कार्यक्रम होईल. तसेच तणसापासून तयार करण्यात आलेल्या भव्य गजराज व रथाची आकर्षक मिरवणूकही यात्रेचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

गावात या दरम्यान उत्सवी वातावरण निर्माण झाले असून, प्रत्येक घरात पाहुण्यांचा आणि आप्तस्वकीयांचा जल्लोष सुरू आहे. परंपरेनुसार, बहीण भाऊबीज न ओवळता, दहीहंडी फुटल्यावर दी-अक्षदा लावून हा सोहळा साजरा करण्याची प्रथा कायम राखली जाते. गावकरी, भाविक आणि पर्यटकांसाठी ही तीन दिवसांची श्रद्धा आणि उत्साहाची मेजवानी असल्याचे चित्र आहे.


## कार्यालय ग्रामपंचायत, हिंगणी, पंचायत समिती, सेलू, जि.प.वर्धा

### निविदा सूचना

कार्यालय ग्रामपंचायत, हिंगणी, ता.सेलू, जि.वर्धा कडून खालीलप्रमाणे कामाकरीता निविदा खालील अटी व शर्ती प्रमाणे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | TS नं. | प्राकलन किंमत | कामाची निविदा स्विकार-ल्याची तारीख | निविदा उघडण्याची तारीख | योजनेचे नांव | निविदा फी व अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | 3 kw- सौरऊर्जा संयंत्र बसविणे | ९४६/ २५-२६ | ३०१००० | ८/११/२०२५ ते १४/११/२०२५ | १५/११/ २०२५ | माझी वसुंधरा ४.० | १००० रु.व ३००० रु. |
| २. | 5 kw- सौरऊर्जा संयंत्र बसविणे | ९४७/ २५-२६ | ४५०००० | | | माझी वसुंधरा ४.० | १००० रु.व ४५०० रु. |
| ३. | 3 kw- सौरऊर्जा संयंत्र बसविणे | ९४८/ २५-२६ | ३०१००० | | | माझी वसुंधरा ४.० | १००० रु.व ३००० रु. |
| ४. | 3 kw- सौरऊर्जा संयंत्र बसविणे | ९४९/ २५-२६ | ३०१००० | | | माझी वसुंधरा ४.० | १००० रु.व ३००० रु. |
| ५. | 5 kw- सौरऊर्जा संयंत्र बसविणे | ९५०/ २५-२६ | ४५०००० | | | माझी वसुंधरा ४.० | १००० रु.व ४५०० रु. |

**अटी व शर्ती-**

१) कामाच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

२) तारखात बदल करण्याचा अधिकार ग्रामपंचायत हिंगणीकडे राहील.

३) कोरी निविदा ग्रामपंचायत निविदा फी व अनामत रक्कम मध्ये मिळेल.

४) काम रद्द अथवा बदल करण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायत हिंगणीकडे राहील.

**स्वाक्षरी/-**
**सरपंच,**
**ग्रामपंचायत हिंगणी,**
**ता.सेलू, जि.वर्धा**

ग्रामपंचायत हिंगणी,

**स्वाक्षरी/-**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत हिंगणी,**
**ता.सेलू, जि.वर्धा**

e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडविण्यासाठी 'वंदे मातरम्'चा संकल्प करूया'-मुख्यमंत्री फडणवीस

## मंत्रालयात सामूहिक 'वंदे मातरम' गीताचे गायन

**मुंबई/प्रतिनिधी :** जात, पंथ, धर्म, भाषा यांचे सर्व भेद विसरून स्वातंर्त्यलढ्यात सर्वांनी वंदे मातरम् म्हटले होते. वंदे मातरम् हा स्वातंर्त्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी वंदे मातरमच्या सामूहिक गायनाने संकल्प करू या, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामूहिक वंदे मातरम् गीत गायनप्रसंगी केले. आज मंत्रालयात वंदे मातरम् गीताला दिडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास, रोजगार, नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेनानी-जोगळेकर यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ सनदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पद्मजा फेनानी-जोगळेकर यांच्यासोबत सर्व मान्यवरांनी एकत्र येऊन वंदे मातरमचे गायन करत राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर देशाला जोडणारी, एकसंघ ठेवणारी भावना आहे. कोलकात्ताच्या टाऊन हॉलमध्ये ३० हजारपेक्षा अधिक जनता जमली होती. त्याठिकाणी पहिल्यांदा वंदे मातरमची पहिली घोषणा झाली. त्याला प्रतिसाद ३० हजार लोकांनी सामूहिक वंदे मातरमचा जयघोष केला. त्यानंतर बंग-भंग चळवळीच्यावेळी प्रेरणा गीत, संघर्ष गीत झाले. त्या दिवसापासून सगळीकडे, इंग्रजांच्या विरुद्ध वंदे मातरम म्हणत लढा सुरू झाला. प्रभात फे-या, कार्यक्रमांमध्ये, आंदोलनामध्ये वंदे मातरम सुरू झाले. हल्ला केला तर वंदे मातरम काँग्रेसच्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोरांनी वंदे मातरम गायिले. यानंतर जात, धर्म, पंथ सगळे विभाजन विसरून संपूर्ण भारतीय समाज एकत्र येऊन वंदे मातरमचे घोषवाक्य तयार झाले. तेव्हापासून हे एक प्रकारे राष्ट्रगीत म्हणून वंदे मातरम तयार झाले.स्वातंर्त्यसंग्राम सेनानी फाशीवर जातानाही आपल्याला स्वातंर्त्य प्राप्त करायचं आहे, असे म्हणणा-या नेत्यांचे वंदे मातरम घोषवाक्य झाले. स्वातंर्त्याच्या परवलीचा शब्द तयार झाला. स्वातंर्त्य लढ्यामध्ये मोलाचे योगदान वंदे मातरमने दिले. स्वतंत्र भारताचा झेंडा तयार करतानाही त्यावर वंदे मातरम् लिहिण्यात आले. महात्मा गांधी आपल्या प्रत्येक पत्राचा समारोप हा वंदे मातरमने करीत. भारताच्या संविधानाच्या निर्मितीनंतर जन गण मन आणि वंदे मातरम् दोन्ही गीतांना राष्ट्रगीताचा दर्जा देवून समान सन्मान दिला, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.आजही १५० वर्षे झाली तरी, वंदे मातरम् एक प्रकारे आपल्या भारताला दिशा देणारे गीत आहे. गीतामध्ये आपल्या मातृभूमीचं वर्णन केलेलं आहे. स्वातंर्त्य लढ्यामध्ये जाती, पंथ, धर्म, भाषा सगळे भेद विसरून प्रत्येकाने वंदे मातरम् म्हटले. वंदे मातरम हे कुठल्याही एका धर्माचे गीत नाही. सर्व धर्मांना प्रेरणा देणारे प्रेरणागीत, राष्ट्रगीत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशभरात वंदे मातरम् सामूहिक गायनाचा कार्यक्रम हाती घेतला तर राज्यामध्येही मंत्री मंगल प्रभात लोढा यांनीही संकल्पना मांडली. यामुळे राज्याच्या प्रत्येक भागामध्ये, प्रत्येक शाळेमध्ये सामूहिक वंदे मातरमचा कार्यक्रम होत आहे. गीताची भावना प्रत्येक तरुण, विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर वंदे मातरम होत आहे. १९०५ साली बंगभंगच्या वेळी आणि स्वातंर्त्य मिळताना जी भावना तयार झाली, तीच भावना संपूर्ण भारतामध्ये तयार करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री मोदी यांचे एक विकसित भारताचे स्वप्न आहे. भारतामध्ये विकास भी और विरासत भी, अशा प्रकारची भावना त्यांनी मांडली आहे. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत, नालंदा आणि तक्षशिलासारख्या विश्वविद्यालयाच्या माध्यमातून जगाला ज्ञान देणारा भारत, भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान संपूर्ण विश्वात नेणारा भारत घडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.



**क्रांतीकारकांना प्रेरणा देणारे समरगीत- मंत्री आशिष शेलार**

वंदे मातरम् गीताचे संपूर्ण देशभर गायन होत आहे. या गीताने स्फुरण येते. शब्द, गीत, प्रेरणा म्हणजेच वंदे मातरम् आहे, हे स्वातंर्त्य गीत, आत्मिक प्रेरणा गीत असून क्रांतीकारकांनाही प्रेरणा देणारे समर गीत असल्याचे प्रतिपादन मंत्री आशिष शेलार यांनी केले. सर्व धर्म, जाती, पंथ येवून गीत गातात, यातून एकत्रित जगण्याची प्रेरणा मिळते. जगाला हेवा वाटावा असे एकमेव गीत असल्याचेही त्यांनी प्रास्ताविकात सांगितले.यावेळी पूर्वा निर्मिती विभागातर्फे वंदे मातरमवर पथनाट्य सादर केले. सर्व धर्म, भाषांमधून विविध पोषाखात हातात वंदे मातरम लिहिलेले फलक घेतलेले युवक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.कार्यक्रमानंतर दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे वंदे मातरमचे सामूहिक गायन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रेरणादायी संबोधन झाले.

---

## संक्षिप्त

### बच्चू कडू अभ्यास करून बोला; हायकोर्टाने सुनावले

#### आंदोलकांना हटवण्याच्या आदेशावरून केलेली टीका



**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर-वर्धा रोडवरून शेतकरी आंदोलकांना हटविण्याचा आदेश दिल्यामुळे हायकोर्टाने शेतकरीविरोधी आहे, अशी बोचरी टीका करणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यावर वरिष्ठ न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी गुरु वारी कडक ताशेरे ओढले होते. कडू यांनी हायकोर्टावर निराधार व मनमानी आरोप करू नयेत. त्यांनी असे आरोप करण्यापूर्वी हायकोर्टाचे निर्णय सखोल अभ्यास करावा, असे न्या. किलोर म्हणाले. गेल्या २८ व २९ ऑक्टोबर रोजी कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी नागपूर-वर्धा रोड बंद करून हजारो निरपराध नागरिकांना वेठीस धरले होते. या असंवैधानिक आंदोलनामुळे हा रोड सुमारे ३५ तास बंद होता. परिणामी, रुग्ण, लहान मुले व महिलांचे हाल-बेहाल झाले. व्यापा-यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले. आंदोलकांनी स्वतःच्या अधिकारांसाठी लढताना इतर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची तमा बाळगली नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यासंदर्भात स्वतःच जनहित याचिका दाखल करून शेतकरी आंदोलकांना नागपूर-वर्धा रोडवरून हटविण्याचे व रोड वाहतुकीसाठी मोकळा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर सरकारनेही शेतकरी कर्जमाफीसाठी सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे कडू यांनी रोड रिकामा केला.

### अजित पवार दरोडेखोर

#### ■ हाकेंचा हल्लाबोल ■



**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांचे पुण्यातील जमीन खरेदी व्यवहार प्रकरणात नाव आल्यानंतर चहूबाजूंनी टीका सुरु झाली आहे. अजित पवार यांचे विरोधक तुटून पडले आहेत, व्यक्तिगत पातळीवरची अत्यंत बोचरी टीका सुरु आहे. पुण्यातील कोरेगाव पार्क येथील १८०० कोटींची जागा पार्थ पवार यांच्या कंपनीला ३०० कोटी रुपयात दिल्याचा आरोप आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर टीका करताना जिव्हारी लागणारे शब्द वापरले. उपमुख्यमंत्री अजित पवारांचे दोन दिवटे एक दारूचा कारखाना चालवतो आणि एक जमिनीचा घोटाळा करतो असा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला. अजित पवार हे महाराष्ट्राच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे दरोडेखोर आहेत. त्यामुळे त्यांनी पहिल्यांदा काल झालेल्या अमेडिया कंपनीच्या जमीन प्रकरणी राजीनामा द्यावा अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरू असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला. अमिद या कंपनीची स्थापना अजित पवार यांच्या शिवाजीनगर येथील घरच्या पत्त्यावर झाली आहे. त्यामुळे पार्थ पवार यांचे हे दिव्य कर्तृत्व बघून त्यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा. हजारो कोटी रुपयांचे भूखंड, हजारो कोटींची माया जमवणारे हे लोक आहेत. भाजपचे भांडवलच पवार कुटुंब आहे. त्यामुळेच भाजपने त्यांना जवळ केलेले आहे असा आरोप केला. इथून पुढच्या काळात भाजपा हे दखल घेईल अशी भीती व्यक्त करत कालची घटना म्हणजे हिमनगाचे टोक आहे असे टीका लक्ष्मण हाके यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांचा त्वरित राजीनामा घ्यावा. धनंजय मुंडे यांना एक न्याय आणि अजित पवारांना एक न्याय असं अजित पवार कोण आहेत? असा सवाल देखील लक्ष्मण हाके यांनी केला. मनोज जरांगे यांना मारण्याचा कट कोणी केला असेल तर हे गंभीर आहे. आरोपींवर कारवाई झाली पाहिजे. मनोज जरांगे यांना कोणतीही जखम होता कामा नये, मनोज जरांगे चांगल्या पद्धतीने फिरला पाहिजे, वागला पाहिजे, जगला पाहिजे अशी टिप्पणी लक्ष्मण हाके यांनी केली.

### राज्यावर पुन्हा पावसाचे संकट

**पुणे :** हिवाळ्याची चाहूल लागत असतानाच भारतीय हवामान विभागाने पुन्हा एकदा पावसाचा इशारा दिला. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, पुढील तीन ते चार दिवसांत अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस होईल. ७ ते १० नोव्हेंबर दरम्यान तामिळनाडू, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक या भागात हलक्या ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस होईल. महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून सतत पाऊस बघायला मिळतो. मोंथा चक्रीवादळादरम्यानही वा-यासह मोठा पाऊस झाला. पुढील ५ ते ६ दिवसांत वायव्य भारतात किमान तापमानात कोणताही लक्षणीय बदल होणार नाही, पूर्व उत्तर प्रदेश वगळता. राज्यात सतत वातावरणात बदल होताना दिसत आहेत. पुढील तीन ते चार दिवस राज्यावर पावसाचे ढग कायम असणार आहेत. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात आज पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. ईशान्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने चक्राकार वा-याची स्थिती आहे. विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. राज्यात पावसाच्या हाहाकाराने मोठे नुकसान झाले असून शेतक-यांचे नुकसान झालंय. मात्र, पाऊस काही थांबण्याचे नाव अजिबात घेत नाही. पाऊस अन ढगाळ वातावरणामुळे उष्णतेची चटके कमी झाल्याचे दिसत आहे.

### शेतक-याचा मृतदेह घेऊन गावक-यांचे आंदोलन

**चंद्रपूर :** वाघाच्या हल्ल्यात शंकरपुरातील शेतकरी ईश्वर भरडे यांचा मृत्यू झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी चक्क मृतदेह सोबत घेऊन बुधवारी रात्रभर वनविभाग विरोधात आंदोलन केले. वाघाला जेरबंद करेपर्यंत मृतदेह अन्त्यसंस्कारासाठी नेणार नाही असा इशारा देऊन ठिय्या मांडला होता. अखेर वनविभागाने लेखी आश्वासन दिल्याने गुरुवारी सकाळी ६:३० वाजता आंदोलन मागे घेतले. ग्रामस्थांनी प्रारंभी भिसी-आंबोली रस्त्यावरील असोला वसर्थांच्याजवळ आंदोलन सुरू केले. त्यानंतर शंकरपूर येथील भिसी कार्नरवर मृतदेह ठेवून रास्ता रोको करण्यात आले. रात्री नऊ वाजल्यापासून गुरुवारी पहाटेपर्यंत हे आंदोलन सुरू होते. वाघाला ठार करण्याची मागणी आंदोलकांनी लावून धरली. वनविभागाने लेखी आश्वासन दिल्यानंतर गुरुवारी सकाळी ६:३० वाजता आंदोलन मागे घेतले. यानंतर ईश्वर भरडे यांचा मृतदेह विच्छेदनासाठी चिमूर उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला. रास्ता रोको आंदोलन दरम्यान शंकरपूर कडकडीत बंद पाळण्यात आला. येत्या शनिवारपर्यंत वाघाला पकडले नाही. तर पुन्हा रास्ता रोको आंदोलन करू, असा इशारा ग्रामस्थांनी वनविभागाला दिला. वाघाला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यात येईल. मृताच्या वारसाला नोकरी दिली जाईल. परिसराला तारेचे कुंपण करण्यात येईल, असे लेखी आश्वासन वनविभागाने दिले. आंदोलनस्थळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात होता. स्थानिक लोकप्रतिनिधीही सहभागी झाले होते.

### कोटामध्ये स्लीपर वंदे भारत ट्रेन 180 किमी वेगाने धावली

**कोटा :** येथे स्लीपर वंदे भारत ट्रेन ताशी १८० किमी वेगाने धावली. या प्रवासादरम्यान, लोको पायलटच्या डेस्कवरील पाणीदेखील सांडले नाही. ही पूर्णपणे स्वयंचलित ट्रेन आहे. स्वदेशी तंत्रज्ञानाने बनवलेल्या या ट्रेनच्या २ ते १७ नोव्हेंबर दरम्यान चाचण्या सुरू आहेत. या चाचण्यांचा उद्देश ट्रेनची तांत्रिक कार्यक्षमता, ब्रेकिंग, स्थिरता, कंपन आणि विद्युत प्रणाली तपासणे आहे.ही चाचणी लखनौच्या रिसर्च डिझाईन अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनच्या मार्गदर्शनाखाली केली जात आहे.सवाई माधोपूर-कोटा-नागदा मार्गावर चाचणी घेण्यात येत आहे. वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक सौरभ जैन यांनी सांगितले की, सवाई माधोपूर-कोटा-नागदा मार्गावर चाचण्या घेतल्या जात आहेत. १६ डब्यांची ही ट्रेन ताशी १८० किलोमीटर वेगाने चालवली जात आहे. शिवाय, ८०० टन रेक लोड आणि अतिरिक्त १०८ टन लोडसह या ट्रेनची चाचणी केली जात आहे, ज्यामुळे एकूण ९०८ टन भार पेलोडेल.आरडीएसओ चाचणी संचालक राधेश्याम तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांची १० सदस्यांची टीम चाचण्यांवर देखरेख करत आहे.

---

# वोटचोरीनंतर 'खतचोरी'

## ■ भाजपाच्या रुपाने कुंपणच शेत खातंय ■ अंबादास दानवेंचा घणाघात

**मुंबई/प्रतिनिधी :** मतदार याद्यांमधली घोळ, मतचोरी याविरोधात मुंबईत विरोधी पक्षांनी 'सत्याचा मोर्चा' काढला. या मोर्चात काँग्रेस, शरद पवार गट, ठाकरे गट यांच्यासह मनसे आणि इतर संघटना सहभागी झाल्या. सत्याचा मोर्चाच्या निमित्ताने पुन्हा एकदा ठाकरे बंधू एकत्र पाहायला मिळाले. विरोधक मतचोरीविरोधात आक्रमक होत असतानाच आता खतचोरी समोर आली आहे.ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी खतचोरी झाल्याचं म्हणत भाजपावर गंभीर आरोप केला आहे. 'भाजपाच्या रुपाने कुंपणच शेत खात आहे. पावसाच्या अस्मानीने लुटल्या गेलेल्या शेतकरी बांधवाना आता भाजपाचे लोक अशा 'सुलतानी' पद्धतीने लुटताहेत. मेवाभाऊंची खंबीर साथ... बोगस धंद्यात घालू हात...' असं म्हणत जोरदार हल्लाबोल केला आहे. आपल्या ट्विटर अकाऊंटवरून त्यांनी याबाबत ट्वीट केलं आहेत. तसेच काही व्हिडीओ देखील शेअर केले आहेत.



**'भाजपाच्या रुपाने कुंपणच शेत खातंय'-** 'वोटचोरी नंतर सादर आहे भाजपाचा 'खतचोरी'चा एपिसोड... मतांची धाडक चोरी पकडली जात असताना आता सिल्लोडमधील भाजपाच्या कार्यकर्त्यांची खतचोरी पाहा. डुप्लिकेट खतांची बॅग जिची किंमत २५० रुपयांच्या आसपास आहे, त्यातील बोगस खत शासकीय खतांच्या बॅगांमध्ये भरण्याचा कार्यक्रम सिल्लोडमध्ये भाजपा कार्यकर्ते सर्रास करत आहेत. सरकारी बॅगला बाजारात साधारण १३५० रुपये एवढा भाव आहे. इथे भाजपाच्या रूपाने कुंपणच शेत खात आहे!'

**'मेवाभाऊंची खंबीर साथ, बोगस धंद्यात घालू हात...'** 'पावसाच्या अस्मानीने लुटल्या गेलेल्या शेतकरी बांधवाना आता भाजपचे लोक अशा 'सुलतानी' (की मुलतानी ) पद्धतीने लुटत आहेत. ही खतचोरी करणा-या एका एका माणसाचे नाव मला माहिती आहे. हा खत 'जिहाद' करणारा भाजपा कार्यकर्ता नक्की कोण जो धरलं जात असताना कृषी विभागाच्या लोकांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करतो आहे. शेतक-यांप्रती थोडी जरी आत्मीयता शिल्लक असेल तर भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने हे नाव सांगावं! मेवाभाऊंची खंबीर साथ... बोगस धंद्यात घालू हात...' असं म्हणत अंबादास दानवे यांनी भाजपावर निशाणा साधला आहे.

---

# डिसेंबरपासून मोबाईल रिचार्ज दरवाढीची शक्यता

**मुंबई-** गेल्या काही दिवसांपासून मोबाईल रिचार्जचे दर वाढणार असल्याची चर्चा जोर धरत आहे. देशातील प्रमुख दूरसंचार कंपन्या जिओ, एअरटेल आणि व्होडाफोन-आयडिया डिसेंबर २०२५ पासून आपल्या प्रीपेड प्लॅनच्या किंमती वाढवू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. माध्यमांतील वृत्तांनुसार, ग्राहकांना सध्याच्या तुलनेत सुमारे १० ते १२ टक्के अधिक पैसे द्यावे लागू शकतात. अद्याप कोणत्याही कंपनीने अधिकृत घोषणा केलेली नसली तरी, काही टेक टिप्स्टरच्या एक्स पोस्टनुसार भारतातील मोबाईल डेटा प्लॅनचे दर लवकरच वाढतील, असे संकेत दिले आहेत. त्यांच्या माहितीनुसार, जिओ, एअरटेल आणि व्ह हे तिन्ही ऑपरेटर सुमारे १० टक्क्यांपर्यंत दरवाढ करू शकतात. सध्या ८४ दिवसांच्या वैधतेसह दररोज २जीबी डेटा देणारा प्लॅन ९४९ रुपयांना मिळतो, मात्र दरवाढीनंतर त्याची किंमत ९९९ रुपयांपर्यंत जाऊ शकते. तसेच दुस-या एक्स पोस्टनुसार, १ डिसेंबरपासून रिचार्ज प्लॅनच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. त्यांच्या मते, १९९ रुपयांचा प्लॅन सुमारे २१९ रुपयांपर्यंत तर ८९९ रुपयांचा प्लॅन ९९९ रुपयांपर्यंत वाढू शकतो. तरीदेखील या संदर्भात अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही. टेलिकॉम कंपन्यांनी दर वाढवले, तर देशभरातील लाखो मोबाईल वापरकर्त्यांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे. मोबाईल डेटा आणि इंटरनेट हे आता दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनल्याने या दरवाढीचा थेट परिणाम ग्राहकांच्या मासिक खर्चावर होणार आहे.

# दिल्ली विमानतळाच्या हवाई वाहतूक नियंत्रण कक्षात तांत्रिक बिघाड

**नवी दिल्ली -** दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर (आयजीआय एअरपोर्ट) शुक्रवारी सकाळी तांत्रिक बिघाडामुळे हवाई सेवांमध्ये अडथळा निर्माण झाला. आयजीआय विमानतळावरील एअर ट्रॅफिक कंट्रोल (एटीसी) प्रणालीत तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे उड्डाण सेवा प्रभावित झाली असून अधिकारी सांगत आहेत की तांत्रिक पथक ही समस्या दूर करण्यासाठी काम करत आहे.देशातील सर्वात वर्दळीच्या विमानतळांपैकी एक असलेल्या दिल्ली विमानतळावरून दररोज सुमारे १,५०० उड्डाणे सुरू होतात. स्पाइसजेटसह अनेक विमानकंपन्यांच्या उड्डाणांवर परिणाम झाला आहे. बहुतेक उड्डाणे उशिराने सुटत आहेत.सूत्रांच्या माहितीनुसार, ऑटोमॅटिक मेसेज स्विचिंग सिस्टममध्ये बिघाड झाला आहे. ही प्रणाली ऑटो ट्रॅक सिस्टीमला माहिती पुरवते, जी उड्डाणांच्या नियोजनाची देवाणघेवाण करते.या प्रणालीत बिघाड झाल्यामुळे एअर ट्रॅफिक कंट्रोलर्सना आता उड्डाणांचे नियोजन हाताने (मॅन्युअली) तयार करावे लागत आहे, ज्यामुळे प्रक्रियेस अधिक वेळ लागत आहे. परिणामी, अनेक उड्डाणांना विलंब होत आहे. यामुळे विमानतळावर वाहतूक वाढली असून प्रवाशांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे.

# PSU बँका इतिहासजमा होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत आज जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था आहे पण, तुम्हाला माहितेय का की जगातील पहिल्या १० बँकांमध्ये त्यांची एकही बँक नाही. कदाचित हीच गोष्ट सरकारला खुपत आहे.



म्हणूनच आता मेगा-बँका तयार करण्याची तयारी करत असून अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या संदर्भात सरकारचा हेतू स्पष्ट केला आहे.१२ व्या एसबीआय बँकिंग आणि अर्थशास्त्र परिषदेत निर्मला सीतारमन यांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या विलीनीकरणाचे संकेत दिले. अर्थमंत्री म्हणाल्या की, भारतीय बँका मोठ्या आणि जागतिक दर्जाच्या बनवण्यासाठी सरकार बँकिंग नियामक आरबीआय आणि बँकिंग क्षेत्राच्या प्रतिनिधींशी चर्चा करत आहे. तसेच या दिशेने काम आधीच सुरू झाले आहे आणि सरकार देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या विलीनीकरणाकडे वाटचाल करत असल्याचेही त्यांनी पुढे म्हटले.अर्थमंत्र्यांनी असेही सांगितले की सरकार पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देत आहे, ज्यामुळे गेल्या दशकात भांडवली खर्चात पाच पट वाढ झाली आहे. त्यांनी आर्थिक स्वावलंबनावर भर देत म्हटले की याचा अर्थ देश स्वतःची समृद्धी निर्माण करतो, यामध्ये अन्न सुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई), वस्त्रोद्योग आणि पर्यटन यासारख्या क्षेत्रांना प्रोत्साहन देण्याचा समावेश आहे. मोठ्या बँका निर्माण करण्याच्या प्रयत्नात सरकारने आधीच दोनदा बँकांचे विलीनीकरण म्हणजे मर्जर केले आहे. बँकिंग क्षेत्रातील सर्वात मोठ्या विलीनीकरणात सरकारने ऑगस्ट २०१९ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे चार मोठे विलीनीकरण जाहीर केले.

# जमीन घोटाळा प्रकरणी उपमुख्यमंत्री पवारांनी राजीनामा द्यावा - वडेट्टीवार

**नागपूर-** पुण्यातील कोरेगाव पार्क येथील जमिनीची खरेदी करण्यात आली,त्यावर स्टॅम्प ड्युटी माफ करण्यात आली आणि पुण्याचे पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांना यातील काहीच माहित नव्हते? या जमीन घोटाळ्याप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राजीनामा झाला पाहिजे, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.



एखादं प्रकरण झालं, ते अंगलट आले की उपमुख्यमंत्री अजित पवार हात झटकतात..आता तर पुण्यातील जमिनीचे प्रकरण आहे,त्यांच्या मुलाने व्यवहार केला आहे. प्रकरण बाहेर आल्यावर माझा याच्याशी संबंध नाही असं बोलून उपमुख्यमंत्री अजित पवार जबाबदारी झटकू शकत नाही अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.पुण्यातील जमीन घोटाळा प्रकरणी अमेडिया कंपनीने व्यवहार केला. या कंपनीत पार्थ पवार पार्टनर आहेत, त्यांच्या सह्या आहेत मग गुन्हा फक्त दिग्विजय पाटील वर का दाखल झाला? महायुती सरकार म्हणजे तू खा, मी ही खातो आणि एकमेकांना वाचवू असं संगनमताने काम सुरू आहे अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी आज नागपुरात माध्यमांशी बोलताना केली.पुणे जमीन घोटाळाप्रकरणी आता सांगण्यात येत आहे की दिग्विजय पाटील यांना व्यवहार करण्यासाठी अधिकार देण्यात आले होते,पण व्यवहार करायला पैसे आले कुठून? व्यवहार कुणामुळे झाला? कुणामुळे स्टॅम्प ड्युटी माफ झाली? पार्थ पवार यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरु आहेत, त्यामुळे या प्रकरणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली पाहिजे या प्रकरणाशी संबंधित महसूल विभागाचे अधिकारी,उद्योग संचालनालय,शीतल तेजवानी सगळ्यांची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.उपमुख्यमंत्री अजित पवार काल म्हणाले, तीन महिन्यापूर्वी कानावर आले,चुकीच्या गोष्टी मला चालणार नाही असं सांगितलं होतं.मग तेव्हाच पार्थ पवार यांना अजित पवार यांनी का थांबवले नाही? घरात हा व्यवहार होतो हे माहीत होते तेव्हाच थांबवले असते तर हा घोटाळा घडला नसता अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

# प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख नियुक्तीसाठी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये ऑनलाईन परीक्षा

**छत्रपती संभाजीनगर-** राज्यातील सर्व जिल्हा परिषदेमधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५चे ऑनलाईन पद्धतीने दि. १ ते ५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात येणार होती. काही तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव या परीक्षेचे आयोजन जानेवारी/फेब्रुवारी-२०२६ मध्ये घेण्याचे नियोजन आहे. सुधारित परीक्षेच्या तारखा लवकरात लवकर परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. या परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत दि. १० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत देण्यात आली होती. ही मुदत वाढवून आता दि. १ जानेवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे उमेदवारांचा अनुभव, शैक्षणिक पात्रता ही दि. १ जानेवारी, २०२६ रोजीची अंतिम समजण्यात येईल. त्यानुसार सर्व पात्र उमेदवारांनी, परीक्षार्थींनी विहित मुदतीत आवेदनपत्र भरण्याची कार्यवाही करावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांनी कळविले आहे.

# महिला कर्णधाराचे सिलेक्टरवर लैंगिक अत्याचाराचे आरोप

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशाच्या महिला क्रिकेट संघातील वेगवान गोलंदाज जहानारा आलम हिने माजी क्रिकेटपटू आणि निवड समितीचे माजी सदस्य मंजुरुल इस्लाम यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत.बांगलादेशच्या महिला क्रिकेट संघातील वेगवान गोलंदाज जहानारा आलम हिने माजी क्रिकेटपटू आणि निवड समितीचे माजी सदस्य मंजुरुल इस्लाम यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. सध्या मानसिक आरोग्याच्या कारणास्तव संघाबाहेर असलेली जहानारा हिने खुलासा केला की, २०२२ महिला वनडे विश्वचषकादरम्यान राष्ट्रीय संघ व्यवस्थापनातील काही लोकांकडून तिला अशोभनीय प्रस्ताव देण्यात आले होते. तिने सांगितले की, हे प्रस्ताव नाकारल्यानंतर मंजुरुल इस्लाम यांनी तिच्या कारकिर्दीत अडथळे आणण्यास सुरुवात केली. यापूर्वीही जहानाराने बांगलादेश महिला संघाच्या कर्णधार निगार सुलताना हिच्यावर मारहाणीचे आरोप केले होते. बांगलादेशी पत्रकार रियासत अजीम यांच्या यूट्यूब चॅनेलवरील मुलाखतीत जहानारा म्हणाली, 'मला एकदा नाही तर अनेक वेळा अशोभनीय प्रस्ताव दिले गेले. जेव्हा आपण संघाशी जोडलेले असतो, तेव्हा अनेक गोष्टी सांगणे अवघड होते. कारण आपली रोजीरोटी त्यावरच अवलंबून असते.' तिने सांगितले की, अनेकदा तिने बांगलादेश क्रिकेट बोर्ड च्या वरिष्ठ अधिका-यांकडे मदत मागितली, पण कोणीही काही कारवाई केली नाही.जहानारा म्हणाली की, तिने बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे सीईओ नजमुद्दीन चौधरी आणि महिला समितीच्या प्रमुख नादेल चौधरी यांच्याकडे वारंवार तक्रार केली, पण कुठलाही ठोस निर्णय घेतला गेला नाही.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# विवेकबुध्दीचा विजय

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपटसुंभ धोरणांना खुद्द अमेरिकेतच किती कडवा विरोध आहे, याचा प्रत्यय नुकत्याच झालेल्या काही निवडणुकींच्या निकालावरून सगळ्या जगाला आला असेल. या निवडणुकांत न्यूयॉर्कच्या महापौर पदाची निवडणूक सगळ्यात महत्त्वाची होती. न्यूयॉर्कचे जागतिक स्थान नव्याने सांगायला नको. सगळ्या जगातून लोक या शहरात आले आहेत. शिवाय, जगातील सर्वाधिक श्रीमंतही याच शहरात राहतात. न्यूयॉर्क नेहमीच जागतिक घडामोडींच्या केंद्रस्थानी असतं. ट्रम्प यांनी त्यामुळे तिथली निवडणूक खूपच प्रतिष्ठेची केली होती. न्यूयॉर्कच्या महापौर पदाच्या निवडीचा संबंध त्यांनी थेट अमेरिकेच्या जागतिक प्रतिष्ठेशी जोडला होता. आधी 'अमेरिकन' म्हणून आणि त्यानंतर वेगवेगळे धार्मिक गट म्हणून त्यांनी न्यूयॉर्कच्या मतदारांच्या अस्मिता परस्परांविरोधात पेटवण्याचा जोरदार प्रयत्न केला. पण, न्यूयॉर्कच्या मतदारांनी ट्रम्प यांच्या असल्या कोणत्याच प्रयत्नांना भीक घातली नाही. मूळच्या भारतीय असलेल्या, 'मान्सून वेडिंग' सारखा चित्रपट करणाऱ्या विख्यात दिग्दर्शिका मीरा नायर यांच्या मुलाला, जोहरान ममदानी यांना न्यूयॉर्कच्या मतदारांनी बहुमताने निवडून दिले. एकूण २०.५५ लाख मतदारांपैकी १०.३६ लाख मतदारांनी ममदानी यांच्या पारड्यात आपले मत टाकले. ममदानी ज्या पक्षाचे उमेदवार होते, त्याच पक्षाचे बंडखोर उमेदवार अँड्र्यू क्युमो यांना ८.५४ लाख मते मिळाली. उर्वरित मत ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराला मिळाली. ती किती कमी असतील, याचा अंदाज आपल्याला या आकडेवारीवरून येईल. सर्वाधिक श्रीमंत जिथे राहतात, त्या न्यूयॉर्कच्या मतदारांसमोर ममदानी भोजन, महागाई आणि निवाऱ्याचा, गरिबांचा जाहीरनामा घेऊन गेले आणि तरीही त्यांना नागरिकांनी भरभरून मतदान केले. यावरून ट्रम्प यांचा निषेध नोंदवण्याची तिथल्या जनतेची आस किती तीव्र आहे, हे लक्षात येते. या निवडणुकांमध्ये विजयी झालेले ममदानी हे एकटेच मूळ भारतीय नाहीत. वर्जिनिया आणि न्यू जर्सीच्या गव्हर्नर पदाच्या निवडणुकीतही ट्रम्प यांच्या पक्षाच्या उमेदवारांचा दणदणीत पराभव झाला. वर्जिनीयामध्ये डेमोक्रॅटिक पक्षाच्या गजाला हाश्मी आणि ओहायोतल्या सिनसिनाटी शहराच्या महापौरपदी आफ्ताब पुरेवाल निवडून आले. पुरेवाल यांनी तर अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हेन्सच्या सावत्र भावाचा, कोरी बोमन यांचा पराभव केला.

ममदानी यांनी निवडून येता येता बरेच विक्रमही केले. न्यूयॉर्कच्या महापौर पदावर विराजमान होणारे ते पहिले मूळ भारतीय आहेत. पहिले मुस्लीम आहेत आणि गेल्या १०० वर्षांतील सर्वात तरुण महापौर आहेत! वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी ते न्यूयॉर्क शहराचे १११ वे महापौर झाले आहेत. न्यू जर्सीमध्ये पहिल्यांदा कोणी महिला उमेदवार पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मतं घेऊन विजयी झाली आहे. अमेरिकेतली ती सर्वात खर्चिक निवडणूक ठरली आहे. तिथे प्रचारावर तब्बल १ हजार ६६० कोटी रुपये खर्च झाले. २००५ मध्ये न्यू जर्सीमध्ये १ हजार १९७ कोटी रुपये खर्च झाले होते! अमेरिकेच्या पन्नास राज्यांपैकी २४ राज्यांत आता डेमोक्रॅटिक गव्हर्नर असून २६ राज्यांत रिपब्लिकन गव्हर्नर आहेत. देशातल्या आपल्या पक्षाच्या या काठावरच्या बहुमताकडे ट्रम्प यांनी वेळीच काळजीपूर्वक पाहिले नाही, तर आणखी बरोब्बर एक वर्षाने, पुढच्या नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांच्या वर्चस्वाला सुरुंग लागलेला असेल. आपल्याबरोबरच आपल्या पक्षाला घेऊन ट्रम्प बुडतील. एखाद्या राष्ट्राध्यक्षांच्या विरोधात जनमत जाणं अमेरिकेसाठी नवे नाही. ते ज्या वेगाने आणि ज्या तीव्रतेने विरोधात जात आहे, ते जास्त चिंताजनक आहे. ट्रम्प यांच्या घोषणांतील पोकळपणा तिथल्या जनतेने ओळखल्याचं हे द्योतक आहे. अमेरिकनांनीच ट्रम्प यांच्यावर असा अविश्वास दाखवला, तर त्यांच्या जगभर चाललेल्या अनावश्यक उठाठेवींना आपोआपच आळा बसण्याची शक्यता आहे. त्यातला जोर जाईल. ट्रम्प यांचा आत्मविश्वास डळमळीत होईल. ट्रम्प यांची दादागिरी जगात कोणीच चालू देणार नाही. पाकिस्तानचा अपवाद सोडून! अमेरिकेतले डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन हे दोन्ही पक्ष कमीअधिक भांडवलदारीच आहेत. ममदानी यांचे वैशिष्ट्य असे, की त्यांनी उघडपणे लोकशाही समाजवादी असल्याचे सांगितले आणि त्याच भूमिकेवर निवडणूक लढवली. ट्रम्प यांनी त्यांच्यावर कम्युनिस्ट शिक्का मारण्याचा प्रयत्न केला. पण, मतदारांनी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. ममदानी साम्यवाद्यांची शासन नियंत्रित अर्थव्यवस्था मांडत नसून त्यांच्या अजेंड्यामध्ये न्यायाच्या कल्पना आहेत, हे तिथल्या मतदारांनी मान्य केले. ममदानी हे मुस्लीम असल्याने, पॅलेस्टाईनचे कट्टर समर्थक असल्याने तिथे मोठ्या प्रमाणावर असलेला ज्यू समाज त्यांना मतदान करणार नाही, हा ट्रंप यांचा विश्वासही ज्यू मतदारांनी सपशेल खोटा ठरवला. सर्व लहान मुलांसाठी मोफत बालसंगोपन केंद्रे, अनुदानित घरांच्या भाडेवाडीला प्रतिबंध, सरकारी बसमध्ये सर्वांना मोफत प्रवास आणि जीवनावश्यक वस्तूंची सरकारी दुकाने- या ममदानी यांच्या जाहीरनाम्याला लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आपल्याला, आपल्या आवाहनांना आणि अजेंड्याला लोकांनी नाकारले, हे ट्रम्प यांच्या पचनी पडणे शक्यच नाही. त्यामुळे, त्यांनी 'मतपत्रिकेवर माझे छायाचित्र नव्हते' असे लंगडे कारण पुढे करून त्यामुळे, रिपब्लिकन उमेदवारांचा पराभव झाला, असे सांगण्याचा प्रयत्न चालवला आहे. ते देत असलेले शटडाऊनचे दुसरे कारण मात्र खरे आहे. ३६ दिवस चाललेल्या शटडाऊनने ट्रम्पना धडा शिकवला. या शटडाऊनमुळे नऊ लाख कर्मचाऱ्यांचं वेतन थकलं आहे. आणखी २० लाख कर्मचारी काम करताहेत. पण, त्यांच्या वेतनाबद्दल पूर्ण अनिश्चितता आहे. लोकशाही समाजवादी विचारांच्या उमेदवाराच्या विजयाचा मार्ग ट्रम्प यांनीच प्रशस्त करून दिला आहे. रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांच्या पराभवाला ट्रम्प जबाबदार आहेतच. पण, हे उमेदवार हरले, म्हणून डेमोक्रॅटिक उमेदवार जिंकले, असे नाही. डेमोक्रॅटिक उमेदवारांच्या विजयाला ट्रम्प यांनी स्वतःच्या उपटसुंभ, बालिश धोरणांनी आणि वक्तव्यांनी वाट करून दिली. त्यामुळे, त्यांचे उमेदवार पराभूत झाले, हे अधिक खरे आहे. ममदानी यांनी आपल्या विजयानंतर आनंद साजरा करताना 'धूम मचाले धूम...' या हिंदी गाण्यावर नृत्य केलं. त्यांनी केलेली गाण्याची निवड या अर्थाने खरोखरच सार्थ आहे.

# सावकारांच्या कर्जाचे आव्हान



**गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकरी सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात सापडलेले दिसतात. शेतकऱ्यांना सावकारांच्या कर्जातून वाचवून सरकारी व सहकारी कर्जांच्या छत्राखाली आणणे आवश्यक झाले आहे.**

अलीकडेच राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) प्रसिद्ध केलेल्या ग्रामीण धारणा सर्वेक्षण अहवाल २०२५ मध्ये ग्रामीण भारतातील कर्ज वितरण आणि त्यासंबंधी अडचणींवर काही अतिशय महत्त्वाच्या बाबी नमूद झाल्या. या अहवालातील पहिली महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागात ५४.५ टक्के कुटुंबे आता केवळ औपचारिक स्त्रोतांद्वारेच (प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी संस्था, सूक्ष्म वित्त संस्था इ.) कर्ज घेत आहेत. हा टक्का सर्वेक्षण सुरू झाल्यापासूनचा सर्वाधिक आहे. औपचारिक स्त्रोतांतून कर्ज देताना काही ठरावीक सरकारी नियम व व्याजदर लागू असतात, त्यामुळे शेतकऱ्यांना शोषणापासून संरक्षण मिळते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भारतात औपचारिक कर्ज व्यवस्थेत सुधारणा झाली असली, तरी अजूनही अनेक कुटुंबे सावकार, नातेवाईक, मित्र व इतर अनौपचारिक स्त्रोतांवर अवलंबून आहेत. सुमारे २२ टक्के ग्रामीण कुटुंबे पूर्णपणे सावकारांवर आणि अनौपचारिक स्त्रोतांवर अवलंबून आहेत. या वर्गाकडून अजूनही १७-१८ टक्क्यांपेक्षा अधिक व्याजदराने कर्ज दिले जाते.

अहवालात असेही नमूद आहे की २३.५ टक्के कुटुंबे औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही स्त्रोतांवरून कर्ज घेतात.

२०१९ मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजना ही लहान शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधारस्तंभ ठरली. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ९.७ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना २० हप्त्यांमध्ये ३.९ लाख कोटी रुपये देण्यात आले. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री स्वामित्व योजनेअंतर्गत ग्रामीण नागरिकांना त्यांच्या जमिनीचा कायदेशीर हक्क मिळवून देण्यात येत असून, त्यामुळे त्यांचे आर्थिक सशक्तीकरणाचे नवे पर्व सुरू झाले आहे. परंतु, अजूनही २२ टक्के ग्रामीण लोकसंख्या सावकार आणि अनौपचारिक स्त्रोतांवर अवलंबून आहे. त्यामुळे लहान शेतकऱ्यांची आर्थिक सुरक्षा धोक्यात येत आहे. जेव्हा या शेतकऱ्यांना उत्पन्नातील अस्थिरता, ऋतुमानिक जोखमी आणि सरकारकडून अपुऱ्या निधी हस्तांतरणाची समस्या भेडसावते, तेव्हा ते सावकारांच्या दाराशी मदतीसाठी पोहोचतात. व्याजदर प्रचंड असले तरी त्याशिवाय दुसरा पर्यायच या शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसतो.

शेतकरी औपचारिक स्त्रोतांद्वारे कर्ज घ्यायचे ठरवतात; पण कागदपत्रांची कमतरता, हमीदारांचा अभाव आणि इतर कठीण अटींमुळे ते मागे हटतात. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या अहवालानुसार, सुमारे ५० टक्के कृषी कुटुंबे कर्जबाजारी आहेत. त्यांना संस्थात्मक बँकांबरोबरच गैरसंस्थात्मक स्त्रोतांवर म्हणजे सावकार व नातेवाईकांवर अवलंबून राहावे लागते. अनेकदा शेतकऱ्यांना जड व्याजामुळे मूळ रक्कम फेडता येत नाही आणि व्याजाचा भार कमी करण्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागते. अशा रीतीने ते सावकारांच्या कर्जजाळ्यात अडकत जातात. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२४-२५ च्या वार्षिक अहवालानुसार, मार्च २०१० मध्ये ग्रामीण भागात ३३,३७८ बँक शाखा होत्या, तर डिसेंबर २०२४ पर्यंत हा आकडा ५६,५७९ वर पोहोचला आहे. सहकारी संस्थांचेही नवे जाळे उभे राहिले आहे. मात्र, सावकारांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी फक्त शाखा वाढविणे पुरेसे नाही.

छोटे व अल्पमुदतीचे कर्ज प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लघुउद्योग आणि उद्योजकांना विश्वासार्ह संस्थात्मक आर्थिक सेवा मिळाव्यात, यासाठी ठोस उपाययोजना कराव्या लागतील.

**डॉ. जयंतीलाल भंडारी**

# सांगली पॅटर्न : कृषी विकासाची नवी दिशा

पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या पाठबळामुळे हा प्रायोगिक टप्पा यशस्वी झाला असून, यापुढे दररोज किंवा आठवड्यातून एकदा असे रेल्वे मार्गाचे नियोजन करण्यात येणार आहे. या पॅटर्नचा उद्देश सांगलीचा जीडीपी आणि प्रति व्यक्ती उत्पन्न वर्षाला लाखाने वाढवणे हा आहे. सांगली पॅटर्न हे शेतकऱ्यांच्या मालाला थेट बाजारपेठ जोडण्यावर आधारित आहे. जिल्ह्यातील कृषी विभाग, रेल्वे आणि शेतकरी संघटनांच्या एकत्रित प्रयत्नाने हे शक्य झाले. जिल्हाधिकारी काकडे यांनी कृषी विभागाचे अधीक्षक विवेक कुंभार आणि इतर अधिकाऱ्यांच्या मेहनतीने हा उपक्रम साकारला. प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या योजनेतून शेतकऱ्यांना मिरज रेल्वे स्टेशनवरून दिल्लीपर्यंत माल पाठवता आला, ज्यामुळे वाहतुकीचा खर्च ४० टक्क्यांनी कमी झाला. सांगली जिल्ह्यातील राष्ट्रीय कृषी विकास योजना (आरकेव्हीवाय) अंतर्गत ठिबक सिंचन, ड्रोन फवारणी आणि नॅनो युरिया सारख्या तंत्रज्ञानांचा वापर आधीच सुरू आहे, ज्यामुळे उत्पादनात १५-२० टक्के वाढ झाली आहे. या पॅटर्नमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वर्षाला ५० हजारांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे, ज्यामुळे जिल्ह्याचा जीडीपी १० टक्क्यांनी उंचावेल. या यशामागे कृष्णा नदी बेसिनची भूमिका महत्त्वाची आहे. सांगली हा कृष्णा नदीच्या टापूवर वसलेला असल्याने, नदीचे पाणी सिंचनासाठी उपयुक्त ठरते. कोयना धरण आणि वारणा नदी यांचा सहभाग असल्याने, जिल्ह्यातील ७५ टक्के शेती सिंचित आहे. जर कोल्हापूर आणि सातारा येथे हे पॅटर्न अवलंबले, तर दक्षिण महाराष्ट्रातील एकात्मिक विकास शक्य होईल.

कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांत पॅटर्नची संभाव्यता

कोल्हापूर आणि सातारा हे दोन्ही जिल्हे सांगलीसारखेच



कृष्णा-कोयना-पंचगंगा बेसिनमध्ये येतात. कोल्हापूरमध्ये पंचगंगा नदीचे पाणी ऊस, भाजीपाला आणि दूध उत्पादनासाठी वापरले जाते, तर सातारामध्ये कोयना धरणामुळे फळबागायती शेती प्रगतिपथावर आहे. या जिल्ह्यांत सांगली पॅटर्न राबवण्याची पूर्ण क्षमता आहे, कारण इथे आधीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना यांसारख्या केंद्र-राज्य योजनांखाली विहिरी, शेततळे आणि यांत्रिकीकरणाला चालना मिळत आहे. कोल्हापूर जिल्हा कोल्हापूरमध्ये १२ लाख हेक्टर शेतीक्षेत्र आहे, ज्यात ६० टक्के सिंचित आहे. पंचगंगा नदी बेसिनमुळे इथे भाजीपाला आणि फळ उत्पादन भरपूर होते, पण बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात. सांगली पॅटर्नप्रमाणे रेल्वे वॅगन जोडले, तर कोल्हापूरच्या मिरज मार्गाने दिल्ली, मुंबई किंवा बेंगलोरला माल पाठवता येईल. जिल्हा परिषद कोल्हापूरमार्फत राबवल्या जाणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण योजनेत ट्रॅक्टर, ड्रोन आणि प्लास्टिक मल्चिंगसाठी ५० टक्के अनुदान मिळते, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होईल. कोल्हापूरमधील हातकणंगले तालुक्यातील शेतकऱ्यांना विशेष वॅगनमुळे टोमॅटो आणि काकडीसाठी दिल्ली बाजारात ३०-४० रुपये प्रति किलो दर मिळू शकतो, ज्यामुळे सध्याच्या १५-२० रुपयांच्या तुलनेत उत्पन्न दुप्पट होईल. जिल्ह्यातील २ लाख शेतकऱ्यांना फायदा होईल आणि जीडीपीमध्ये ८-१० टक्के वाढ होईल. मात्र, पावसाळ्यात पूरप्रवण क्षेत्र असल्याने जलसंधारण योजना (आरकेव्हीवाय अंतर्गत) सोबत जोडावी लागेल.

सातारा जिल्हा : सातारा हा कोयना धरणाचा जिल्हा असून, ११ लाख हेक्टर शेतीमध्ये फळे, ऊस आणि द्राक्षाची लागवड प्राबल्य आहे. जिल्हा परिषद सातारामार्फत बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना आणि परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेतीसाठी ६ लाखांपर्यंत अनुदान) राबवल्या जात आहे. सांगली पॅटर्न इथे लागू केले, तर कराड-महाबळेश्वर मार्गावरील शेतकऱ्यांना रेल्वेने मुंबई किंवा दिल्लीला द्राक्ष आणि स्ट्रॉबेरी पाठवता येतील. सध्या शेतकऱ्यांचे ४० टक्के उत्पन्न मध्यस्थांमुळे कमी होते; या पॅटर्नमुळे ते थेट विक्रीने वाढेल. सातारामध्ये शासन आपल्या दारी योजनेतून ७५,००० शेतकऱ्यांना लाभ मिळतो, ज्यामुळे रेल्वे उपक्रमाची अंमलबजावणी सोपी होईल. प्रति व्यक्ती उत्पन्न सध्या १.५ लाख असून, वर्षाला लाखांची वाढ शक्य आहे.

नदी बेसिनचा एकात्मिक विकास : कृष्णा-कोयना-पंचगंगेची भूमिका

दक्षिण महाराष्ट्रातील कृष्णा नदी बेसिन (क्षेत्रफळ २.६ लाख चौरस किमी) हे तीन नद्यांच्या (कृष्णा, कोयना, पंचगंगा) संगमावर आधारित आहे, ज्यामुळे ७६ टक्के क्षेत्र कृषी प्रधान आहे. कोयना धरण (१०५ टीएमसी क्षमता) आणि पंचगंगा नदीमुळे सिंचनाची सोय आहे, पण जलविवाद आणि पूर यामुळे आव्हाने आहेत. सांगली पॅटर्न तीनही जिल्ह्यांत राबवले, तर बेसिन-आधारित विकास शक्य होईल: एकीकृत सिंचन नेटवर्क (प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत), सामूहिक शेततळे आणि रेल्वे-लॉजिस्टिक्स जोड. यामुळे ५ लाख हेक्टर क्षेत्रात उत्पादन २० टक्क्यांनी वाढेल आणि दूध, भाजीपाला निर्यात वाढेल. अभ्यासानुसार, नदी बेसिनमध्ये खनिजसंपदा आणि औद्योगिक संभाव्यता (जसे साखर कारखाने) असल्याने कृषी-उद्योगांची जोड शक्य आहे. कृष्णा जल विवाद अधिकरणाच्या शिफारशींनुसार (२०१६), महाराष्ट्राला ६५ टक्के पाणी हिस्सा मिळतो, ज्याचा वापर त्या दक्षिण भागात वाढवावा. यातच गरजेनुसार सेंद्रिय शेती आणि ड्रोन तंत्रज्ञान (परंपरागत कृषी विकास योजना) जोडले, तर पर्यावरणस्नेही विकास होईल. आव्हाने आणि उपाय सांगली पॅटर्नची विस्तारात अडथळे आहेत: रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चरची कमतरता, मालाची टिकाऊपणा आणि जलविवाद. कोल्हापूरमध्ये पूर, सातारामध्ये डोंगराळ भाग हे आव्हाने आहेत. उपाय म्हणून : १) एकत्रित जिल्हा कृषी समिती स्थापन करणे, २) आरकेव्हीवाय अंतर्गत १०० कोटी निधी वाटप, ३) शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ) विकसित करणे शक्य आहे. शासनाने 'शासन आपल्या दारी' योजनेप्रमाणे शिबिरे घेऊन जागृती करावी.

दक्षिण महाराष्ट्राची नवी ओळख

सांगली पॅटर्न कोल्हापूर-सातारा जिल्ह्यांत राबवले, तर दक्षिण महाराष्ट्र हा कृषी हब बनेल. कृष्णा-कोयना-पंचगंगेच्या टापूवर १० लाख शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, जीडीपी १५ टक्क्यांनी उंचावेल आणि प्रति व्यक्ती उत्पन्न लक्ष्य साध्य होईल. हे केवळ शेती नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा क्रांतिकारक टप्पा असेल. जिल्हाधिकारी काकडे आणि पालकमंत्री पाटील यांसारख्या नेत्यांच्या धडपडीने हा स्वप्नासारखा विकास प्रत्यक्षात येईल, ज्यामुळे दक्षिण महाराष्ट्र 'उत्पन्न वाढवणाऱ्या विकासाचे' उदाहरण बनेल.

## भूखंड खरेदी वाद पार्थ पवारांवर

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार हे संचालक असलेल्या 'अमेडिया एन्टरप्रायझेस एलएलपी' -या कंपनी द्वारा पुण्यातील एका मोठ्या भूखंडाच्या खरेदी-विक्री व्यवहारात अनियमितता केल्याचा आणि शासनाची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप होत आहे. हा भूखंड पुण्याच्या कोरेगाव पार्क परिसरा जवळ सुमारे ४० एकरचा आहे. हा आरोप करणाऱ्या पक्षांचा दावा आहे की, या जमिनीची बाजारपेठेतील किंमत कोट्यावधी रुपयात आहे पण ती फक्त ३०० कोटी रुपयांना खरेदी करण्यात आली. कंपनीने स्टॅम्प ड्युटी मध्ये मोठी सवलत मिळवली किंवा ती माफ करवून घेतली, ज्यामुळे शासनाचे मोठे महसुली नुकसान तर झाले पण या सरकारी जमीनीची खरेदी विक्री होऊ शकत नियमुसार असा गंभीर त्याद्वारा केला गेला आहे.

या आधी राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांनी सुद्धा भोसरी मध्ये एक भुखंड खरेदी करतांना मंत्री असतानाच त्यांच्या पत्नीच्या नावाने भुखंड खरेदी मध्ये बाजार किंमती पेक्षा किंमत दाखवून शासनाची फसवणूक केली होती. पुढे या प्रकरणी त्यांना राजीनाम देण्यास भाग पडले होते. अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात १९९८ मध्ये पुण्यातील कोंढवा बुद्रुक येथील सुमारे २९ एकर राखीव वन जमीन नामांकित बांधकाम व्यावसायिकाला देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी बेकायदा ठरविला. 'राज्याचे तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणे व पुण्याच्या तत्कालीन विभागीय आयुक्तांनी जनतेच्या विश्वासाचा भंग करून मौल्यवान वनजमिनीचा खासगी व्यक्तींना बेकायदा लाभ दिला,' असे कडक ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने ओढले आहे. वन जमीन म्हणून राखीव असलेल्या; परंतु महसूल विभागाच्या ताब्यात असलेल्या या जमिनीचा ताबा तीन महिन्यांच्या आत वन विभागाकडे देण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. ही सगळी पार्श्वभूमी माहीत असताना पार्थ पवार संचालक असलेल्या कंपनी द्वारा व्यवहार व्हावेत आणि राजकीय दृष्टा आपल्याच राज्याच्या उपमुख्यमंत्री पदावरील वडिलांना अडचणीत आणले जावे. यावर माध्यमांसमोर प्रतिक्रिया देताना अजित दादा पवार किती ही सांगत असले की यातले मला काही माहित नाही हे सगळे दावे एकवेळ खरे मानले तरी राजकीय दृष्टया ते अडचणीत आले आहे. या आरोपांवर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च स्तरावर चौकशीचे आदेश दिले असून संबंधित महसूल अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे.

**अविनाश देशपांडे**

## ममदानी यांचा विजय

न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदी डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार जोहरान ममदानी यांना न्यूयॉर्क शहरातील नागरिकांनी निवडून दिले आहे. त्यांचा विजय हा अमेरिकन महानगरांच्या राजकारणात कामगार, स्थलांतरित, तरुण, अल्पसंख्यांक वर्गांच्या भावना आणि आकांक्षा एकवटल्यामुळे मिळालेला विजय आहे. या विजयात सारासार विवेकबुद्धी अजूनही सुरक्षित असलेल्या बहुसंख्यांकांचा वाटा आहे. आफ्रिकन विद्वान वडील आणि सामान्य भारतीय राजकारण्यांची परंपरा नसलेल्या आईच्या पोटी जन्मलेल्या जोहरान यांनी समाजकार्यातून लोकप्रियता मिळवली. ममदानी यांना विजयापूर्वी देशोदेशींच्या नागरिकांना स्थलांतरितांचे राजकारण करण्यासाठी पूर्वी झगडावे लागले होते आता तशी परिस्थिती राहिली नाही. कदाचित यामुळेच अमेरिकेत सामाजिक न्याय देणारा परिवर्तनीय निर्णय हा अमेरिकेपुरता मर्यादित न राहता जगभर पसरण्याच्या शक्यता नाकारता येणार नाही.

**स्नेहा राज**

## स्थानिक भाषा जाणणाऱ्यांना नियुक्ती करावी

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मुंबईत १२ व्या एसबीआय बँकिंग आणि अर्थशास्त्र परिषदेत बोलताना 'स्थानिक लोकांशी जोडले जाण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक कर्मचाऱ्यांना स्थानिक भाषेचे ज्ञान आहे' याची खात्री संबंधित बँकांनी करावी असे आवाहन केले. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे कर्मचारी स्थानिक भाषांमध्ये बोलत नसल्यामुळे अनेक ठिकाणी स्थानिक लोक आणि बँक कर्मचारी यांच्यात अनेकदा संघर्ष उफाळून येतो. अशाच एका घटनेतून मे महिन्यात बेंगळुरूमधील सूर्या नगर येथील शाखा व्यवस्थापकाने कन्नडमध्ये बोलण्यास नकार दिल्यामुळे एसबीआयला माफी मागावी लागली होती. अशा परिस्थितीत या बँकांच्या नियुक्त्या करताना स्थानिक भाषा बोलणारे कर्मचारी नियुक्त करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे पाच वर्षांपूर्वी, १ ऑक्टोबर २०२० रोजी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या अधिकाऱ्यांसाठी असलेल्या आभासी (वर्चुअल) प्रशिक्षण कार्यक्रमाच्यावेळी आणि तीन वर्षांपूर्वी, १६ सप्टेंबर २०२२ रोजी मुंबईतील इंडियन बँक्स असोसिएशनच्या ७५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना त्यांनी अशाच प्रकारचे म्हणजे बँकांना स्थानिक भाषा बोलणारे कर्मचारी नियुक्त करण्याचे आवाहन केले होते. केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या या वारंवारच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन बिगर हिंदी राज्यात स्थानिक लोक आणि बँक कर्मचाऱ्यांचा भाषेवरून होणारा संघर्ष टाळण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँका आतातरी स्थानिक भाषा जाणणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतील अशी अपेक्षा आहे.

**प्रदीप मोरे**

## रामपूर आणि मुधोळ

देशभक्त रामपूर आणि मुधोळ ही नावे आहे भारतीय जातीच्या सैनिकी श्वान यांची. हे ऐकून आश्चर्य वाटले असेलच पण हे खरे आहे. ३१ ऑक्टोबरला सरदार पटेल यांच्या जयंतीच्या दिवशी गुजरात मधील केवडडिया येथे एकता दिवस साजरा करण्याच्या कार्यक्रमात बी एस एफ च्या सैनिकांनी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि छाती अभिमानाने फुलून यावी अशी प्रात्यक्षिक सादर केली ही प्रात्यक्षिके सैनिकांची नव्हती तर ती होती सैन्यातील प्रशिक्षित शिकारी श्वानांची. अत्यंत उमद्या, चपळ आणि आक्रमक परंतु तितक्याच शांत अश्या या भारतीय जातीच्या रामपुरी आणि मुधोळ शिकारी श्वानांनी सैनिकी कारवायात उपयुक्त अशी चकित करणारी प्रात्यक्षिके सादर केली. आत्तापर्यंत पोलीस आणि सैन्य यांच्यासाठी जर्मन शेफर्ड, लॅब्रेडोर किंवा डॉबरमॅन अशा विदेशी श्वानांचा वापर केला जात होता. आता तब्बल १५० स्वदेशी श्वानांची तुकडी सीमा सुरक्षा दलाच्या सैनिकांनी अत्यंत कष्टपूर्वक प्रशिक्षण देऊन सिद्ध केली आहे. ख-९ या सैन्य तुकडीतील हे श्वान भारतीय सीमांचे रक्षण करत आहे जणू ते प्रति सैनिकच आहे. आत्मनिर्भर भारताच्या अनेक अनेकविध पैलू पैकी हाही महत्त्वाचा पैलू आज कृतिशील होऊन समोर आला आहे. पाच वर्षांपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी भारतीय जातीच्या श्वानांचा वापर करण्याविषयी आग्रह केला होता. सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दल यांच्या सैनिकांनी मोठी साथ दिली आणि मेहनत घेतली त्याचे उत्कृष्ट फळ आज या सुरक्षारक्षकांच्या श्वानांच्या रूपाने मिळाले आहे. गेली दोन वर्षे भारतीय सीमा अन नक्षल प्रभावित क्षेत्र यांचे रक्षण हे श्वान सैनिकांच्या पायाला पाया लावून करत आहे. सैनिकांप्रमाणे अत्यंत कठीण जोखीम पत्करणाऱ्या कारवायात सहभागी करून घेणाऱ्या प्रशिक्षणात सीमांचे रक्षण, घुसखोरी रोखणे, आतंकवादांच्या अंगावर धावून जाणे, आतंकवाद यांच्या विरोधातील विविध कारवायांसाठी सक्षम बनवणे इतकेच नव्हे तर हेलिकॉप्टर मधून दोरीने खाली उतरणे नदीपार करणे यांचेही प्रशिक्षण दिले आहे. भारतीय जातीचे श्वान असल्याने देशाच्या वातावरणात अधिक चांगल्या प्रकारे राहू शकतात. मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर मधून टेकनपुर येथील राष्ट्रीय श्वान प्रशिक्षण केंद्रात चार स्वदेशी जातींच्या श्वानांचे प्रजनन आणि प्रशिक्षण केंद्र बनले आहे. गेल्या वर्षी पोलीस ड्युटी मीट या श्वान प्रशिक्षण स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येथे प्रशिक्षित मुधळ जातीच्या रियाला नेण्यात आले होते तेव्हा प्रेक्षकांसह परीक्षकांनी हा कुठला जातीचा कुत्रा आणला आहे असे म्हणून हिणवले पण जेव्हा तिने तब्बल ११६ हुन अधिक विदेशी कुत्र्यांना हरवून चॅम्पियनशिप ची दोन सुवर्णपदके जिंकली तेव्हा सर्व आश्चर्यचकित झाले आणि भारतीय जातीचे श्वान सर्वश्रेष्ठ असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

**लीना गाडगीळ**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय

# नरेश राजाच्या राजवटीत ऑनलाइन भिंगरीला सुगीचे दिवस !

## अवधूत वाडी पोलिस प्रशासनाचे मौन संशयास्पद, रहदारीच्या ठिकाणी, पॉश कॉलनीतही खुलेआम अवैध जुगार व्यवसाय सुरू

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - एकीकडे जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता "ऑपरेशन प्रस्थान" या मोहिमेद्वारे गुन्हेगारांना सुधारणेच्या मार्गावर आणण्यासाठी प्रयत्नशील असताना, दुसरीकडे अवधूत वाडी पोलीस स्टेशन अंतर्गत मात्र अवैध ऑनलाइन भिंगरी आणि मटका व्यवसाय उघड्यावर फोफावला आहे. विशेष म्हणजे हा अवैध व्यवसाय रहदारीच्या ठिकाणी, चौकाचौकात, अगदी पोलिस चौकीच्या शेजारीच सुरू आहे, आणि तरीही पोलीस प्रशासन मौन बाळगून आहे. श्रद्धेचे ठिकाण असलेल्या यवतमाळच्या आठवडी बाजारात तसेच शारदा चौक परिसरात खुलेआम ऑनलाइन भिंगरीचा व्यवसाय सुरू असून, त्याठिकाणी रोज जुगाराचा व्यवहार होतो. याच परिसरातील पोलिस चौकीच्या काही फूट अंतरावर हा प्रकार सुरू असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. पुढे जाणारा हा विषारी प्रवाह आता पॉश कॉलनींमध्येही शिरला आहे. शहराच्या नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांच्या घराच्या शेजारी, तसेच आर्णी रोडवरील अग्निशामक दल कार्यालयासमोरील दावत हॉटेलखाली हा व्यवसाय




खुलेआम सुरू असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. या अवैध जुगारामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक व मानसिक नुकसान होत असून, काहींनी सावकारांकडून घेतलेले कर्ज फेडता न आल्याने आत्महत्येचा मार्ग पत्करल्याचे गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत. शहरातील युवक आणि विद्यार्थीवर्ग झटपट पैसा मिळवण्याच्या मोहात या अवैध जाळ्यात अडकत असून, भविष्यात ही पिढी अंधारात जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एका बाजूला पोलीस प्रशासन गुन्हेगारांना सुधारण्याचे ध्येय घेत आहे, आणि दुसऱ्या बाजूला शहरातच गुन्हेगारी सह जुगारी नवी पिढी तयार होत आहे.अशी तीव्र खंत नागरिकांनी व्यक्त केली. या सगळ्या प्रकाराकडे पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे का? की नरेश यांचे या अवैध धंद्यामागे संरक्षण आहे? असा गंभीर प्रश्न नागरिक विचारत आहेत. "पोलिसांना यापासून चिरीमिरी मिळते का?" अशी चर्चा शहरभर रंगत आहे. नागरिकांनी या प्रकरणात तातडीने ठोस कारवाईची मागणी केली असून, "ऑपरेशन प्रस्थान"चे खरे उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर प्रथम शहरातील हा ऑनलाइन भिंगरी आणि मटकाचा महासापळा फोडणे गरजेचे आहे, अशी मागणी शहरातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व व्यापारीवर्गाने केली आहे.

**सामान्य नागरिकांचा संताप**

---

### नगरपरिषद निवडणुका नामनिर्देशन पत्र स्वीकृतीच्या वेळेत स्पष्टता

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ – जिल्ह्यातील नगरपरिषद यवतमाळ, पुसद, वणी, उमरखेड, दिग्रस, पांढरकवडा, दारव्हा, घाटंजी, नेर-नबाबपूर, आर्णी तसेच नगरपंचायत ढाणकी यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी यापूर्वी दि. १० नोव्हेंबर २०२५ ते दि. १७ नोव्हेंबर २०२५ असा जाहीर करण्यात आला होता. मात्र, राज्य निवडणूक आयोगाने या कालावधीबाबत अधिक स्पष्टता आणत नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याची वेळ निश्चित केली आहे. त्यानुसार उमेदवारांकडून नामनिर्देशन पत्रे दि. १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्वीकारली जातील. याबाबतची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विकास मीना यांनी दिली असून, संबंधित उमेदवारांनी या वेळापत्रकानुसार आपली नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# मधूकरनगरमध्ये लोखंडी मुठ असलेला सुरा घेवून दहशत निर्माण करणाऱ्या इसमांवर गुन्हा दाखल

## स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांची कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - यवतमाळ जिल्हयात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, अवैध शस्त्र, अवैध उत्खन्न सुरु राहणार नाही तसेच अउघड गुन्हे, आरोपी शोध, अवैध धंदयाचे समूळ उच्चाटन व्हावे याकरीता मा. पोलीस अधीक्षक कुमार चिंता सा यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांना आदेशीत केले होते. त्याच अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी त्याचे अधिस्थान पथकांना गोपनिय माहीती काढून प्रभावी छापा कारवाई करणे बाबत सुचना दिल्या आहेत.

6 नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पुसद उपविभागात अउघड गुन्हे, आरोपी शोध, पेट्रोलींग करीत असतांना मधुकर नगर येथील इसम नामे राजू अशोक चांदणे हा स्वतःच्या ताब्यात दहशत निर्माण करण्याकरीता लोखंडी मुठ असलेला सुरा घेवून फिरत तो सार्वजनिक ठिकाणी शांतता व सुव्यवस्था भंग करुन दखलपात्र गुन्हा करण्याची शक्याता आहे अशी मुखबीरव्दारे खात्रीशिर माहीती मिळाल्याने पोलीस



अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी दोन पंचासह मधूकर नगर येथे जावून इसम नामे-राजू अशोक चांदणे हा त्याचे घरी ओठयावर मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या कमरेला एक गोल मुठ असलेला सुरा किंमत 1500/- रु मिळून आल्याने ते जप्त करुन ताब्यात घेवून इसम नामे-राजू अशोक चांदणे वय 40 वर्ष रा. मधुकर नगर पुसद ता. पुसद जि. यवतमाळ यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वसंतनगर येथे कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता सा, मा.अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. अशोक थोरात सा, मा. पोलीस निरीक्षक श्री. सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांचे मार्गदर्शनात सपोनि/धिरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, स. फौ/मुन्ना आडे, पोहवा/संतोष भोरगे, पोहवा/तेजाब रणखांब, पोहवा सुभाष जाधव, पोहवा कुणाल मुंडोकार, पोहवा रमेश राठोड, पोशि/सुनिल पंडागळे, चा.पो. उप.नि. रविद्र शिरामे, चापोशि राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---

# यवतमाळ नगर परिषदेसाठी अनुसूचित जमातीचे राजकीय वातावरण तापले !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ नगर परिषदेच्या इतिहासात प्रथमच नगराध्यक्ष पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाले असून, या निर्णयामुळे शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. आदिवासी समाजात उत्साहाचे वातावरण असून विविध आदिवासी संघटना आणि संभाव्य महिला उमेदवारांकडून निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे.

या आरक्षणामुळे अनेक पक्षांतील कार्यकर्ते आणि अपक्ष नेते स्वतःचा प्रभाव निर्माण करण्यासाठी सज्ज झाले असून, यंदाची अध्यक्षपदाची लढत अत्यंत महत्वाची आणि रोचक ठरणार आहे. सध्या मंत्रीपद भूषविणारे आणि स्वतःला यवतमाळ नगर परिषद राजकारणापासून दूर असल्याचा आव दाखवून एक ज्येष्ठ मंत्री मात्र 'घरचा उमेदवार' उभा करण्याच्या तयारीत असल्याची विश्वसनीय माहिती राजकीय वर्तुळातून पुढे आली आहे. त्यामुळे त्यांच्या पक्षात अंतर्गत नाराजी वाढत असून, दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. इतर उमेदवार नगराध्यक्ष पदाकरिता असताना राजकीय व सत्तेच्या जोरावर घरचा आहेर घेत उमेदवार उभ्या केल्या जात असल्याने ही नाराजी दिसून येत आहे. मागील निवडणुकीत यवतमाळ नगर परिषदेवर शिवसेनेचा झेंडा फडकला होता. बाळासाहेब चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष पद मिळाले होते. मात्र यंदा भाजपकडे संघटनात्मक व प्रशासकीय दोन्ही स्तरांवर बळ असल्याचे दिसते. माजी आमदार मदन येरावर यांचे नगर परिषद येथे प्रशासकीय अधिकारी याच्याशी स्नेहपूर्ण संबंध असल्याने त्यांच्या पसंतीचा उमेदवारही रिंगणात येऊ शकतो, अशी चर्चा आहे. दरम्यान, राळेगाव मतदार संघातील आदिवासी मंत्री यांनी स्वतःच्या कन्येला राजकारणात उतरविण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र त्यांच्या पक्षात यावरून अंतर्गत विरोधाचे वारे सुरू असून काही ज्येष्ठ कार्यकर्ते नाराजी व्यक्त करत असल्याचे समजते. दुसरीकडे, उच्चशिक्षित तेजस्विनी एका आदिवासी सामाजिक संघटनेच्या पाठबळावर काँग्रेस किंवा मित्र पक्षा कडून उमेदवार म्हणून निवडणुकीत उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवावी का, यावरही चर्चेची लगबग सुरू आहे. त्यामुळे यवतमाळ नगर परिषदेतील आगामी अध्यक्षपदाची निवडणूक ही केवळ सत्ता स्थापनेसाठी नव्हे, तर आदिवासी नेतृत्व उदयासाठी निर्णायक ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

---

### विजयबाबू चोरडिया यांची शिवसेना जिल्हा संघटकपदी नियुक्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - सामाजिक कार्यकर्ते व दानशूर व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेले विजयबाबू चोरडिया यांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या प्रभारी जिल्हा संघटकपदी (वणी व राळेगाव विधानसभा) नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार पक्षाचे सचिव संजय मोरे यांच्या स्वाक्षरीने झाली. नियुक्तीचे श्रेय त्यांनी पालकमंत्री संजय राठोड, विश्वास नांदेकर व विनोद मोहितकर यांना दिले आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांचा प्रचार करत पक्षवृद्धीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या नियुक्तीनंतर वणी परिसरात जल्लोषाचे वातावरण असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---


# निवडणुका आल्याकीच रस्त्यांना आठवण थातुर-मातुर कामांवर नागरिकांची नाराजी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - नगर परिषदेची निवडणूक जसजशी जवळ येते, तसतसे शहरातील रस्त्यांवर अचानक डांबर आणि गिट्टी पसरवण्याचे काम सुरू होते. पाच वर्षांपासून दुर्लक्षित असलेले रस्ते निवडणुकीच्या तोंडावर 'दुरुस्तीच्या नावाखाली' थातुर-मातुर सुधारले जात आहेत.

शहरातील अनेक रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. काही ठिकाणी डांबर पूर्णपणे उखडले असून जागोजागी मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नगर परिषदेच्या या कामांमुळे काही दिवसांपुरते समाधान मिळते; परंतु काही आठवड्यांतच पुन्हा तीच अवस्था निर्माण होते. पावसाळा आणि निवडणुकीच्या काळात या खड्ड्यांचा त्रास दुपटीने वाढतो, अशी नागरिकांची तक्रार आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, "रस्त्यांची खरी देखभाल पाच वर्षे कोणी करत नाही, पण निवडणुका





आल्या की कामाचा मोठा गाजावाजा सुरू होतो.

निवडणुकीनंतर पुन्हा तीच दुर्दशा सुरू होते," असा नागरिकांचा रोष आहे. नागरिकांनी शहरातील रस्त्यांचे दर्जेदार दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

---

# वंदे मातरम सार्धशताब्दी उत्साहात साजरी

## शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सामूहिक गायनाने गुंजला यवतमाळ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - बंकीमचंद्र चटर्जी लिखित "वंदे मातरम" काव्याला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने "वंदे मातरम सार्धशताब्दी" महोत्सव जिल्हा क्रीडा संकुल, यवतमाळ येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी विकास मीना होते, तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन बाबाजी दाते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, यवतमाळ यांच्या वतीने करण्यात आले होते.कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी यांच्या हस्ते



झाला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी "वंदे मातरम" चे सामूहिक गीतगायन केले. पोलीस बँड पथकाने सादर केलेल्या स्वागत गीताने वातावरण देशभक्तीने भारावले. या प्रसंगी प्राचार्य विनोद नागोरे यांनी प्रास्ताविक केले. आयटीआय विद्यार्थ्यांनी "वंदे मातरम" विषयावर पथनाट्य सादर केले. प्रमुख वक्ते प्रा. ताराचंद कंठाळे यांनी देशप्रेमाचे महत्त्व अधोरेखित केले. जिल्हाधिकारी मीना यांनी मतदानाची शपथ दिली, तर एसपी कुमार चिंता यांनी युवकांना राष्ट्रनिर्माणात सक्रिय सहभागाचे आवाहन केले.कार्यक्रमाला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख, विनायकराव दाते, दयानंद सिडाम आदी मान्यवर उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताच्या धूनने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

# माजी आमदार, जिल्हाअध्यक्ष व जेष्ठ नेते यांच्या उपस्थितीत शेकडो युवकांचा भाजपमध्ये भव्य पक्ष प्रवेश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पुसद शहरात भारतीय जनता पार्टीच्या शक्तीप्रदर्शनासारखा भव्य युवा पक्षप्रवेश सोहळा योगा भवन येथे पार पडला. लल्ला उर्फ राधेश्याम दिंडे भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा महामंत्री यांच्या नेतृत्वाखाली पुसद शहर आणि ग्रामीण भागातील २४५ उत्साही युवकांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करून पक्षाच्या विजयाच्या संकल्पास अधिक बळ दिले.

हा भव्य प्रवेश सोहळा भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. प्रमुख उपस्थिती पुसद जिल्हा निवडणूक प्रमुख माजी आमदार निलय नाईक यांची होती. तसेच माजी जिल्हाध्यक्ष महादेवराव सुपारे, विद्यमान जिल्हाध्यक्ष सौ. आरती फुफाटे, शेखर वानखेडे, रोहित वर्मा, निलेश





पेन्शनवार, निखिल चिद्दरवार, विश्वास भवरे, आदित्य माने, अमय नाईक, दिपाली जाधव, अनिरुद्ध पाटील, रूपाली जैस्वाल, बळवंतराव नाईक, रेशमाताई लोखंडे, अरुणाताई जाधव, अश्विनजी जयस्वाल आदी भाजपचे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित जिल्हा युवा मोर्चा पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वितरण सुद्धा करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान "आपकी बार भाजप सरकार" या घोषणा देत युवकांनी परिसर दणाणून सोडला. उपस्थित सर्व मान्यवरांनी व्यक्त केले की या भव्य युवा महाप्रवेशामुळे भाजपची ताकद आता पुसदमध्ये द्विगुणित झाली आहे आणि विरोधकांच्या गोटात स्पष्टपणे अस्वस्थता निर्माण झाली आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ओमप्रकाश शिंदे जिल्हा महामंत्री, किसान मोर्चा यांनी कुशलतेने केले, तर आभार प्रदर्शन युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित वर्मा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओबीसी नेते शेखर वानखेडे गुरु उंचाडे नितीन वारकड कपिल जाधव पवन राठोड नेहाल वानखेडे राजू, काकडे,सुधीर धाड, अंकुश राठोड अक्षय पांडव, निखिल राठोड, शिव हूलकाने, आकाश दिंडे,विशाल कवडे, मुन्ना राठोड, आकाश मारकड आदी शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

---

# भाजप कार्यकर्त्यामध्ये नाराजीची लाट

## निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून एकाच परिवारातील उमेदवारांना प्राधान्य

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीत भाजप पक्षाकडून उमेदवारी जाहीर करण्यात येत असताना, पक्षातील निष्ठावंत व दीर्घकाळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून एकाच परिवारातील तीन उमेदवारांना संधी देण्यात येत असल्याच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अनेक वर्षांपासून पक्षासाठी रात्रंदिवस कार्य करणारे कार्यकर्ते, समाजात सक्रिय असलेले भाजपचे जुने चेहेरे यांना या निवडणुकीत संधी नाकारण्याची शक्य दिसत आहे.नगर परिषद उमेदवारी करिता प्रस्थापित पदांचा वापर व वरिष्ठ नेत्यांशी असलेले स्नेहसंबंध यांच्या जोरावर काही मोजक्या



घरातील सदस्यांना तिकीट देण्यात आली असल्याची विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. यामुळे केवळ भाजप कार्यकर्त्यांच्याच नव्हे तर त्या वार्डातील नागरिकांच्याही भावना दुखावल्या गेल्या आहेत. स्थानिक पातळीवर अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या वार्डात पक्ष बळकट करण्यासाठी, नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवत, मतदारांमध्ये विश्वास निर्माण केला होता. मात्र, उमेदवारीच्या वेळी त्यांच्याच मेहनतीवर पाणी फेरले गेले असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे हा "पक्ष नव्हे तर काहींच्या परिवाराचा कारभार सुरू आहे" अशा शब्दांत अनेक नाराज कार्यकर्त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. कधी काळी "भाजप म्हणजे एक परिवार" अशी भावना असलेले कार्यकर्ते, आता मात्र पक्ष हा फक्त काहींच्या परिवारापुरता मर्यादित झाला आहे. असे म्हणत शिंदे गटात सामूहिक प्रवेश करत आहे. त्यामुळे भाजपच्या गोटात चिंता निर्माण झाली आहे. दरम्यान, भाजपचे माजी आमदार मदन येरावार यांनी आपल्या कार्यकाळात शहराच्या विकासासाठी मोठा निधी खेचून आणला होता. मात्र, त्यांच्या कार्यकाळातही काही मोजक्या मंडळींच्या हातात राजकारणाचा ताबा गेल्याने, अनेक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्या वेळी उद्भवलेली असंतोषाची लाटच त्यांच्या आमदारकीच्या समाप्तीचे कारण ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते. आता पुन्हा तशाच प्रकारची स्थिती निर्माण झाल्याने, भाजप पक्षाच्या अंतर्गत मतभेदांची तीव्रता वाढली असून, काही सत्ताधाऱ्यांच्या "सत्तेच्या मोहामुळे" पक्षाचे एकसंधपण धोक्यात आले आहे. या परिस्थितीवर वरिष्ठ पक्षनेत्यांनी तातडीने लक्ष न दिल्यास,काहींचा लाड पुरवताना भाजपला नगरपरिषदेची सत्ता गमवावी लागू शकते अशी चर्चा नागरिक आणि पक्षांतर्गत वर्तुळात जोर धरू लागली आहे. भाजपसारख्या संघटित पक्षात अशी नाराजी दिसून येणे ही गंभीर बाब मानली जात असून, खऱ्या कार्यकर्त्यांना न्याय मिळावा यासाठी आता कार्यकर्त्या करिता वरिष्ठांकडून ठोस भूमिका घेण्याची मागणी केली जात आहे.

---

# काटेरी झुडपांनी व्यापलेला रावेरी रस्ता अपघातांना देतो आमंत्रण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव : राळेगाव रावेरी वरूड प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून बांधण्यात आलेला राळेगाव–रावेरी मार्ग सध्या काटेरी झुडपांच्या वाढत्या प्रमाणामुळे धोकादायक ठरत आहे. या रस्त्यावर दोन्ही बाजूंनी झुडपांनी रस्ता व्यापल्यामुळे वाहनधारकांना योग्य दृश्य दिसत नसल्याने अनेक लहानमोठे अपघात घडत आहेत.

गावांमधील संपर्क सुकर व्हावा आणि नागरिकांना चांगला प्रवास अनुभव मिळावा या उद्देशाने या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले होते. मात्र, नियमित देखभाल न झाल्याने आता रस्त्याच्या कडेला काटेरी झुडपे व गवत वाढले आहे. त्यामुळे वाहन चालवताना समोरून येणारे वाहन दिसत नाही आणि अपघाताचा धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार पंचायत समिती व सार्वजनिक बांधकाम विभागाचे



लक्ष या समस्येकडे वेधले असले तरी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. रस्त्याची दुरवस्था व झुडपांचा त्रास यामुळे शालेय विद्यार्थ्यांपासून ते शेतकरी, रोजंदारी कामगारांपर्यंत सर्वच प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांची मागणी आहे की संबंधित विभागाने तातडीने झुडपे काढून रस्ता स्वच्छ करावा, तसेच भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत म्हणून नियमित स्वच्छतेचा कार्यक्रम राबवावा. अन्यथा नागरिक रस्ता बंद आंदोलन करण्याचा इशारा देत आहेत.

---

# वेचक



### "वंदे मातरम्" गीताचे सामूहिक गायन, देशभक्तीचा उत्साह शिवरामजी मोघे महाविद्यालयात

पांढरकवडा - शिवरामजी मोघे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) वतीने "वंदे मातरम्" गीताचे सामूहिक गायन मोठ्या उत्साहात पार पडले. या गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ७ नोव्हेंबर रोजी हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके, प्रा. डॉ. रितेश पळसपगार, प्रा. डॉ. अरुणा चुडासामा, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत "वंदे मातरम्"च्या सुरावटींनी परिसर दुमदुमून टाकला. तसेच मित्र क्रीडा मंडळ येथे झालेल्या कार्यक्रमातही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थी व शिक्षक वर्गामध्ये देशप्रेमाची भावना अधिक दृढ झाली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी व प्रा. डॉ. उषा राखुंडे यांनी उपक्रम यशस्वी पार पडल्याबद्दल समाधान व्यक्त केले.



### अणे विद्यालयाचा सॉफ्टबॉल संघ राज्यस्तरावर!

यवतमाळ - स्थानिक लोकनायक बापूजी अणे विद्यालयाचा १७ वर्षांखालील मुलांचा सॉफ्टबॉल संघ विभागीय स्पर्धेत विजयी ठरून राज्यस्तरावर प्रवेश मिळवला आहे. अकोला येथील पोलीस ट्रेनिंग सेंटरच्या प्रांगणात पार पडलेल्या विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत अणे विद्यालयाच्या संघाने वाशीम जिल्ह्याच्या संघावर ५–० असा निर्णायक विजय मिळवत विभागीय विजेतेपद पटकावले. संघाचे नेतृत्व कर्णधार प्रेम गुरनुले व उपकर्णधार अनिकेत टोप्रकवार यांनी केले. प्रशिक्षक म्हणून उमेश मेश्राम व सम्यक गजभिये यांनी मार्गदर्शन केले. या यशस्वी कामगिरीबद्दल राज्य क्रीडा मार्गदर्शक मंगेश गुडदे, क्रीडा अधिकारी सचिन हरणे, जिल्हा सॉफ्टबॉल प्रशिक्षक पंकज शेलोटकर आदींनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांनी संघाला पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### दिव्यांग संस्थांच्या नोंदणीसाठी आवाहन

यवतमाळ - दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ४९ ते ५३ अन्वये दिव्यांगांच्या कल्याण, विकास, पुनर्वसन आणि सक्षमीकरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व नागरी समाज संघटना व संस्थांची नोंदणी अनिवार्य आहे. यानुसार अशा संस्थांनी आपला नोंदणी प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, तळमजला, प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या कार्यालयात तात्काळ सादर करावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी मंगला मून यांनी केले आहे.

### भाजपा शहराच्या वतीने नगरपरिषद सदस्य इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती कार्यक्रम

यवतमाळ - भारतीय जनता पार्टी यवतमाळ शहराच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या नगरपरिषद सदस्य या पदाकरिता इच्छुक उमेदवारांनी उद्या दुपारी ठीक १ ते ३ या वेळात भावे मंगल कार्यालय येथे आपले अर्ज घेऊन मुलाखात देण्यासाठी यावे व आपली संपूर्ण माहिती सोबत आणावी असे आवाहन यवतमाळ दक्षिण शहराचे अध्यक्ष नितीन गिरी,यवतमाळ उतर शहराचे अध्यक्ष योगेश पाटील यांनी केलेले आहे.

# माहुली जहागीरच्या लाचखोर सरपंच प्रीती बुंदीले अखेर अपात्र

## मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला निर्णय

**अमरावती/का.प्र.**
माहुली जहागीर येथील लाचखोर सरपंच प्रीती मनोज बुंदीले यांना अखेर लाच प्रकरणात अपात्र ठरवण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विभागीय आयुक्त व ग्रामविकास मंत्रालयाचा निर्णय कायम ठेवत सरपंच प्रीती बुंदीले यांच्यावरील गैरवर्तन आणि लज्जास्पद वर्तनाचा ठपका योग्य असल्याचे स्पष्ट केले.सरपंच बनण्यासाठी शिवसेनेतून काँग्रेस मध्ये व नंतर पद वाचविण्यासाठी काँग्रेस मधून भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्या प्रीती बुंदीले यांना न्यायालयाने जबरदस्त चपराक दिली.





कंत्राटदार रामभाऊ मोंढे यांना अनुभव प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सरपंचाचे पती मनोज बुंदीले यांनी चार हजार रुपयांची मागणी केली होती. मात्र, लाच देण्यास नकार देत त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. २७ सप्टेंबर २०२३ रोजी विभागाच्या पथकाने सापळा रचत मनोज बुंदीले यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलिसांनी सरपंच प्रीती बुंदीले व मनोज बुंदीले यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवला होता.या घटनेनंतर माहुली जहागीरचे माजी सरपंच व भाजपा कार्यकर्ते सुधीर बिजवे यांनी विभागीय आयुक्तांकडे सरपंचाविरोधात तक्रार दाखल केली होती.त्याअनुषंगाने विभागीय आयुक्तांनी ७ ऑगस्ट २०२४ रोजी चौकशीनंतर प्रीती बुंदीले यांना सरपंच व सदस्य पदासाठी अपात्र ठरवले.पुढे प्रीती बुंदीले यांनी भाजप प्रवेश केल्यामुळे खा. डॉ. अनिल बोंडे व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याप्रकरणी ग्रामविकास मंत्रालयात पाठपुरावा केल्यानंतर तत्कालीन ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी आभासी पद्धतीने बैठक घेउन सरपंच प्रीती बुंदीले यांना पदावर कायम ठेवण्याचा आदेश देत विभागीय आयुक्तांच्या आदेशाला स्थगिती दिली होती. त्यानंतर नव्या सरकार मधील ग्रामविकास मंत्री जयप्रकाश गोरे यांनी याप्रकरणी १२ मार्च २०२५ रोजी सुनावणी करतांना प्रीती बुंदीले यांना पुन्हा अपात्र ठरवले.

त्यामुळे प्रीती बुंदीले यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली.

दरम्यान, प्रीती बुंदीले यांच्याविरोधात सुधीर बीजवे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान दिले होते. प्रीती बुंदीले यांनी न्यायालयात आपण लाच मागितली नाही आणि स्वीकारली नाही, असा दावा केला होता. मात्र न्यायालयाने हा दावा फेटाळून 'सरपंचाच्या पाठिंब्याशिवाय तिचा पती लाच मागूच शकत नाही' असे ठाम निरीक्षण नोंदवले.

न्यायमूर्ती प्रफुल्ल खुबाळकर यांच्या एकलखंडपीठाने विभागीय आयुक्त यांचा निर्णय कायम ठेवत प्रीती बुंदीले यांची याचिका फेटाळली व अपात्रतेचा आदेश दिला.

२०२३ मध्ये लाचप्रकरणात अडकल्यांनंतर सुद्धा प्रीती बुंदीले यांनी मिळालेल्या स्थगिती च्या आधारे सरपंचपद भोगून त्यांनतर सुद्धा लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप गावकऱ्यांकडून होत आहे. उच्च न्यायालयाने प्रीती बुंदीले यांना सदस्य आणि सरपंच या दोन्ही पदावरून अपात्र केले आहे.

त्यांनी आजवर केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून तातडीने त्यांच्याकडून वसुली करण्यात यावी अशी मागणी माजी सरपंच तथा भाजप कार्यकर्ते सुधीर बीजवे यांनी केली आहे.

### 'न्याय मिळाला'

'सरपंच प्रीती बुंदीले या भ्रष्ट आणि लाचखोर असल्याचे सिद्ध झाल्यानंतर सुद्धा त्या पदावर राहणे हे ग्रामपदाचा अवमान करणारे होते. मी विभागीय आयुक्तांकडे याबाबत तक्रार दाखल केली होती. अखेर निष्पक्ष चौकशीनंतर न्यायालयाने सत्याला न्याय दिला.'

**सुधीर बिजवे,**
तक्रारदार व माजी सरपंच,
माहुली जहागीर

# शिक्षक मतदार नोंदणीची मुदत वाढवावी



## प्रा.डॉ.प्रशांत विघे यांची मागणी

**अमरावती/का.प्र.**
अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या २०२६ निवडणुकीसाठी सुरु असलेली मतदार नोंदणी प्रक्रिया ६ नोव्हेंबर रोजी संपत असताना दिवाळी सुट्ट्या आणि प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे अनेक शिक्षकांना अर्ज सादर करणे शक्य झाले नाही. त्यामुळे नोंदणीची अंतिम तारीख किमान १५ दिवसांनी वाढवावी, अशी मागणी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य, नूटा संघटनेचे प्रतिनिधी आणि टीचर डेमोक्रॅटिक फंडचे निमंत्रक डॉ. प्रशांत विघे यांनी केली आहे.

या संदर्भात डॉ. विघे यांनी अमरावती विभागाचे निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यांना निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, ३० सप्टेंबर ते ६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आयोजित नोंदणी प्रक्रियेदरम्यान राज्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने अनेक शिक्षकांना ऑनलाईन अर्ज भरणे शक्य झाले नाही.याशिवाय, अनेक शिक्षक वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्यामुळे नोंदणी पूर्ण करता आली नाही. शाळा ३ नोव्हेंबरपासून सुरू झाल्यानंतर अर्ज भरण्यासाठी फक्त चार दिवसांचा अल्प कालावधी उपलब्ध झाला.

तसेच तांत्रिक अडचणी आणि प्रमाणपत्र पडताळणीतील विलंबामुळे शिक्षक वर्गामध्ये संभ्रम व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याचेही डॉ. विघे यांनी नमूद केले.

या निवेदनावर प्रतिक्रिया देताना उपायुक्त रवींद्र हजारे, अमरावती विभाग यांनी सांगितले की, 'आपले निवेदन आम्ही निवडणूक आयोगाकडे पाठवणार आहोत. आयोगाकडून आवश्यक निर्णय मिळाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.' डॉ. विघे यांनी अपेक्षा व्यक्त केली की, आयोगाने संवेदनशीलता दाखवून नोंदणीची मुदत वाढवावी, जेणेकरून कोणताही पात्र शिक्षक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही.

याप्रसंगी शिष्टमंडळ डॉक्टर दीपक राऊत, प्राचार्य पी.आर.राजपूत, संदीप राऊत, विवेक पाटील, कैलास चव्हाण, सुरेशकुमार मेश्राम, दिलीप तायडे, लाभेश साबळे आदी सभागी झाले होते.

# मतदार याद्या ग्रामपंचायतमध्ये लावा

## जिल्हाधिकारी मार्फत निवडणूक आयोगाला निवेदनातून मागणी

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
येत्या काही दिवसांतच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका येऊ घातलेल्या आहे आणि मतदार याद्या तयार झालेल्या आहेत. परंतु या मतदार याद्या अजून पर्यंत गावामध्ये मतदारांना पाहण्याकरिता पोहोचल्या नाहीत त्या तहसील कार्यालयात मतदारांना पाहण्याकरिता ठेवण्यात आल्या आहेत.सदर मतदार याद्या निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत कार्यालयामध्ये लावाव्यात जेणेकरून खेड्यापाड्यातील मतदारांना



आपले नाव आहे किंवा नाही हे पाहणे सोईचे होइल आणि ग्रामीण मतदार हा मतदानापासून वंचित राहणार नाही.

याकरिता महाराष्ट्र सरपंच संघटनेच्या वतीने अती तात्काळ अंमलबजावणी करिता जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवडणूक आयोगाला निवेदन पाठविण्यात आले

यावेळी सरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन दादा बोंडे, जिल्हाध्यक्ष गुलाम नबी इंदलेकर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रक्षणा सरदार, तालुकाध्यक्ष वर्षाताई यादगिरे, रेखा वासनिक,जिल्हाप्रमुख श्याम देशमुख, सरपंच संघटनेचे पदाधिकारी बाबाराव दहिकर , उमेश ढोणे, सचिन धुमाळे, रवींद्र खडसे, अमोल चंदने, पंकज जाखड, राजेंद्र ठाकरे, दिलीप ठाकरे, गिरीश चौधरी, तुकाराम चव्हाण, भानुदास लुटे, गजानन वानखडे, प्रतीक मेघे, सुशील ढेंबरे तसेच महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष ज्योत्स्ना वानखडे, जिजा खडसे, दुर्गा दहीकर तसेच सरपंच संघटनेचे पदाधिकारी व विविध गावांतील सरपंच मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनपाची ट्रान्सपोर्ट नगर परिसरात कारवाई

## पहिल्या टप्प्यात १२५ अनधिकृत दुकाने हटविली

**अमरावती/का.प्र.**
शहरातील वाढत्या अतिक्रमणावर आळा घालण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासनाने निर्णायक पाऊल उचलले आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार आज ट्रान्सपोर्ट नगर परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत अनधिकृत बांधकामे, टिनशेड दुकाने आणि खोके यांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली.



ट्रान्सपोर्ट नगर हा परिसर दीर्घकाळापासून विविध व्यापाऱ्यांनी व्यापलेला असून, येथे साधारणतः ३०० दुकाने असल्याची माहिती आहे. त्यापैकी अनेक दुकाने व टिनशेड रचना परवानगीशिवाय उभारण्यात आल्या होत्या. पहिल्या टप्प्यात आज सुमारे १२५ अनधिकृत दुकाने आणि टिनशेड पाडण्यात आले. या कारवाईदरम्यान अनधिकृत खोके व शेड हटविण्यात आले असून, ही कारवाई पुढील काही दिवस सतत सुरू राहणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

कारवाईसाठी अतिक्रमण विभाग, बाजार परवाना विभाग आणि पोलीस विभाग यांनी संयुक्तपणे पथके तयार केली होती. संपूर्ण कारवाईदरम्यान तीन जेसीपी मशीन आणि तीन मोठे ट्रक सतत कामावर तैनात होते. पोलिसांनी घटनास्थळी मोठा बंदोबस्त ठेवत कारवाईदरम्यान कोणताही अनुशासनभंग होऊ नये याची काळजी घेतली.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणीही अनधिकृत बांधकामे करू नयेत, अन्यथा त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही दिवसांत ट्रान्सपोर्ट नगर परिसरातील उर्वरित १७५ अनधिकृत दुकाने देखील हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. नागरिक व व्यापाऱ्यांनी स्वतःहून अनधिकृत बांधकामे दूर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# टीईटी सक्तीविरोधात राज्यभरातील शाळा 24 नोव्हेंबरला बंद

**अमरावती/का.प्र.**
राज्यातील विविध शिक्षक संघटनांच्या संयुक्त पुढाकाराने रावसाहेब पटवर्धन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पुणे येथे राज्यभरातील शिक्षकांच्या गंभीर प्रश्नांवर विचारविनिमय बैठक आयोजित करण्यात आली होती.सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबरच्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सक्तीच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने तातडीने पुनर्विचार याचिका दाखल करावी आणि केंद्र शासनाकडे याबाबत पाठपुरावा करावा. दोन आठवड्याच्या आत याबाबत कार्यवाही झाली नाही, तर २४ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील शिक्षक शाळा बंद आंदोलन करतील,असा इशारा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघटना व महाराष्ट्र राज्य महानगरपालिका व नगरपालिका प्राथमिक शिक्षक संघटना यांनी मंगळवारी दिला.दरम्यान, आंदोलनानंतरही पुनर्विचार याचिका दाखल झाली नाही, तर संघटना थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे यावेळी जाहीर केले. राज्यातील विविध शिक्षक संघटनांच्या संयुक्त पुढाकाराने रावसाहेब पटवर्धन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पुणे येथे राज्यभरातील शिक्षकांच्या गंभीर प्रश्नांवर विचारविनिमय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संघटनांच्या प्रमुख नेत्यांनी टीईटी निर्णयाच्या अंमलबजावणीतील त्रुटी आणि शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा विपर्यास करून शिक्षकांना लक्ष्य केले जात आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून, चुकीचे

# विभागीय आयुक्त कार्यालयात 'वंदे मातरम्' गीताचे समूहगान

**अमरावती/का.प्र.**
राष्ट्रभक्तीचे प्रतीक 'वंदे मातरम्' या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विभागीय आयुक्त कार्यालयात राष्ट्रभक्तीच्या वातावरणात 'वंदे मातरम' गीताचे आज सामूहिक गायन करण्यात आले.



विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमास अपर आयुक्त सुरज वाघमारे, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, रविंद्र हजारे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात 'वंदे मातरम' या गीताचा विशेष उल्लेखनीय प्रभाव राहिला आहे आणि हे गीत स्वातंत्र्यसैनिकांसाठी प्रेरणास्त्रोत बनले होते. सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली रचलेल्या 'वंदे मातरम' या गीताला शुक्रवारी, ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान एकूण चार टप्प्यात राज्यात विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

याअंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे मंत्रालयात 'वंदे मातरम्' गीत 'सार्ध शताब्दी' महोत्सवासाची आज सुरुवात झाली आहे.

या महोत्सवासाच्या माध्यमातून कौशल्य विकास विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने राज्यभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव १९ नोव्हेंबरला

**अमरावती/का.प्र.**
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे येथे १९ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सव घेण्यात येणार आहे. महोत्सवात श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृह, डी. एड. कॉलेज आणि शिवाजी विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

सदर युवा महोत्सव हा सांस्कृतिक आणि नवोपक्रम या संकल्पनेवर आधारीत असणार आहे. या महोत्सवात अमरावती जिल्ह्यातील युवक-युवती विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतील. यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या कार्यालयात किंवा amravatidso @gmail. com या मेलवर पाठवावे लागतील. तसेच र्स्बैुदन.ग्ह या संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे.सांस्कृतिक स्पर्धेतील लोकगीत आणि लोकनृत्यात १० जणांना सहभाग घेता येईल. लोकनृत्यासाठी रेकॉर्ड केलेले संगीत वापरण्यास परवानगी नाही. कौशल्य विकास स्पर्धेत कथालेखन (मराठी, हिंदी व इंग्रजी, १००० शब्दांत - सहभागी संख्या ३), चित्रकला (सहभागी संख्या २), वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी - सहभागी संख्या २) आणि कविता (सहभागी संख्या ३) सहभागी घेता येणार आहे.

युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी वयोमर्यादा ही १५ ते २९ वर्षापर्यंत राहणार असून १२ जानेवारी २०२६ रोजी वयाची गणना करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ नोव्हेंबर आहे. स्पर्धक महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. विहित नमुन्यातील इंग्रजीमध्ये ओळखपत्र, आधारकार्ड आणि जन्म तारखेचा दाखला, ही कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. इच्छुकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक विद्यापीठासमोर, मार्डी रोड, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.

# यशवंत तायडे यांचे निधन



**अमरावती-** यशवंत किसन तायडे यांचे गुरुवार ६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री अल्पशा आजाराने निधन झाले. यश कॉलनी नवसारी अमरावती येथील रहिवासी असलेले यशवंत तायडे यांनी शासकीय विद्यानिकेतन, शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती शिक्षण विभागाच्या अनेक कार्यालयांमध्ये लिपिक या पदावर आपली संपूर्ण सेवा केलेली आहे. शिक्षण विभागात आपल्या प्रामाणिक सेवेकरिता ते परिचित होते.मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्षाचे होते.त्यांच्या पश्चात त्यांच्या मागे त्यांचा पोलीस खात्यातील मुलगा आनंद तायडे, पत्नी अंजना, मुलगी अर्चना, सुना, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

## समूह साधन केंद्र समन्वयक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा

**अमरावती**-महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२५ या परीक्षेबाबत सुधारित प्रसिद्धी निवेदन जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार सदर परीक्षा ही आता माहे जानेवारी किंवा फेब्रुवारी २०२६ मध्ये ऑनलाईन पध्दतीने होणार आहे, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणे ही परीक्षा ऑनलाईन पद्धतीने ०१ ते ०५ डिसेंबर २०२५ दरम्यान घेण्यात येणार होती. तथापि, काही तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे या परीक्षेचे आयोजन आता जानेवारी / फेब्रुवारी २०२६ मध्ये करण्यात येणार असून, सुधारित तारखा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या ै.स्मज्ल्हा.ग्ह या अधिकृत संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध केल्या जातील, असे परिषदेतर्फे कळविण्यात आले आहे.सदर परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची अंतिम मुदत पूर्वी १० नोव्हेंबर २०२५ होती. आता ती वाढवून १ जानेवारी २०२६ पर्यंत करण्यात आली आहे.

## संक्षिप्त

### शिबिराचा ९३ रुग्णांनी घेतला लाभ

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पोटे कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद व्दारा अस्थिरोग (ऑर्थोपेडिक) निदान व उपचार शिबीर आयोजित करण्यात आले.कार्यक्रमाला अध्यक्ष व उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे अधिष्ठातां .डॉ. रणजित देशमुख तथा प्रमुख चिकित्सक म्हणून डॉ भूषण बोके सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ हे उपस्थित होते . संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयश दादा पोटे पाटील याच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी करण्यात आला.संचालन व आभार प्रदर्शन डॉ. हेमलता माहोरे यांनी केले तसेच बालकाच्या लसीकरण सत्राचे सुध्दा आयोजन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र वलगाव मार्फत यात बऱ्याच माता तथा बालकांना लसीकरण करण्यात आले.यावेळी या शिबिरात ९३ रुग्णांनी सहभाग घेतला.



### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अर्ज करा

**अमरावती**-राज्यातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरु आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.दिवसेंदिवस वाढत असलेल्या व्यावसायिक व अव्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि मर्यादित शासकीय वसतिगृहांची जागा लक्षात घेऊन, अनेक विद्यार्थी निवासाच्या समस्येमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. ही अडचण दूर करण्यासाठी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ही योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत ५० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त असलेल्या इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी आवश्यक रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते.पात्र विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या प्ूरे://र्पे.र्सेप्ू.दु या संकेतस्थळावर त्वरित ऑनलाईन अर्ज करावा. ऑनलाईन अर्ज केल्यानंतर त्याची हार्ड कॉपी आणि सर्व आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित प्रत सहायक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती यांच्या कार्यालयात ३० नोव्हेंबरपर्यंत जमा करावा.अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय, अमरावती (दूरध्वनी क्रमांक ०७२१-२६६१२६१) येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

### आयटीआय विद्यार्थ्यांमध्ये भांडण; कोयत्याच्या हल्ल्यात एक जखमी

**अमरावती-** अमरावती आयटीआय कॉलेजमधील विद्यार्थ्यांमध्ये किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली. या हल्ल्यात अभिषेक तुकाराम रायबोले (वय २२, रा. फॉरेस्ट कॉलनी, परतवाडा) हा विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात वॉर्ड क्रमांक १३ मध्ये उपचार सुरू आहेत. अभिषेक रायबोले हा आयटीआय कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. कॉलेजमध्ये मित्रांमधील हसतखेळत सुरू असलेल्या बोलण्यातून एका विद्यार्थ्यासोबत किरकोळ वाद झाला. वाद वाढताच हाणामारी झाली आणि आरोपी विद्यार्थ्याने अचानक कोयत्याने अभिषेकवर हल्ला केला. या हल्ल्यात अभिषेकच्या शरीरावर गंभीरजखमा झाल्या. सहकाऱ्यांनी त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. घटनेनंतर कॉलेज परिसरात काही वेळ तणाव निर्माण झाला होता. गाडगेनगर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.



# स्वातंत्र्य लढ्यातील अमर देशभक्तीपर गीत 'वंदे मातरम्'

'वंदे मातरम्' हे केवळ गीत नाही तर भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे व आत्म्याचे प्रतीक आहे. या गीताने शेकडो स्वातंत्र्यवीरांना बलिदानाची प्रेरणा दिली. या गीताने स्वातंत्र्य चळवळीत जोश आत्मविश्वास व राष्ट्रीय एकात्मतेचा भाव निर्माण केला. आजही हे गीत ऐकताना मनात देशभक्तीची भावना जागृत होते या देशभक्ती पूर्ण गीताचे लेखक बंकीमचंद्र चटोपाध्याय हे आहेत.

बंकीमचंद्र चट्टोपाध्य यांचा जन्म २६ जून १८३८ मध्ये कलकत्त्याजवळील नहाटा कंटालपाडा येथे झाला. १८५८ मध्ये त्यांनी कलकत्ता विद्यापीठातून पदवी घेऊन सरकारी नोकरी केली. ते लेखक कवी कादंबरीकार होते. त्यांनी दुर्गेशनंदिनी मृणालिनी, विषवृक्ष व आनंदमठ आदी कादंबऱ्या लिहिल्या 'वंदे मातरम्' ही त्यांचीच एक भावपूर्ण देश देशभक्तीयुक्त रचना आहे.अनेक वर्ष गुलामगिरीत घालविल्यामुळे अखंड भारतासाठी कोणतेही राष्ट्रगीत नव्हते. म्हणून बंकीमचंद्र चटोपाध्याय यांनी ७ नोव्हेंबर १८७५ रोजी भारत देशाला मातृभूमी मानन देशभक्ती पूर्ण भावनेने तिला वंदन करतो या अर्थाने वंदे मातरम या गीताची रचना केली. या गीताची सहा कडवे असून यातील पहिली दोन कडवे मातृभूमीच्या सृष्टी सौंदर्याचे वर्णन आहे. तर अन्य चार कडव्यात मातृभूमीचे वर्णन हिंदू देवता दुर्गेच्या रूपात आहे.



प्लासीच्या लढाईनंतर बंगालमध्ये इंग्रजांनी आपले पाय रोवले. त्यांनी आपल्या अधिपत्याखालील प्रदेशांमध्ये नवीन महसूल धोरण व कर विषयक धोरण अवलंबिले. दरम्यान १७७० मध्ये बंगालमध्ये दुष्काळ पडला. तसेच उत्तर प्रदेशातून बंगालमध्ये तीर्थयात्रेसाठी येणाऱ्या संन्याशावर बंदी घालण्यात आली. तसेच या संन्याश्याचे यात्रेसाठी सहकार्य करणाऱ्या जमीनदार व जहागीरदारांवरही बंधने लादण्यात आली. त्यामुळे हे जमीनदार, जागीरदार या संन्यासी यात्रेकरूंना यात्रेसाठी सहकार्य करू शकत नव्हते. धार्मिक कार्यात इंग्रजांनी केलेल्या या अन्यायपूर्ण दखलपात्रतेमुळे संन्यासी व जहागीरदार वर्ग हे सर्वच संतप्त झाले. या सर्वांनी एकत्रित उठाव केला त्यालाच सन्याशांचे बंड असे म्हणतात. किंबहुना हे इंग्रज राजवटीच्या विरोधात झालेले पहिले स्वातंत्र्य युद्ध होते असे म्हटले तरीही वावगे ठरू नये. या ऐतिहासिक घटनेवर आधारित आनंद मठ नावाची एक कादंबरी बंकीमचंद्र चटोपाध्याय यांनी १८८२ साली लिहिली. या कादंबरीत त्यांनी 'वंदे मातरम्' या गीताचा अंतर्भाव केला. संन्यासाचा समूह आंदोलनात सहभागी होण्यासाठी तसेच लोकांना प्रेरणा देण्यासाठी वंदे मातरम हे गीत गातात असे वर्णिले आहे. आनंदमठ ही कादंबरी व 'वंदे मातरम्' हे गीत हे दोन्हीही अतिशय प्रसिद्ध तसेच लोकप्रिय झाले.

१८९६साली कलकत्ता येथे काँग्रेसच्या अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी हे गीत गायले. १९०१ मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसच्या अधिवेशनात दखीना चरणसेन यांनी या गीताचे सामूहिक पठणाचा अभ्यास घेतला. १९०५ मध्ये इंग्रजांनी बंगालची फाळणी केली. या निर्णयाविरुद्ध जनतेने विद्रोह केला. जनतेने इंग्रजी सत्तेविरुद्ध आंदोलने केली. याला वंगभंगाची चळवळ या नावाने ओळखले जाते. या वंग भंग नावाने झालेल्या आंदोलना दरम्यान 'वंदे मातरम्' हे गीत आंदोलकांसाठी प्रेरणादायी ठरले. आंदोलन तीव्र झाल्याने इंग्रज सरकारने बंगालची फाळणी रद्द केली. मात्र वंदे मातरम या गीतावर बंदी घातली. गीत म्हटल्यास जेलमध्ये पाठवण्यात येत असे. अरविंद घोष यांनी या गीताला बंगालचे राष्ट्रगीत म्हणून संबोधले.यानंतर काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात हे गीत गायले जाऊ लागले १९३७ सालच्या काँग्रेस अधिवेशनात 'वंदे मातरम्'या गीताच्या पहिल्या व दुसऱ्या कडव्यांना राष्ट्रगीताचा दर्जा देण्याच्या अर्थाचा ठराव मंजूर करण्यात आला. पुढील




कडव्यांमध्ये हिंदू देवतांच्या दुर्गा रुप वर्णन असल्याने त्या कडव्यांना नकार देण्यात आला.

१९४७ साली देश स्वतंत्र झाला तेव्हा काँग्रेसने 'वंदे मातरम्' वरील बंदी उठवीली. जन गण मन ला राष्ट्रीय गीताचा दर्जा देण्यात आला. मात्र वंदे मातरम कडे दुर्लक्ष करण्यात आले. अनेकांना हे पटले नाही. घटना समिती स्थापन झाल्यानंतर घटना समितीत 'वंदे मातरम्' या गीता विषयी अनेकदा चर्चा झाली. अखेर घटना लागू होण्याच्या दोन दिवस आधी म्हणजे २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांनी 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीताचा दर्जा देण्याचा ठराव मंजूर करून घेतला व अशा प्रकारे 'वंदे मातरम्' ला राष्ट्रगीताचा दर्जा मिळाला. २०२२ मध्ये तत्कालीन सरकारने 'वंदे मातरम्' व जनगणमन यांना समान दर्जा असल्याचे प्रतिज्ञापत्र कोर्टात दाखल केले. 'वंदे मातरम्'हे गीत भारतीय स्वातंत्र्य लढ्याची साक्ष आहे. या गीताने भारतीयांना एकता श्रद्धा व मातृभूमीच्या प्रेमाचा संदेश दिला आहे. वंदे मातरम म्हणजे मातृभूमीच्या चरणी समर्पित एक प्रणाम आहे. स्वातंत्र्य लढ्यात वंदे मातरम एक प्रेरणादायी गीत ठरले. अनेक क्रांतिवीर वंदे मातरम म्हणत फाशीवर गेले तर 'वंदे मातरम्' हा देशभक्ती पर उद्गार मानल्या जाऊ लागला आहे.

आज 'वंदे मातरम्'या गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. या गीताचा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यभर विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आखले आहेत. या अंतर्गत 'वंदे मातरम्' गीत गायन, देशभक्तीपर भाषण ,वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आधी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शाळा महाविद्यालय व विविध संस्था यामध्ये 'वंदे मातरम्' संदर्भात उत्सव साजरा करण्याच्या योजना आहेत.

**भालचंद्र ठोंबरे**
`.९८३४३५०८९५

# खा.बळवंत वानखडे, आ.गजानन लवटेकडून आचारसंहितेचे उल्लंघन

## दर्यापूर पंचायत समितीच्या इमारतीचे केले भूमिपूजन

## अनिल बोंडे यांच्या कामाचे श्रेय घेतल्याचा आरोप;मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या दर्यापूर पंचायत समितीच्या इमारतीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून आदर्श आचारसंहिता लागू झाल्यावर दर्यापूर पंचायत समितीच्या नूतन इमारतीच्या कामाची भूमिपूजन केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यासंदर्भात भाजपच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला असून मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार करत संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र निवडणूक आयोगाने चार नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता पत्रकार परिषद घेऊन आदर्श आचारसंहिता लागू केली. अमरावती जिल्ह्यातही नगरपरिषद, नगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू केल्यानंतर खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुधाकर



भारसाकळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी यांनी दर्यापूर पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या कामाची भूमिपूजन केले. भूमिपूजनाचे बोर्ड उभारने, शासकीय जागेचा व साधनांचा वापर करणे, लोकप्रतिनिधींची जाहीर उपस्थिती दर्शवणे ही सर्व कृती आदर्श आचारसंहिता नियम ७, १०, १६ चे उल्लंघन करणारी आहे. संदर्भातील तक्रार भाजपच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे. त्यामुळे संबंधितांवर आदर्श आचारसंहिता भंग केल्याचे गुन्हे दाखल करावे अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

> मुख्य निवडणूक आयुक्तांकडे यासंदर्भात तक्रार दाखल करून गुन्हे नोंदवण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सतत पाठपुरावा करून खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी पंचायत समितीची नूतन इमारत मंजूर करून घेतली. असं असतानाही परस्पर कामाचं श्रेय घेण्यासाठी आचार सहिता लागल्यावर भूमिपूजन करणे हे नियमबाह्य आहे.
>
> **नकुल सोनटक्के,**
> जिल्हाध्यक्ष,भाजपा अनुसूचित जाती मोर्चा

# दर्यापूरचे राजकारण घराणेशाहीच्या गळ्यात


## कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलायच्या का?

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूरच राजकारण आता लोकशाही नव्हे तर घराणेशाहीच्या विळख्यात अडकले आहे. पक्षाचा झेंडा घेऊन वर्षानुवर्ष जनतेच्या पाठीशी उभे राहणारे खरे कार्यकर्ते आज फक्त सतरंज्या उचलणारे आणि पोस्टर लावणारे नोकरदार बनले आहेत. सत्ता आणि पद मात्र त्याच त्या घराण्याच्या कुशीत जात आहे. हे दृश्य पाहून प्रत्येक निष्ठावंत कार्यकर्ता आज संतप्त आहे.

पक्षाचे आदर्श लोकांचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची निष्ठा या सगळ्यावर पाणी फिरून काही मोजक्या घराण्यांनी दर्यापूरच राजकारण आपल्या खिशात टाकले आहे. जनतेचा आवाज आणि कार्यकर्त्यांची कष्टमय मेहनत फक्त फोटो पुरते मर्यादित ठेवल्या गेली आहे. सगळ ठरलेलं असतं कोण उमेदवार होणार कोणाला पद मिळणार आणि कोण सतरंज्या उचलणार हे लोकशाहीचं अपमान नाही का? दर्यापुरातील अनेक कार्यकर्त्यांनी आता उघडपणे आवाज उठवायला सुरुवात केली आहे. आम्ही फक्त झेंडे आणि सतरंज्या उचलायचा का आमच स्थान फक्त फोटोच्या मागे उभे राहायचे आहे का? नेतृत्व हे कार्यकर्तेच्या कष्टावर उभा राहिला पाहिजे पण इथे मात्र कार्यकर्त्यांच्या कष्टावर घराण्याची मक्तेदारी वाढवली आहे. पक्ष स्थान मिळायचं असेल तर निष्ठा नव्हे तर घराण असणं आवश्यक झाले आहे. कार्यकर्त्यांच्या मनातला राग आणि असंतोष उफाळून आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत घराणे शाहीचा खेळ थांबवला नाही तर कार्यकर्तेच या घराणेशाही विरोधात चळवळ उभी करतील पद घराण्यांना आणि काम,कार्यकर्त्यांना हा अन्याय किती दिवस चालणार पक्षश्रेष्ठींनी आता निर्णय घ्यायचा आहे लोकशाही जपायची गरज यावेळी असून यावेळी दर्यापूरचा कार्यकर्ता शांत बसणार नाही.

# जि.प.व पं.स.निवडणुकीत खर्च मर्यादेत वाढ



**अमरावती/का.प्र.**

आगामी काळात होऊ घातलेली जिल्हापरिषद, पंचायतसमिती निवडणूक लढणाऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हापरिषदेची निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांना आता ८ लाख रुपयांऐवजी १४ लाख, तर पंचायतसमितीची निवडणूक लढणाऱ्यांना ३ लाखांऐवजी ६ लाख रुपये खर्च करता येईल. अमरावतीमध्ये जिल्हापरिषदेच्या ५९, तर पंचायतसमितीच्या १९८ जागा आहेत. येत्या काळात या जागांसाठी निवडणूक घेतली जाणार आहे. त्यामुळे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांना खर्च मर्यादेची प्रतीक्षा लागली होती. ही प्रतीक्षा निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशामुळे आता शमली आहे. जि.प. सदस्यांसाठी ८ लाख तर पं. स. सदस्यांसाठी ३ लाख ही मर्यादा ही लागू होती, तर दुसरीकडे वाढती महागाई बघता काही उमेदवारांचा खर्च हा त्याहून अधिक होत होता.

नव्या मर्यादेनुसार आता महापालिकेची निवडणूक लढणाऱ्यांनासुध्दा ८ ऐवजी १४ लाख रुपये खर्च करता येईल. त्याचवेळी नगरपालिकेची निवडणूक लढणाऱ्यांना ७ ऐवजी १२ आणि १४ लाख (अ वर्ग न.पा.) रुपये खर्च करता येणार आहे, तर नगरपंचायतीची निवडणूक लढणाऱ्यांना ४ ऐवजी ८ लाख रुपयांचा खर्च करता येणार आहे.

### ११ सदस्यांपर्यंतच्या ग्रा. पं. निवडणुकीची वाढली मर्यादा

११ सदस्यांपर्यंतच्या ग्रामपंचायतेची निवडणूक लढणाऱ्यांना २ लाख ११ ते १५ सदस्यसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी ४ लाख, तर १६ किंवा त्याहून अधिक सदस्य संख्या असलेल्या ग्रामपंचायतीची निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांना ६ लाख रुपये खर्च करता येणार आहे.

## धारणी नगरपंचायत निवडणुकीत

# १३ हजार २०३ मतदार ठरणार निर्णायक

**धारणी/वार्ताहर**

नगरपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी यांनी जाहीर केला असून या निवडणुकीत एक नगराध्यक्ष आणि १७नगरसेवकांची निवड होणार आहे. नगरपंचायतीत एकूण १७प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. या निवडणुकीत एकूण १३,२०३ मतदार मतदान करणार असून त्यापैकी ६,९४७महिला आणि ६,२५६ पुरुष मतदार आहेत.

नामनिर्देशनपत्र भरण्याचा कालावधी १० नोव्हेंबर २०२५ पासून १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत राहणार आहे. नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याची वेळ त्याच दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत असेल. रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होणार असून त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. अपील नसल्यास नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा कालावधी १९ ते २१ नोव्हेंबर २०२५ दुपारी ३ वाजेपर्यंत राहील. जर अपील दाखल झाले, तर जिल्हा न्यायाधीशांकडे तीन दिवसांच्या आत अर्ज करता येईल व त्या अपिलांवरील निर्णय २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दिला जाणार आहे. त्यानंतर २६ नोव्हेंबर २०२५ रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल.मतदानाची प्रक्रिया २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पार पडेल, तर ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होईल. कलम १९ नुसार निवडणुकीचा निकाल १० डिसेंबर २०२५ पूर्वी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. या निवडणुकीत १७ प्रभागांतून उमेदवारांची निवडणूक लढत रंगणार आहे.



# राकाँची अमरावती जिल्हा आढावा बैठक

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे जिल्हा निहाय आढावा बैठका सुरु आहे.अमरावती जिल्हा आढावा बैठकीत स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणूका व जिल्हा परिषद निवडणुकी संदर्भात आढावा घेण्यात आला. या बैठकीमध्ये अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आ. सुलभा खोडके यांनी अमरावती जिल्ह्यातील महानगर पालिका , जिल्हा परिषद, १० नगर पालिका , २ नगरपंचायती मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची परिस्थिती, गत काळातील पार्श्वभूमी, मतदारसंघनिहाय परिस्थिती, संघटनात्मक बळकटी आणि संभाव्य इच्छूक उमेदवार आदींबाबत विस्तृतपणे माहिती दिली. यावेळी बैठकीला उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, रुपाली चाकणकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आ.संजय खोडके ,जेष्ठ नेतेगण तसेच अमरावती जिल्हातील जेष्ठ महिला पदाधिकारी सुरेखा ठाकरे, यश खोडके, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष ( शहर) प्रशांत डवरे, ग्रामीण अध्यक्ष संतोष महात्मे, माजी सभापती अविनाश मार्डीकर, माजी महापौर ॲड. किशोर शेळके, माजी उपमहापौर शेख जफर आदींसह स्थानिक प्रमुख पदाधिकारी.

# जिल्ह्यात नगरपालिका निवडणूक रणधुमाळी

**अमरावती/प्रतिनिधी**




नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणूक प्रक्रियेला तारखा जाहीर होताच गती मिळाली आहे. आठ वर्षापूर्वी जिल्ह्यातील दहा नगरपालिकांपैकी सहा नगरपालिकांमध्ये सत्तेतून वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या भाजपसमोर हे वर्चस्व टिकवून ठेवण्याचे आव्हान आहे.

एकीकडे महायुती महाविकास आघाडी यांचा विचार करता सहा प्रमुख पक्ष आहेत. मात्र, काही ठिकाणी स्थानिक समीकरणे वरचढ ठरत आली आहेत. प्रहार जनशक्ती पक्ष, युवा स्वाभिमान पक्ष, यांसारखे पक्षदेखील तयारीला लागले आहेत. यात थेट जनतेतून निवडून जाणारी नगराध्यक्षपदे महत्त्वाची ठरणार आहेत. आपलाच नगराध्यक्ष व्हावा, यासाठी सर्व राजकीय पक्ष प्रयत्न करणार आहेत. महायुतीकडे इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे हे तीनही पक्ष एकत्रित लढतील, ही शक्यता कमी असल्याचे बोलले जात आहे. प्रत्येकाची राजकीय महत्त्वाकांक्षा, पक्षविस्ताराची धडपड पाहता इतरांना संधी मिळू नये, अशीच रणनीती असते. जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस असा मुख्य सामना रंगण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव सुर्जी, वरूड, मोर्शी, दर्यापूर, चांदूर बाजार, चिखलदरा, धामणगाव रेल्वे, शेंदूरजनाघाट, चांदूर रेल्वे या दहा नगरपालिका आणि धारणी, नांदगाव खंडेश्वर या नगरपंचायतींमध्ये निवडणुका होत आहेत.

या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपला अंजनगाव सुर्जी, वरूड, दर्यापूर, चांदूर बाजार, धामणगाव रेल्वे आणि शेंदूरजनाघाट नगरपालिकांमध्ये सत्ता मिळाली होती, तर चिखलदरा आणि चांदूर रेल्वे येथे काँग्रेसची सत्ता होती. मोर्शीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि अचलपुरात शिवसेनेचे वर्चस्व होते. नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीत भाजपची तर धारणीत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती.

दहा नगरपालिकांसाठी एकूण २८२ नगरसेवक आणि १० नगराध्यक्षांची निवड केली जाईल. याव्यतिरिक्त, धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगरपंचायतींमध्ये प्रत्येकी १७नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष, असे एकूण ३६ लोकप्रतिनिधी निवडले जातील.एकूण ३१६ नगरसेवक आणि १२ नगराध्यक्ष मिळून ३२८ लोकप्रतिनिधींसाठी जिल्ह्यातील ३ लाख ५८ हजार ८६८ मतदार मतदान करतील.

## भाजपसमोर वर्चस्व टिकवण्याचे आव्हान

### आमदारांची परीक्षा

जिल्ह्यात भाजपचे सर्वाधिक आमदार आहेत. त्यामुळे या निवडणुका भाजपच्या आमदारांसाठी परीक्षाच ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने बाजी मारली. मात्र, वर्षभरापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला अपेक्षित कामगिरी करता आली नाही, त्यामुळे काँग्रेसवरही दडपण आहे. महायुतीतील पक्ष हे केंद्र, राज्यापाठोपाठ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करणार आहेत. विरोधकांनी 'मतचोरी', कृषी कर्जमाफी, कायदा, सुव्यवस्थेच्या प्रश्नावर रान पेटवले आहे. यातून नागरिकांना कौल द्यायचा आहे. शहरांचे कारभारी ठरवणारी ही निवडणूक राजकीय पक्षांना त्यांची ताकद दाखवण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

# जिल्हा परिषदेत कमिशनखोरी थांबवा; अन्यथा कार्यकारी अभियंत्यास काळे फासू

■ वंचित बहुजन युवा आघाडीचा इशारा
■ राजेंद्र पातोडे यांनी जिल्हा परिषदेतील भ्रष्टाचारावर केली टीका

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा परिषद बांधकाम विभागात सुरू असलेल्या कमिशनखोरीचा पर्दाफाश करत, हा भ्रष्टाचार त्वरित थांबवला नाही तर कार्यकारी अभियंत्यास काळे फासू असा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी दिला आहे.

आज जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यालयात वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. या वेळी पातोडे यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेत काम वाटपात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार सुरू असून काही विशिष्ट ठेकेदारांसाठीच कामे राखून ठेवली जात आहेत. यामध्ये अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा थेट सहभाग असल्याचा आरोप त्यांनी केला.

०४ नोव्हेंबर रोजी संविधान भवन येथे झालेल्या कामवाटप समितीच्या सभेत २२ कामांची किंमत फक्त ३३ लाख रुपये दाखवण्यात आली असली तरी प्रत्यक्षात



जवळपास ७ कोटी ७० लाख रुपयांची कामे छुप्या पद्धतीने वाटप करण्यात आली असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. अकोट तालुक्यातील रामापूर (धारूळ), अकोलीजहाँ तसेच तेल्हारा तालुक्यातील झरी बाजार, भिली आणि अडगाव बु. या ग्रामपंचायतीतील विकासकामांसाठी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव देऊनही संबंधित अधिकारी टेंडर बुक देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे पातोडे यांनी सांगितले. इतकेच नव्हे तर काही ठेकेदारांना आमदारांचे नाव सांगून प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रामापूर (धारूळ) येथील दोन प्रस्तावित कामांपैकी एका कामाचे टेंडर बुक एका ठेकेदाराने घेतले असताना, त्याच गावातील दुसऱ्या कामासाठी सरपंचांना वारंवार टाळाटाळ करण्यात येत असल्याचे उदाहरण त्यांनी दिले.

या सर्व प्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करूनही अद्याप काहीच सुधारणा झालेली नाही. त्यामुळे भ्रष्टाचार व कमिशनखोरी थांबवली नाही तर कार्यकारी अभियंता यांना काळे फासण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा राजेंद्र पातोडे यांनी दिला. या पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे, जिल्हा महासचिव राजकुमार दामोदर, माजी जि.प. सदस्य गोपाल कोल्हे, सचिन शिराळे, जय रामा तायडे, नागेश उमाळे, वैभव खडसे, सुगत डोंगरे, श्रीकृष्ण देवकुणबी, राजदर खान, अमोल डोंगरे, महेंद्र शिरसाट, अमोल वानखडे, अभी वानखडे, मयूर सपकाळ, रवी वानखडे, आकाश शेगोकार, विश्वजीत खंडारे, विजय पातोडे, विकी दांदळे, आकाश जंजाळ, सुरज दामोदर आदी उपस्थित होते.

# लोंबकळलेले विद्युत तारा धोकादायक; महावितरण झोपेत

## खेट्री येथे शाळेसमोर विद्युत तार कोसळला – सुदैवाने अनर्थ टळला

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्राचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. गेल्या काही महिन्यांपासून लोंबकळलेल्या विद्युत तारा दुरुस्त न केल्याने ग्रामस्थांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. अखेर खेट्री येथे मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू शाळेच्या समोर ६ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी लोंबकळलेला विद्युत तार कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने मोठा अनर्थ टळला असला तरी पालक आणि ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, लोंबकळलेल्या तारा दुरुस्तीबाबत महावितरणकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या, परंतु त्याकडे कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. महावितरणचा कारभार निष्क्रिय असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आता विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, शाळेच्या परिसरातील सर्व लोंबकळलेले तारे तात्काळ बदलावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. महावितरण विभागाने तात्काळ कार्यवाही न केल्यास गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आंदोलन छेडले जाईल,' असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

**वेळेवर दखल न घेतल्यास जीवितहानीची शक्यता! :** खेट्री येथील मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू शाळेजवळ विद्युत तार कोसळल्याची ही पहिलीच घटना नाही. यापूर्वी १४ जुलै २०२५ रोजी याच परिसरात लोंबकळलेला तार कोसळून दोन शेळ्या दगावल्या होत्या. तरीसुद्धा



महावितरण विभागाने काहीही धडा घेतलेला नाही. त्यामुळे वेळेवर दखल न घेतल्यास यावेळी मानवी जीवितहानी होण्याची दाट शक्यता असल्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

**प्रवाह असलेला तार अनेक तास पडून! :** गुरुवार रोजी रात्री पडलेला विद्युत तार अनेक तास प्रवाहासह रस्त्यावर पडून होता. तरीदेखील महावितरणचा एकही कर्मचारी घटनास्थळी फिरकला नाही. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण होते. ग्रामस्थ आणि जनावरे जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडत असल्याचे दृश्य दिसून आले.

# न.पा. निवडणुकी दरम्यान नियमांचे काटेकोर पालन करावे - संदीप अपार



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

मुर्तिजापूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा २०२५ चा अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम व निवडणूक प्रक्रिया बाबत आज दिनांक ६/११/२०२५ रोजी नगर परिषद सभागृह मुर्तिजापूर येथे पत्रकार परिषदेचे आयोजन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. संदीपकुमार अपार व तहसीलदार सौ. शिल्पा बोबडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. या निवडणुकीसाठी अर्ज भरण्यापासून ते निकाल जाहीर होईपर्यंतचा संपूर्ण कालावधी कार्यक्रम या बाबत माहिती त्यांनी दिली.

नगर परिषदेच्या १२ प्रभागांमधील निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान वेळ ठरविण्यात आली असून सुटीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नसल्याचे सांगण्यात आले. नामनिर्देशनपत्रांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार असून, अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत १९ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर २०२५ दुपारी ३ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. या बाबत काही अपील असल्यास दिनांक २१ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत अपिलांचा निर्णय करण्यात येईल. उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप २६ नोव्हेंबर २०२५ रोजी होईल. मुख्य मतदान प्रक्रिया २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० या वेळेत पार पडणार आहे. मतमोजणीची प्रक्रिया ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून नगर परिषद नूतन इमारत क्रमांक ४ येथे होईल. निवडणुकीचे निकाल १० डिसेंबर २०२५ पूर्वी घोषित केले जाणार आहेत. या निवडणुकीत एकूण ४०,०४९ मतदार सहभागी होतील. त्यात महिला – २०,२१४ व पुरुष – १९,८३१ तर इतर – ०४ मतदारांचा समावेश आहे. एकूण ४६ मतदान केंद्रे तयार करण्यात आली असून नगर परिषदेचे एकूण २५ सदस्य निवडले जाणार आहेत. नगराध्यक्षाची निवड थेट जनतेतून होणार असून संपूर्ण प्रक्रिया नगर परिषद कार्यालय, मुर्तिजापूर येथे पार पडणार आहे असे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# कृषि समृद्धी योजनेत चिया लागवडीसाठी अर्ज करा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात चिया लागवड क्षेत्रात वाढ करण्याच्या दृष्टीने कृषी समृद्धी योजनेत चिया लागवडीसाठी प्रत्येक तालुक्यातील ५३५ शेतक-यांना लाभ देण्यात येणार आहे. अकोला जिल्ह्यात एकूण ३ हजार ७४५ शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे.

या योजनेत चिया पीक प्रात्याक्षिकासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के मर्यादेत प्रोत्साहनपर अनुदान (६ हजार रू. प्रतिएकर) इतके असेल. एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त २ हेक्टरपर्यंत लाभ घेता येईल. सहाय्यक कृषि अधिकाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांनी लागवड केल्याचे प्रमाणपत्र व लागवडीचा जिओ टॅग फोटो अनुदान मिळण्यासाठी बंधनकारक राहील. लाभासाठी विहित अर्ज केलेला असावा. शेतकरी ओळखपत्र, सातबारा / ८ अ अनिवार्य, तालुका कृषी अधिकारी यांचे पूर्वसंमती पत्र आवश्यक आहे.

चिया पिकाचे क्षेत्र वाढवणे आणि उत्पादन क्षमता सुधारणा करणे, तंत्रज्ञान-संवर्धीत शेती पद्धती वापरून उत्पादनाची गुणवत्ता टिकवणे, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपनीद्वारे सामुहिक कार्य व बाजार व्यवस्थेत सुधारणा करणे अशी योजनेची उद्दिष्टे आहेत. जिल्ह्यातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी चिया लागवडीसाठी १५ डिसेंबरपर्यंत तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

## लाडकी बहिण लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण करावी

**अकोला :** जिल्ह्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्तता करून घेण्याचे आवाहन जिल्हा महिला बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी ई-केवायसी पूर्ण असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व संबंधित लाभार्थ्यांनी दि. १८ नोव्हेंबरपूर्वी ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी असे आवाहन श्री. पुसदकर यांनी केले आहे.

# अकोला जिल्हा पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध न्यायालयीन अवमान कार्यवाहीची प्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

नागपूर उच्च न्यायालयाने अकोला जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध न्यायालयीन आदेशांचे सातत्याने उल्लंघन केल्याबाबत अवमान कार्यवाही सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

हे प्रकरण 'साजिदा परवीन शौकत अली विरुद्ध पोलीस अधीक्षक, अकोला व अन्य' या याचिकेच्या सुनावणीदरम्यान समोर आले. न्यायालयाने यापूर्वी पोलिस विभागाला तपास प्रगतीचा अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. तथापि, संबंधित अधिकाऱ्यांनी हे आदेश वेळेत व योग्यप्रकारे पार पाडले नसल्यामुळे न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, आदेशांचे पालन न करणे हे न्यायालयीन अवमानास पात्र आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी न्यायालयासमोर प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या वर्तनाची माहिती त्यांना नियुक्त करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देऊन आदेशांची प्रत पाठविण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणात याचिकाकर्तीच्या वतीने ॲड. परिमल कवीश्वर, ॲड. चैतन्य कुलकर्णी आणि ॲड. संतोष गोले यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. न्यायालयाच्या या कठोर भूमिकेमुळे पोलिस विभागातील अधिकाऱ्यांच्या जबाबदारीकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे.

# राणी सती दादी यांच्या प्रकटोत्सवाचे आयोजन

**अकोला :** लाखो भक्तांची तारणहार झुंझुनूची राणी सती दादी यांच्या प्रकटोत्सवाचे आयोजन महानगरात करण्यात आले आहे. जि प रोडवरील राणी सती धाम येथे हा मंगसर बदीचा दोन दिवसीय प्रकटोत्सव दिनांक १२ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर दरम्यान पार पाडणार आहे. या दोन दिवसीय उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात बुधवार दि १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.४५ वाजता दादींचा भव्य ५६ भोग दर्शन उत्सव साकार



करण्यात येईल. या कार्यक्रमाचे यजमान सौ. अनध अग्रवाल आणि सौ. श्रेया अग्रवाल (मुंबई) राहतील. या वेळी दादींची भव्य महाआरती असंख्य भक्तांच्या उपस्थितीत होईल. गुरुवार दि १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत ५६ भोग दर्शन आणि जात पूजा उत्सवाचे आयोजन केले जाईल. या दिवशीचे यजमान संजय पु. अग्रवाल असतील. दुपारी २ वाजता सुप्रसिद्ध गायिका चंदा तिवारी यांचा दादी मंगलपाठ कार्यक्रम होईल. उत्सवाचे बुंदीप्रसाद यजमान नंदकिशोर खेतान, राजेश अग्रवाल, फुल श्रृंगार यजमान मदनलाल तुलशान, आदिलाबाद, विद्युत रोषणाई यजमान डॉ. मनोज अग्रवाल अंदुरावाले, पंकज अग्रवाल आदी लावण्यात येतील.

# वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त मनपात सामूहिक गान

■ प्रतिनिधी | अकोला ■

दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी वंदे मातरम या गीतास १५० वर्ष पुर्ण होत आहेत. सर्व जनमानसात देश भावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्वाची भुमिका बजावलेली आहे म्हणून राज्य शासनाच्या निर्देशानुसार आज दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी अकोला महानगरपालिकेच्या



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे, मनपाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालये, मनपा वैद्यकीय आरोग्य विभाग कार्यालय तसेच मनपाच्या शाळांमध्ये अधिकारी/कर्मचारी आणि शालेय विद्यार्थ्यांव्दारे वंदे मातरम गीताचा सामुहिक गान करण्यात आला आहे.

## महाप्रसादाचा घेतला लाभ

अकोला - गुरु नानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक सिंधी कॅम्प परिसरात पूज्य सिंधी जनरल पंचायत या सामाजिक सेवा संस्थेने आयोजित केलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport :- (F0400054) From **SAIDUR RAHMAN KHAN MUBEEN UR RAHMAN KHAN** --TO-- **MUBINUR RAHMAN KHAN SAEEDUR RAHMAN KHAN** My Residential Address is :- Behind Ru Afza School Mohammad Ali Road Baidpura Akola 444001

**Change In Name**

I Have Change My Name in My Educational Documents From **CHANDRASHEKHAR SHIVAJI MANGATE** --TO-- **CHANDRSHEKHAR SHIVAJI MANGTE** My Residential Address is :- At Post Vyala Tq. Balapur Dist. Akola 444302.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- ९२/२०२५ कलम-१९ जा.क्र. ३१३०/२०२५ दि. २७/१०/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** - श्री कानिफनाथ गोसेवा अनुसंधान व गोरक्षण समिती आलेगाव ता. पातुर जि. अकोला

**अर्जदार :** अंकुश ओंकार गिर्हे रा. आलेगाव ता. पातुर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : **७०००/- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :- **काहीनाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालया चे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियती चा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियतन आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कया नीशी आज दिनांक २७/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १११/२०२५ कलम-१९ जा.क्र. ३१६८/२०२५ दि. २९/१०/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** धुपेश्वर बाल शिव उद्यान समिती दुबेवाडी, अकोला

**अर्जदार :-** लक्ष्मिकांत श्रीराम दुबे रा. अशोक नगर, संत कबीर नगर, अकोट फैल, जाधव वर्क्स समोर, अकोल ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **११,०००/-रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २९/१०/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

एस. आर. एन. क्र. AKL/01930/18/25 फेरफारअहवाल/अर्ज क्रमांक ०२/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक** विदर्भ प्रार्थना स्थळ चॅरिटेबल ट्रस्ट सावरा ता. अकोट जि. अकोलाबाबत।

**न्यासाचा पत्ता :** - C/o दुर्गाबाई गजानन कात्रे, मु. पोस्ट सावरा, अकोट, अकोला, अकोट, सावरा

**अर्जदार :-** दुर्गाबाई गजानन कात्रे

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मदाय आयुक्त, अकोला, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | BY CASH | 9000.00 |

(अ) जंगम मिळकत : रोख रु.९०००/- मात्र (अक्षरी रुपये नऊ हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगर पालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NA | NA | NA | NA | NA | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. /- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १३/०८/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९५६/२०२५ प्रोसेस नं.१८०३९/२०२५

चौ.ता. १५/१२/२०२५ दिनांक : ३०/१०/२०२५

**अर्जदार :** १. मिनाक्षी सुधाकर कुलकर्णी २. राजन सुधाकर कुलकर्णी दोघेही रा. प्लॉट न. २०, अवंतिका अपार्टमेंट, एनआयटी लेआउट, जोशी फ्लोअर मिल, स्वावलंबी नगर, राणाप्रताप नगर, नागपूर, ता. जि. नागपूर ३. अंबारिश सुधाकर कुलकर्णी रा. प्लॉट नं. ९७, प्रसाद नगर, टायगर सावजी हॉटेल जवळ, नागपूर अर्बन, ता. जि. नागपूर

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : सुधाकर गणेश कुलकर्णी

**पत्ता :-** रा. श्री नागरा यांचे घराला लागून, दिवेकर आखाड्या जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुधाकर गणेश कुलकर्णी यांचे दि. ०५/०१/२००८ रोजी अरनेजा हार्ट केअर हॉस्पिटल ॲण्ड आयसीसीयू नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक.१५/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**विदयमान सह दिवाणी न्यायाधीश, (क. स्तर) बाळापूर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३१/२०२५ प्रोसेस नं.२७१३/२०२५

चौ.ता. ०८/१२/२०२५

**अर्जदार :** १. शशिकला माणिकराव जायभाये वय अं.७८ वर्ष धंदा निवृत्त रा. श्रीराम चौक, वाडेगाव ता.बाळापुर जि. अकोला २. नंदा श्रीकांत जायभाये वय अं. ५२ वर्ष धंदा घरकाम रा. शिवपुरी चौक, वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला ३. ओम श्रीकांत जायभाये वय अं. ३४ वर्ष धंदा नोकरी रा.बस स्टॅड वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला ४. चेतन श्रीकांत जायभाये वय अं. ३३ वर्ष धंदा नोकरी रा.श्रीराम चौक, वाडेगाव ता.बाळापुर जि. अकोला ५. भुषण श्रीकांत जायभाये वय अं.२८ वर्ष धंदा शिक्षण रा. श्रीराम चौक, वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मयत श्रीकांत माणिकराव जायभाये हे दिनांक १६.०८. २०२५ रोजी वाडेगाव ता. बाळापुर जि.अकोला येथे मरण पावले. वरील नमुद सर्व अर्जदार यांना मयत श्रीकांत माणिकराव जायभाये यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक ०८.१२.२०२५ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०७.११.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधिक्षक (न्यायीक)**
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९७९/२०२५ प्रोसेस नं.१७९६४/२०२५

चौ.ता. ०९/१२/२०२५ दिनांक : २९/१०/२०२५

**अर्जदार :** १. सुमेध उद्धवराव राहाटे रा. अशोक नगर, भोईपूरा, अकोट फाईल, नायगांव, अकोला, ता. जि. अकोला. २. सुरेश उद्धवराव राहाटे रा. श्री. उद्धवराव झांगोजी राहाटे डी-५, १९८३ नालंदा नगर, गजानन मंदिर जवळ, कौलखेड रोड, अकोला, ता. जि. अकोला. ३. छाया खेमदेव गायकवाड रा. नेताजी नगर, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ ४. सुनिता पुरूषोत्तम लिगायत रा. रूम नं. ०३, अशोक भवन, नागवाडी रोड, गावदेवी मंदिर दिवा वेस्ट, ठाणे महाराष्ट्र ५. नितीन ज्ञानदेव राहाटे रा. डॉ. आंबेडकर चौक, महादेव मंदिर जवळ, अशोक नगर, अकोला. ता. जि. अकोला. ६. पुष्पा ज्ञानदेव राहाटे ७. भिमराव ज्ञानदेव राहाटे ६ व ७ रा. ए ७, साईसदन अपार्टमेंट, हाजी मलंग रोड, आर. एल. वाय बील्डींग जवळ, कांदीवली, कल्याण, ईस्ट कल्याण, काटेमानीवली ठाणे एस. एम. ४२१३०६ ८. प्रविण ज्ञानदेव राहाटे रा. सदगुरू विला, बि. विंग्स, फस्ट फ्लोअर, फ्लॅट नं. बी / १०६. मलंग रोड, नांदिवली बस स्टॉपच्या विरूद्ध गंधर्व सर्वास सेंटर जवळ, पिसावली, कल्याण ईस्ट ९. सुधा सुधाकर जगतापे रा. रूम नं. २०१. दुसरा मजला, अर्जुन सदन, श्री मलंग रोड, ५०५० धाव्याच्या मागे, पिसावली, पिसावली गाव, कल्याण, काटेमणीवली ठाणे. एम. एस. ४२१३०६

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : झांगोजी श्रावण राहाटे

**पत्ता :-** रा.अशोक नगर, भोईपूरा, अकोट फाईल, नायगांव, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत झांगोजी श्रावण राहाटे यांचे दि. २६/०५/१९९४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# माफियांची नगरसेवक होण्याची धडपड

## चारित्र्याचा कस उमेदवारीत लागणार की पैशाचा दम बोलणार ?

**वर्धा/ रवींद्र लाखे**

जिल्ह्यात नगरपरिषदेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे आणि राजकीय अड्डयांवर उमेदवारीसाठी धावपळ सुरू झाली आहे. पैशाची ताकद, बाहुबल आणि माफियाशाही यावर आधारीत नव्या राजकारणाचा नवा अध्याय सुरू झाला असल्याचे दिसते. वाळू माफिया, भू-माफिया, रेशन माफिया सगळेच आता जनतेची सेवा करण्याच्या नावाखाली नगरसेवक होण्यासाठी उत्सुक झालेत, पक्षांनी चारित्र्य, शिक्षण आणि समाजसेवा यावर भर



देणार असल्याच्या चर्चा चालू असल्या तरी पाठीमागच्या गल्ल्यांतून माफियांचे राजकीय फॉर्म भरले जात आहेत, हे लोकांच्या लक्षात येतेय. लोक म्हणतात, निवडणुकीला उमेदवार नाही, बोली लावणारे आहेत.

नाऊ वर्षानंतर मैदान मोकळं पण कोणासाठी?

नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षणामुळे निवडणुकीची रणधुमाळी पेटली आहे. गेल्या नऊ वर्षांत एकाच नगरसेवकांनी पाय घट्ट रोवलेत. आता मतदारांना नवे चेहरे, नवी विचारसरणी आणि स्वच्छ चारित्र्य हवे आहे. मात्र, पक्षांनी पुन्हा तेच जुनेच खेळाडू मैदानात उतरवले तर जनता शांत बसणार नाही, अशी चर्चा गल्लीबोळांत होत आहे.

**माफियांना उमेदवारी, जनतेला फसवणूक**

शहराच्या विकासाचे स्वप्न दाखवणारे बरेच इच्छुक उमेदवार खरं तर विकासाच्या ठेकेदारीतून निर्माण झालेले आहेत. कोणी वाळूच्या गाड्या हाकतं तर कोणी जमिनींवर कब्जा करतं; अशा लोकांनी आता नगरपरिषदेवर कब्जा करण्याची तयारी सुरू केली आहे. हे पाहून जनतेत तीव्र नाराजी आहे.

**ओबीसीचा सवाल उमेदवारीत नवा संघर्ष**

मराठा समाज ओबीसी प्रवर्गात आल्यानंतर आता जुना की नवा ओबीसी हा मुद्दा प्रभागनिहाय समीकरण बदलणारा ठरत आहे. प्रत्येक पक्षात उमेदवारीची पाटी उलटीफेर होत आहे. मतदानाआधीच गटबाजी सुरू आहे आणि निर्णयाची सूत्रे हाती घेण्यासाठी नेत्यांमध्ये शाब्दिक चकमकी रंगल्या आहेत.

**शेवटी प्रश्न एकच.. नगरसेवा करणार की माफियांची सेवा?**

चारित्र्यावर निकाल लागणार की नोटेबाजीवर?

या निवडणुकीत खरा कस लागणार तो लोकशाहीचा

## संक्षिप्त

### आंजी मोठी बसस्थानकात बस-कार धडक

**आंजी मोठी -** आंजी मोठी येथील बसस्थानक परिसरात



आर्वी-वर्धा मार्गावर शिवशाही बसने उभी असलेल्या कारला धडक दिली.

या धडकेत कारचे अंदाजे २५ ते ३० हजार रुपये नुकसान झाले, मात्र सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.धडक झाल्यानंतर कारचालकांनी तात्काळ वर्धा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असून, पोलीस संबंधित घटनेचा पुढील तपास करत आहेत. स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांनी वाहनचालकांच्या अधिक सावधगिरीची गरज असल्याचे म्हटले आहे.बसस्थानक परिसरातील वाहतूकीमुळे सावधगिरी कमी असल्याने हा अपघात घडल्याचा संशय असल्याचे पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी सांगितले. पुढील तपासात या अपघाता मागील कारणे उलगडण्याचा प्रयत्न केला जात आहे.या घटनेत जीवितहानी टळल्याने मानवी जीवांची सुरक्षा ही प्राथमिक प्राधान्य असल्याचा संदेश नागरिकांना दिला जात आहे.

### चोरट्यांनी सतरा हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा -** शहरालगतच्या आलोडी भागातील लक्ष्मी नगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी चोरी केली. चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांसह रोख असा १७ हजार रुपयांचा ऐवज लंपस केला.आलोडी येथील लक्ष्मीनगर व्होरा ले-आऊट येथील रहिवासी रितेश कामताप्रसाद सदाफल हे केळझर येथे गेले होते. कुलपबंद घराला अज्ञात चोरट्याने लक्ष करत घरात प्रवेश करून घरातील सोन्याचे मनी असलेले मंगळसूत्र, सोन्याचे कानातले, रोख २ हजार असा १७ हजार ३० रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही बाब लक्षात येताच रितेश यांनी सेवाग्राम पोलिस स्टेशन गाठून तक्रार नोंदविली. याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# दहशत पसरविणाऱ्या वाघाचा तत्काळ बंदोबस्त करा : आ.समीर कुणावार



**समुद्रपूर/ जनमाध्यम**

गिरड, खुर्सापार परिसरात असलेल्या वाघाला जेरबंद करण्याची परवानगी १३ सप्टेंबरला मिळाली. वनविभागाचे ५० च्या वर अधिकारी व कर्मचारी वाघाला जेरबंद करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करीत आहे. वाघ अद्याप हाती लागला नाही. या घडामोडीवर आ. समीर कुणावार लक्ष ठेवून आहेत. त्यांनी ६ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता वनमंत्री गणेश नाईक यांना फोन करून वाघाचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

वाघाला पकडण्यासाठी वनविभागाने जंगल पिंजून काढला. तेव्हा त्याने सात गुरे फस्त केली. तो वाघ कधी खुर्सापार, तर कधी नागपूर जिल्ह्यात फेरफटका मारतो. आ. समीर कुणावार हे संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहे. त्यांनी ६ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता वनमंत्री गणेश नाईक यांना दोनदा फोन करून उपवनसंरक्षक हरबिदर सिंग यांना कॉंफरन्सवर घेऊन वाघामुळे शेतकऱ्यांचे काय हाल आहे, याची संपूर्ण माहिती दिली. गिरड परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या वाघाला तत्काळ पकडून त्याचे दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करा, अशी मागणी केली आहे. उपवनसंरक्षक हरबिदर सिंग, वनपरिक्षेत्राधिकारी निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनात वाघाला पकडण्यासाठी जंगलात २ ड्रोन कॅमेरे रोज फिरत आहे.

# वैरण बियाणे व पशुखाद्य कार्यक्रम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा/ जनमाध्यम**

पशुसंवर्धन विभागाच्यावतीने दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी वैरण बियाणे व पशुखाद्य कार्यक्रम योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत चारा उत्पादन कार्यक्रमाकरीता योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली असून पशुपालकांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले आहे.

दुध उत्पादन वाढीसाठी दुधाळ पशुधनास पुरेशा प्रमाणात व पौष्टिक चारा उपलब्ध व्हावा व दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी चाऱ्याची तूट कमी व्हावी, याकरीता सदर योजना राबविण्यात येत असून योजनेंतर्गत ७ हजार ५५० पशुपालकांना वैरण बियाणे वाटपाचा लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार लाभ देण्यात येणार आहे. तसेच पशुपालकांडील संकरीत, देशी कालवडींना शास्त्रोक्त पध्दतीने जोपासण्यासाठी त्यांना सकस खाद्य देऊन तसेच अधिक उत्पादन देणाऱ्या संकरीत गायींची निर्मिती करणे याकरीता लाभार्थ्यांकडील संकरीत, देशी कालवडीस तिच्या वयाच्या चौथ्या महिन्यापासुन ते ३२ महिन्यापर्यंत एकुण १ हजार ९०० किलो ग्रॅम पशुखाद्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.कार्यक्रमांतर्गत पशुखाद्याच्या स्वरुपात अल्प भूधारक, अत्यल्प भूधारक व भूमिहीन शेतमजूरास ५० टक्के अनुदानावर पशुखाद्य पुरवठा करणे व या अंतर्गत निवड झालेल्या कालवडीचा ३ वर्षाचा विमा उतरविणे या बाबीचा समावेश असून ५० टक्के अनुदान उर्वरीत ५० टक्के रक्कम लाभार्थी स्वहिश्याची राहील.

**योजनेचे स्वरुप** - प्रति लाभार्थी १ हेक्टरच्या क्षेत्रात वैरण उत्पादन घेण्यासाठी १०० टक्के अनुदानावर वैरण बियाण्यांचा पुरवठा करण्यात येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी पशुपालकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयामध्ये संपर्क साधावा व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित प्रतिसह अर्ज सादर करावा.

**पात्रता निकष** - वैरण बियाण्यांकरीता पशुपालकांकडे स्वत:ची किमान ३ ते ४ जनावरे असावी. स्वत:ची शेतजमीन व सिंचनाची सुविधा उपलब्ध असावी. पशुखाद्याकरीता लाभार्थ्यांकडे संकरीत, देशी कालवड ३ ते ४ महिने वयोगटातील असावी. सर्व प्रवर्गातील पशुपालक लाभ घेण्यास पात्र तथापि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती मधील अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थीस प्राधान्य दिले जाईल. एका लाभार्थ्यांस एका आर्थिक वर्षात एकदाच लाभ दिला जाईल, असे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा उपायुक्त डॉ. जगदीश बुकतरे यांनी कळविले आहे.

# अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या घरातली दिवाळी विझली

**साहूर/ जनमाध्यम**

दिवाळीचा सण म्हटला की घराघरात उत्साह असतो, पण यंदा ग्रामीण भागात मात्र अंधाराचेच साम्राज्य आहे. अतिवृष्टी, नापिकी आणि शासनाची निष्क्रियता या त्रिवेणी संगमाने शेतकऱ्यांच्या घरातली दिवाळीच संपवली आहे.

श्रीमंतांच्या महालात प्रकाशझोत झळकतोय, पण शेतकऱ्यांच्या झोपडीत मात्र दिव्याचं तेल मिळणं महाग पडलंय.खरीप हंगामासाठी जीव तोड मेहनत करून पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांना पावसाने आधी दगा दिला. नंतर त्याने एवढे थैमान घातले की पिके वाहून गेली, सडली. मेहनतीच्या घामाचे पाणी पिकांऐवजी शेतात साचले. ज्याच्यावर त्यांच्या जगण्याचा विश्वास होता, त्या जमिनीनेच यंदा साथ सोडली.राज्य सरकारने मदतीच्या फुगलेल्या घोषणा केल्या, पण एक पैसासुद्धा शेतकऱ्यांच्या खात्यात पोचला नाही. दिवाळी संपून पंधरा दिवस झाले, तरी शासन झोपलेलेच आहे. या खोट्या आश्वासनांची रिपरिप शेतकऱ्यांच्या मनात रेंगाळतेय. दुसऱ्यांच्या घरात फटाके फुटले, मिठाई वाटली; पण शेतकऱ्याच्या घरात मुलांना गोड खायला नव्हते, कपडे नव्हते, आणि दिवे लावायलाही तेल नव्हते. अशी ही दिवाळी अंधाराची दिवाळी, बेदखलीची दिवाळी आता जर शासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले नाहीत, तर ग्रामीण भागात रागाचा ज्वालामुखी फुटणार हे निश्चित आहे. शेतकरी संपला, तर शेतीही संपेल; आणि शेती संपली, तर शहरातील दिवेही मावळतील हे शासनाने लक्षात ठेवावे.

# डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण

## योजनेसाठी प्रस्ताव आमंत्रित

**वर्धा/ जनमाध्यम**

डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेंतर्गत नोंदणीकृत मदरसांना पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १० लाख रुपयाचे अनुदान दिले जाते. त्यासाठी १४ नोव्हेंबर पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

मदरसा चालविणारी संस्था राज्यातील वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असावी. मदरसांमध्ये शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी हे नियमित शिक्षण घेण्याकरीता नजिकच्या शाळेत प्रवेशित असावेत. तसेच त्या मदरशांमध्ये कत्रांटी पध्दतीने नेमन्यात आलेल्या शिक्षकांव्दारे गणित व विज्ञान हे विषय शिकविले जातील अशा मदरशांना प्राधान्य दिले जाईल व तसेच जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील. एका इमारतीत एकच मदरसा असावा.

मदरशांना इमारतीचे नुतणीकरण व डागडूजी, पेयजलाची व्यवस्था करणे, प्रसाधान गृह उभारणे व त्याची डागडूजी करणे, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फर्णीचर, मदरसांच्या निवासस्थानात इन्व्हर्टरची सुविधा उपलब्ध करणे, मदरसांच्या निवासी इमारतीचे नुतणीकरण व डागडूजी, संगणक, हार्डवेअर, सॉप्टवेअर, प्रिन्टर्स, प्रयोगशाळा साहित्य, सायन्सकीट, मॅथेमॅटीक्स कीट व इतर अभ्यासक्रम साहित्य खरेदी करणे, सौर ऊर्जा प्रकल्प बसविणे, क्रिडा साहित्य उपलब्ध करणे, स्मार्ट बोर्ड सह प्रोजेक्टर बसविणे, डिजिटल अभ्यासक्रम उपलब्ध करणे यासाठी अनुदान देण्यात येते.

या योजनेच्या अनुदानासाठी विहीत नमुन्यातील परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि.१४ नोव्हेंबर पर्यंत सादर करावे. या प्रस्तावात वयोगटनिहाय विद्यार्थ्यांची संख्या, आवश्यक असलेल्या शिक्षकांची संख्या आवश्यक असलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम इत्यादीचा समावेश असावा.

अर्जाचा नमुना तसेच योजनेच्या अटी, शर्ती व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे याबाबत सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov या संकेतस्थळावर अल्पसंख्याक विकास विभागाच्या ११ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयात देण्यात आली आहे, असे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी कळविले आहे.

# स्नेहा आकरे यांच्या उमेदवारीला नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा

**वर्धा/ जनमाध्यम**



जनतेच्या सेवेत झोकून दिलेल्या समाजसेवक आशिष आकरे यांच्या सामाजिक बांधिलकीचा ठसा आता नगरपरिषद निवडणुकीतही उमटताना दिसतो आहे.

प्रभाग क्रमांक १४ (महिला राखीव) येथे त्यांच्या सहचारिणी स्नेहा आशिष आकरे यांची उमेदवारी जाहीर होताच परिसरातील नागरिकांनी त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दर्शविला आहे. समाजोपयोगी कार्य, गरजू परिवारांना दिलेला आधार आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमधील सहभाग यामुळे आकरे दांपत्याने नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण केला आहे. ज्या समाजाशी आपली नाळ घट्ट जोडलेली आहे, त्या समाजासाठी काहीतरी परत देण्याची भावना या कुटुंबाच्या कार्यातून दिसते.शहरात साजऱ्या होणाऱ्या महापुरुषांच्या जयंत्या, उत्सव व सामाजिक कार्यक्रमांमध्ये आशिष आकरे यांचा नेहमीच सहभाग राहिला आहे. मदतीला तत्पर राहणाऱ्या त्या कार्यकर्त्यांच्या जोडीदार म्हणून स्नेहा आकरे यांना प्रभागातील नागरिकांनी नगरसेवकपदासाठी आपली पसंती दिली आहे.स्थानिक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आणि महिला सबलीकरणासाठी सक्रिय भूमिका घेण्याची तयारी स्नेहा आकरे यांनी दर्शविली आहे. त्यामुळे प्रभाग १४ मध्ये आगामी निवडणुकीचा मुख्य आकर्षक आणि प्रभावी महिला चेहरा म्हणून त्यांचा उल्लेख होत आहे.

# अंगठा उमटत नाही... आधार अपडेटची झाली 'डोकेदुखी'

## साहूर परिसरातील वृद्ध नागरिक अडचणीत; शासकीय योजनेकडून वंचित होण्याचा धोका

**साहूर/ जनमाध्यम**

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना आधार कार्ड अद्ययावत ठेवावे लागते. मात्र साहूर व परिसरातील अनेक वृद्धांचे अंगठ्याचे ठसे उमटत नसल्याने त्यांचे आधार कार्ड अपडेट करताना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.



वयाच्या पुराव्यासाठी जन्मदाखला नसल्यामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली असून, अनेक वृद्धांना शासकीय योजनांचा लाभ गमवावा लागतो आहे.पूर्वी ग्रामीण भागात प्रसूती घरातच होत असल्याने जन्मनोंदी करण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे सध्या वयोवृद्ध नागरिकांकडे जन्माचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही. काहींच्याकडे शाळा सोडल्याचा दाखला असला तरी, तो आता अधिकृत पुरावा मानला जात नाही. परिणामी वृद्धापकाळात आधार अपडेट करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यात अडथळे येत आहेत. त्या काळी जन्मनोंदणी नव्हती, आता म्हातारपणात पुरावा आणायचा कुठून? असा प्रश्न अनेक वयोवृद्ध उपस्थित करत आहेत. अंगठ्याचे ठसे उमटत नसल्याने फिंगरप्रिंट पडत नाही, तर वयाचा पुरावा नसल्याने सत्यापन प्रक्रियेही अडकली आहे. काही तरुणांच्या कार्डामध्येही अशाच तांत्रिक कारणांनी त्रुटी दिसत असल्याचे सांगण्यात येते.स्थानिक स्तरावर चर्चा सुरु असून नागरिकांनी शासनासमोर मागणी केली आहे की, ज्या वृद्धांकडे जन्मदाखला नाही, त्यांच्या शाळा सोडल्याचा दाखला वैध पुरावा म्हणून ग्राह्य धरावा. अन्यथा पात्र लाभार्थी आधार अपडेट न झाल्याने शासकीय योजनेपासून वंचित राहतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# चार दिवसांत मतदारांचा कौल जिंकणार कोण?

## उमेदवारांची धावपळ सुरू, प्रचाराचा मर्यादित रणसंग्राम

**वर्धा/ जनमाध्यम**

नगरपालिका निवडणुकांचा बिगुल वाजलाच आहे, पण यंदा उमेदवारांना जनता जिंकण्यासाठी मिळालेय फक्त ४ दिवस एवढ्या थोड्या काळात मतदारांचा कौल मिळवायचा म्हणजे उमेदवारांना दिवसरात्र झोप नाही.

निवडणूक आयोगाने २३ दिवसांचा कार्यक्रम जाहीर केला असला तरी प्रचाराचं खऱ्या अर्थानं रणांगण उघडणार २६ नोव्हेंबरला. त्या दिवशी अंतिम यादी प्रसिद्ध होईल, चिन्हवाटप होईल आणि त्यानंतर उमेदवारांना प्रचाराची परवानगी. पण प्रचाराचा शेवट फक्त ३० नोव्हेंबरच्या सायंकाळी पाचपर्यंत म्हणजे उणेपुरे ४ दिवस आता या ४ दिवसांत मतदारांच्या दारी धाव घेत, सभा, पोस्टर, सोशल मीडिया आणि गल्लीतील गप्पांमधून मतं खेचणं हेच उमेदवारांचं ध्येय ठरणार आहे. राजकीय पक्षांनाही कस लागणार आहे. उमेदवार उभे करणं, प्रचाराची रणनिती आखणं आणि मतदारांपर्यंत पोहोचणं या सगळ्याचं नियोजन विजेच्या वेगाने करावं लागेल. नगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय, तर नगरपंचायतींत एकसदस्यीय पद्धतीने निवडणुका होत असल्याने प्रत्येक मतच महत्त्वाचं ठरणार आहे.जिल्ह्यात सुमारे १६५ उमेदवार रिंगणात उतरण्याची शक्यता असून राजकीय तापमान चांगलंच वाढलं आहे. आता पाहायचं एवढंच चार दिवसांचा हा प्रचार कोणासाठी सुवर्णसंधी ठरणार, आणि कोणाची स्वप्नं कागदावरच राहणार ? हे मात्र ३ डिसेंबर रोजी कळणार आहे.

# जेवरीया शेखचा राष्ट्रीय वूशु स्पर्धेत रौप्यविजय

## महाराष्ट्र, वर्धा व हिंगणघाटचा अभिमान

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

राष्ट्रीय पातळीवरील वूशु स्पर्धेत हिंगणघाटच्या कन्येने अभिमानास्पद कामगिरी करत महाराष्ट्राचे नाव देशभर उजळवले आहे.

क्रीडा भारती क्लब आणि द फायटर प्लॅनेट क्लब हिंगणघाटची खेळाडू जवेरीया सलीमोद्दीन शेख हिने जम्मू राज्यातील श्रीनगर येथे पार पडलेल्या स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत राष्ट्रीय शालेय वूशु स्पर्धा २०२५-२६





मध्ये रौप्यपदक पटकावले. या स्पर्धेत जेवरीयाने राष्ट्रीय स्तरावरील तीन प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले, तर दोनशी जबरदस्त झुंज देत कौशल्यपूर्ण प्रदर्शन केले. तिच्या या मेहनती आणि जिद्दीने महाराष्ट्र, नागपूर विभाग, वर्धा जिल्हा तसेच हिंगणघाट तालुक्याला नवा गौरव प्राप्त झाला आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्य वूशु संघाचे कोच आणि वर्धा जिल्हा वूशु क्रीडा संघाचे अध्यक्ष निलेश राऊत, क्रीडा शिक्षक सुशांतसिंह गहेरवार, फैजान शेख, निशांत येखंडे, कबीर महेशगौरी तसेच महिला कोच नम्रता दुबे आणि रूपाली क्षिरसागर यांनी जेवरीयाचे अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

# कुष्ठरुग्ण शोध मोहीमे साठी सर्वांनी प्रयत्न करा - सीईओ पराग सोमण

## १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर कालावधीत कुष्ठरोग शोध मोहिम



**वर्धा/ जनमाध्यम**

कुष्ठरुग्ण शोध अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या कुष्ठरुग्ण शोध मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील एकही कुष्ठरुग्ण सुटणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. आरोग्य यंत्रणेसोबतच आशा, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेऊन मोहिम यशस्वी करा, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केल्या.

जिल्हा परिषद येथे कुष्ठरुग्ण शोध अभियान मोहिमेच्या नियोजनाकरीता जिल्हा समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी या सूचना केल्या. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्यासह जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ. रा.ज. पराडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, आयएमएचे प्रतिनिधी उपस्थित होते.कुष्ठरुग्ण शोध मोहिम राबवितांना ज्या परिसरात कुष्ठरुग्ण आढळून येतील त्या परिसरात १०० टक्के संशयित रुग्ण तपासणी करण्यात यावी. तपासणीकरीता प्रत्येक पथकामध्ये महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग नोंदवावा. शहरी भागांमध्ये स्वयंसेवी संस्थाचा सहभाग नोंदवून मोहिम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावे, अशा सूचना पराग सोमण यांनी केल्या. समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरीत बहुविध औषधोपचाराखाली आणणे, नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडीत करुन होणारा प्रसार कमी करणे, नवीन कुष्ठरुग्णांमध्ये विकृतीचे प्रमाण दर दहा लाख लोकसंख्येमागे एकपेक्षा कमी करणे, सन २०२७ पर्यंत कुष्ठरोग दुरीकरणाचे ध्येय साध्य करुन कुष्णरोग निर्मुलनाच्या दिशेने वाटचाल करणे व समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे हा अभियानाचा उद्देश असल्याचे डॉ. रा.ज. पराडकर यांनी सांगितले. १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येणारी मोहिम यशस्वी करण्याकरीता विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यशाळा घेण्यात आली आहे. यासाठी सुक्ष्मकृती आराखडा तयार करण्यात आला आहे. मोहिमेची प्रसिध्दी करण्याकरीता पंचायत समितीस्तरावर दि.१३ व १४ नोव्हेंबर रोजी गावांमध्ये कोतवालांमार्फत दवंडी देण्यात येणार आहे. तसेच १७ ते २ डिसेंबर या कालावधीत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले असल्याचे डॉ. पराडकर यांनी सांगितले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३३९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# कौंडण्यपुर येथे आ.राजेश वानखडे यांचा महापूजेत सपत्नीक सहभाग

## -कार्तिक मास निमित्त दहीहंडी सोहळा हर्षोल्लासात संपन्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ कन्या श्री रुक्मिणी मातेचे माहेरघर असलेल्या कौंडण्यपुर येथे कार्तिक मासानिमित्त आयोजित साप्ताहिक उत्सवात आज आमदार राजेश वानखडे यांनी सपत्नीक सहभाग घेतला. प्रातःकाळी त्यांनी माता विठ्ठल रुक्मिणीची महापूजा केली आणि अमरावती जिल्ह्यातील नागरिकांच्या तसेच शेतकऱ्यांच्या सुख-समृद्धीची मनोकामना केली. कौंडण्यपूर येथे कार्तिक पौर्णिमेला आणि प्रतिपदेला दहीहंडीचा सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो. हा सोहळा हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत होतो आणि या सोहळ्याची शतकानुशतके परंपरा आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या कार्तिक मास उत्सवाचा भाग म्हणून, हा सोहळा साजरा होतो. आज [illegible] प्रतिपदेनिमित्त आयोजित दहीहंडी सोहळा हजारो वारकऱ्यांच्या व पालखी व दिंड्यांच्या उपस्थितीत मोठ्या भक्तीभावाने साजरा झाला. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील कार्तिक मास उत्सवाचा हा एक महत्त्वपूर्ण भाग असून, दहीहंडी सोहळ्याची शतकानुशतके जुनी परंपरा आहे. या सोहळ्यात सालाबादप्रमाणे नागरिक उत्साहाने सहभागी झाले आणि भक्तिमय वातावरणात



दहीहंडी सोहळा संपन्न झाला. मंदिर परिसर वारकऱ्यांच्या जयघोषाने दुमदुमला.आरती राजेश वानखडे यांनीही या सोहळ्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी माता रुक्मिणीच्या चरणी तिवसा मतदारसंघातील नागरिकांच्या मांगल्याची प्रार्थना केली. त्यांच्यासह उपस्थित भक्तांनी मंदिरात पूजा-अर्चना करून आशीर्वाद घेतला.'माता रुक्मिणीचे माहेरघर कौडण्यपूर हे विदर्भाच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. कार्तिक मासातील हे उत्सव भक्ती आणि एकतेचे प्रतीक आहेत. शेतकरी, नागरिक आणि संपूर्ण जिल्ह्याच्या कल्याणासाठी मी माते समोर प्रार्थना केली आहे.' असे प्रतिपादन याप्रसंगी आमदार राजेश वानखडे यांनी केले.या सोहळ्याला स्थानिक नागरिक, वारकरी संप्रदायाचे मानकरी, मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्सवाची सांगता प्रसाद वितरणाने करण्यात आली.

# व्यंकटेश नेरकर 'राज्यस्तरीय आर्टिस्ट ऑफ द इयर - २०२५' पुरस्काराने सन्मानित

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन (अमरावती) या महाविद्यालयाच्या योगशास्त्र विभागातील एम.ए.(योगशास्त्र) प्रथम वर्षाचा विद्यार्थी व्यंकटेश नीता नारायण नेरकर याला अंबाई बहुउद्देशीय संस्थे कडून 'राज्यस्तरीय आर्टिस्ट ऑफ द इयर - २०२५' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२४/२५ मध्ये व्यंकटेशने केंद्र शासनाद्वारा आयोजित 'राष्ट्रीय युवा महोत्सव' मध्ये सहभाग घेऊन आपल्या महाविद्यालयाचे व विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी करत अनेक कला प्रकारांमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले होते. याचबरोबर कर्सिव्ह हस्ताक्षरमध्ये त्याने




जागतिक स्तरावर विश्वविक्रम केले आहे व याची नोंद 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये देखील झाली आहे. आपल्या अतिशय सुंदर हस्ताक्षरामधील देवनागरी लिपी, इंग्रजी लिपी, कर्सिव्ह लिपी, व कॅलिग्राफीसाठी त्याला आजवर अनेक पुरस्कार मिळाले आहे. यासोबतच कला जोपासत असताना तो सामाजिक कार्य देखील आजवर करत आलाय. व्यंकटेशने अनेक गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत सुंदर हस्ताक्षराचे प्रशिक्षण शिबिर घेऊन प्रशिक्षण दिले आहे व त्यांच्यात लिहिण्या-वाचण्याची व शिक्षणाची आवड निर्माण केली आहे.

एकंदरीत व्यंकटेश ची कलाक्षेत्रातील अद्वितीय कामगिरी व त्याचे प्रचंड कलाप्रेम लक्षात घेता यंदाचा 'राज्यस्तरीय आर्टिस्ट ऑफ द इयर' पुरस्कार त्याला प्रमुख कलावंत मान्यवरांच्या हस्ते बुधवार दि. ५ नोव्हेंबर रोजी स्थानिक वामनराव जोशी सभागृह येथे एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. सदर पुरस्काराचे श्रेय त्याने आपल्या कलाशिक्षक गुरुवर्य राजेश निंबेकर व आपल्या महाविद्यालयातील प्रा. संपदा शिरभाते, प्रा. अर्चना देशपांडे, प्रा. सुषमा शिरभाते, प्रा. संदीप मांडळे, प्रा. सागर हाटे, आदी शिक्षकांना दिले आहे. भविष्यातही कलाक्षेत्रात सुवर्ण कामगिरी करण्याची इच्छा त्याने व्यक्त केली.

व्यंकटेश च्या या यशाबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे. श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, सचिव डॉ.माधुरी चेंडके, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, योगशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुनील लाबडे आदी शिक्षक-प्रशिक्षक, मित्र-मैत्रिणी, आई-वडील, इत्यादी सर्वांनी त्याचं अभिनंदन करत भावी वाटचालीसाठी त्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

# आपत्ती निवारण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनावर भर : आ. सुलभा खोडके

## -वृंदावन कॉलनी येथील नाल्याचा होणार कायापालट

### -नाला संरक्षण भिंत व पूल निर्माण कार्याचे थाटात भूमीपूजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात रस्ते, सांडपाणी व्यवस्था, जलपूर्ती, सौंदर्यीकरण सारख्या पायाभूत सुविधांची पूर्तता करत अमरावती शहरातून वाहणाऱ्या लहान -मोठ्या नाल्यांवर चांगली सुविधा निर्माण करून संभाव्य आपत्ती निवारण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्यावर आपला गांभीर्याने भर आहे. यासाठी कुठलाही निधी कमी पडू देणार नाही. अशी ग्वाही आ. सुलभा संजय खोडके यांनी दिली. प्रभाग क्रमांक २ गाडगे नगर -पीडीएमसी अंतर्गत वृंदावन कॉलनी येथील सदशांती बालगृह जवळील नाल्याला संरक्षण भिंत व पुलाचे बांधकाम करणे या कामाचे भूमिपूजन आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार महोदयांनी विकास कामांच्या नामफलकाचे अनावरण करून भूमिपूजनाची औपचारिकता साधली.



कॅम्प भागाला जोडणाऱ्या वृंदावन कॉलनी येथील नाल्याची प्रचंड दुरावस्था झाली होती. या भागात शासकीय वसाहती तसेच शाळा - बालगृह व रहिवासी लोकवस्ती आहे. पावसाचे दिवसात नाल्याचे पाणी हे ओसंडून वाहून नागरिकांच्या घरामध्ये शिरत होते. रस्त्यावर सुद्धा पाणी साचत असल्याने रहदारीला सुद्धा अडथळा निर्माण होत होता. दरम्यान आ. सुलभा खोडके यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन साधारणतः १ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे आता सदशांती बालगृह जवळील नाल्याला संरक्षण भिंत व पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. याबद्दल स्थानिक नागरिकांच्या वतीने आ. सुलभा खोडके व यश खोडके यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे. या कार्यक्रमाप्रसंगी कुमुदिनी इंगळे, राजेंद्र खोरगडे, मोहन क्षीरसागर, प्रमोद महल्ले . योगेश सवई, अंकुर डवरे, बादल काळे ,आदींसह गाडगे नगर -तपोवन वृंदावन कॉलनी, गणेडीवाल लेआऊट, चिलमछावणी आदी भागातील नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

# विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयात मूळव्याध तपासणी शिबिर २२ पासून

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचलित विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती तर्फे जागतिक मूळव्याध दिन निमित्त मूळव्याध तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दिनांक २२ ते २८ नोव्हेंबर दरम्यान दररोज सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे.

या शिबिरात अल्प दरात अत्याधुनिक लेझर तंत्राद्वारे शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला आणि आयुर्वेदिक उपचारांचे मार्गदर्शन दिले जाणार आहे.

या उपक्रमाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चोपकर यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. शल्यतंत्र विभाग प्रमुख डॉ. मंजुषा काळमेघ शिबिराचे समन्वयक असून, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली वानखेडे देखील शिबिरात सहभाग नोंदवत आहेत.

सहाय्यक म्हणून डॉ. प्रियांका गर्जे, डॉ. मोनिका पाटील, डॉ. राहुल ठाकरे, डॉ. अश्लेषा माने, डॉ. वैश्नवी राऊत, डॉ. वैष्णवी नागपुरे, आणि डॉ. किरण मसने कार्यरत राहणार आहेत.

या शिबिरातून जनसामान्यांना मूळव्याधासंबंधी योग्य निदान, उपचार आणि आधुनिक लेझर तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# श्री संकट मोचन विजय हनुमान मंदिरात छप्पन भोग उत्सव

**अमरावती/प्रतिनिधीः-**श्री संकट मोचन विजय हनुमान मंदिरात छप्पन भोग उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

रामायणाचे अखंड पठण ४० वर्षांपासून अमरावतीतच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अक्षय नवमीला शुक्रवार (दि.३१) सायंकाळी ७ वाजता श्री हनुमान व महादेवाची भव्य आरती करण्यात आली. अन्नकुट महाप्रसादाचे वाटप सुरू झाले. महाप्रसादाचे वाटप मध्यरात्रीपर्यंत अखंडितपणे सुरू होते. संकट मोचन विजय हनुमान मंदिराचे अध्यक्ष महंत श्री मदन मोहनदासजी महात्यागी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दिपक नवाथे, डॉ. काळपांडे, गजानन पाठक, प्रेम जोड, पवन नवाथे, किशोर दोडे, आनंद कलंत्री, रमेशचंद्र सोनी, अशोक जाजू, महेंद्र गांधी, आनंद कडू, जेमंगेश मिटकरी, सूर्या इंगोले, आणि आदित्य यांचा प्रमुख सहभाग होता. या कार्यक्रमाला लोखंडे, दुर्गेश वलांडे, स्वस्तिक ठोसर, प्रशांत खोब्रागडे, हेमंत प्रजापती, निखिल वानखडे, हर्षद कुंदे, प्रेम अण्णा रतन बानेवार, भूषण ठाकरे, गजानन वानखडे, करण ठाकूर आदींची प्रमुख उपस्थिती होती. खासदार राज्यसभा डॉ.अनिल बोंडे, आमदार रवि राणा, सुनील राणा, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ



समाजसेवक लप्पी भैय्या जाजोदिया, ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ प्रशांत देशपांडे, यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली श्री हनुमानाच्या समस्या व व्यवस्थेवर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमास सुनील डुब्बरवार, अतुल भिलकर, पंकज शंकर अंकुश पंचबुद्धे शरद सोनकुसरे, अशोक यादव मनोज, पंकज जाधव, बाळासाहेब भरणे आदी संयोजक होते.

# कत्तलीकरिता जाणाऱ्या २६ गोवंशाची सुटका

## -अकबर नगर, अन्सार नगर व गवळीपुरामध्ये कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर गेट पोलीस ठाणे हद्दीत अकबर नगर, अन्सार नगर व गवळीपुरामध्ये पोलिसांनी कारवाई करून कत्तली करिता जमा करण्यात आलेल्या २६ गोवंशाची सुटका केली. टाटा एक्स गाडी सह ८ लाख ४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त गोवंशला सुरक्षेच्या दृष्टीने दस्तूर नगर येथील कोंडवाडा येथे दाखल करण्यात आले. ७ आरोपींवर गोवंश कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागपूर गेट ते पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार यांना माहिती मिळाली की, हद्दीत



अवैध गोवंश वाहतूक व गोडाऊनमध्ये कत्तलीकरिता जमा केले आहे. यावरून डीबी पथकाने मंगळवारी अकबर नगर येथे टाटा एक्स एमएच २७ बीएक्स ४८६८ ला थांबून दोन गोवंशाची सुटका केली तसेच अन्सार नगर येथे टाटा एक्स एमएच २७ बीएस ४८०३ मधून पाच गोवंश जनावरांची सुटका केली.गवळीपुरा भागात एका गोडाऊन मध्ये कत्तलीकरिता जमा केलेले १९ गोवंश मिळून आले. ३ वेगवेगळ्या कारवाई मध्ये २६ गोवंशाला मुक्त करून २ टाटा एक्स वाहन सह ८ लाख ४ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गोवंशला दस्तूरनगर कोंडवाडा येथे दाखल करून ७ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे ,सहाय्यक आयुक्त राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार, डीबी पथक प्रमुख इरफान रायलीवाले,पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र पिंपळे, प्रवीण ढेगेकर, सागर पंडित, विक्रम नशीबकर, मोहन चव्हाण, शफिक कुणाल बर्डे ,राहुल रोडे, दानिश शेख, आनंद ठाकूर, शेखर गायकवाड यांनी केली.

# शोभा नगर येथील माँ दुर्गा देवी मंदिरात शिवपुराण महापारायण





**अमरावती/प्रतिनिधीः-** शोभा नगर येथील माँ दुर्गा देवी मंदिरात शिवपुराण महापारायणाचे आयोजन करण्यात आले होते. ५० हून अधिक महिलांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. कार्तिक महिन्याच्या शुभ दर्शनासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पठण समारंभात उपस्थित असलेल्या सर्व महिलांना बक्षिसे वाटण्यात आली. तरुण उद्योजक अर्चितभैया चंद्रकुमार जाजोदिया, सिमाताई दातारकर आणि कमल किशोर मालानी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे वक्ते (प्रेरणादायी स्रोत) राजन अदातिया होते.

आयोजक रोशनी दुबे ,मनोज पोकाडे, कमला ठाकरे, बाबा निखारे, अरुणा इंगळे, रोशन दुबे, राजू दुबे, प्रियांका दुबे, सरला टोंक्षे, कल्पना ठाकरे, सरिता ठाकरे, किती शर्मा, वंदना जैस्वाल, शोभा ठाकूर, विद्या शर्मा, कांताबाई वळसे, शालिनी वाळके, निखारे, निखारे, निखारे, निखारे, निखारे आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सावरकर, गंगा शेवणे, कालिंद्री राऊत, कमला सरोदे, लीला बोरकर, खरिपकर, सरला निखारे, वंदना देशमुख, रत्नमाला शेवतकर, शोभा धनगरे, जया डोंगरे, मनीषा माणिकपुरे, सपना साहू, बेबी गेडाम यांनी विशेष सहकार्य केले.

# विदर्भ साहित्य संमेलनात राजा बढे स्मृति निमंत्रितांचे कविसंमेलन

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** १ व २ नोव्हेंबर, २०२५ रोजी जांब-यवतमाळ येथे डॉ. रमाकांत कोलते यांच्या अध्यक्षतेखाली ६९ वे विदर्भ साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते.

या साहित्य संमेलनांतर्गत प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली राजा बढे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ निमंत्रित कवींचे कविसंमेलन पार पडले.

या कविसंमेलनात प्रमोदकुमार अणेराव (भंडारा), प्रभू राजगडकर (नागपूर), सुरेश रामटेके (चंद्रपूर), युवराज गंगाराम (गोंदिया), अमर पवार




(यवतमाळ), स्वप्नील मानकर (यवतमाळ), गणेश भाकरे (सावनेर), बळवंत भोयर (नागपूर), प्रसेनजित गायकवाड (नागपूर), अविनाश पोईनकर, पूनम चव्हाण (नागपूर), प्रभाकर तांडेकर (कुही), वर्षा रंदई (नागपूर), आरती झोटिंग (कळंब), ज्योती चव्हाण (यवतमाळ), जयश्री दाणी (नागपूर) मंगेश चौधरी (यवतमाळ), संजय तिजारे (मांडळ), ज्योत्स्ना कदम (नागपूर) गजानन फुसे (वाशिम), धनराज खानोरकर (ब्रह्मपुरी), सिंहल मेंढे (वर्धा) राम वासेकर (गडचिरोली), गोपाळ मापारी (अकोला), उज्ज्वला सोळंके (अमरावती), जनार्दन राठोड (जांब), वनमाला भालेराव (आर्णी), नरेंद्र गंधारे (हिंगणघाट), हर्षल चव्हाण (घाटंजी), कविता बेदरकर (वर्धा), प्रमोद पंत (मूर्तिजापूर), संदीप राऊत (बुलडाणा), विनोद बुरबुरे (यवतमाळ), जनार्दन गावंडे (यवतमाळ), हेमंतकुमार कांबळे (यवतमाळ), शांतरक्षित गावंडे (नेर) इत्यादी निमंत्रित कवी व कवयित्रींनी सहभाग घेतला. काही अपवाद वगळता सहभागी बहुतांश कवी व कवयित्रींनी आपल्या ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांचे दुःख, जुन्या-नव्या स्त्री-जाणिवा, समकालीन सामाजिक-राजकीय भीषण वास्तव आणि आंबेडकरी जाणिवा प्रकट करणाऱ्या कविता प्रकर्षाने सादर केल्या. त्या कवितांतून कवींचा बाणा व निर्भिडपणा अभिव्यक्त झाला. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन डॉ. शांतरक्षित गावंडे यांनी केले.

**CHANGE IN NAME**

My old name was Saufun Misbah Mohammad Zuber

My new name is Aiza Hurain Ikhlas Ahamad

**नावात बदल**

**जुने नांव**
**गजानन सुरेश ठोंबरे**
**नविन नांव**
**गौरव सुरेश ठोंबरे**
**मो.नं.८०८७१६९१३५**

**CHANGE IN NAME**

My old name was Ikhlas Ahmad Abdul Ghani

My new name is Ikhlas Ahamad Abdul Ghani

**नगर परिषद कार्यालय, घाटंजी, जि.यवतमाळ**

**जाहीर सूचना**

**नगर परिषद कार्यालय, घाटंजी सार्वत्रिक निवडणूक-२०२५**

**घाटंजी नगर परिषदेच्या सन २०२५ मध्ये होणा-या निवडणुकीसाठी मतदान केंद्र निहाय मतदार याद्या नगर परिषदेच्या सूचना फलकावर तसेच कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येत आहे.**

(राजु एम.घोडके)
मुख्याधिकारी,
नगर परिषद,घाटंजी

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका चांदूर बाजार यांचे कार्यालय,
अमरावती रोड तहसील कार्यालयाचे आवारात चांदूर बाजार
ई-मेल : arcs.amr.chandurba@gmail.com
जा.क्र.सनिचांबा/नियमन/तोंडगांव सेवा/तक्रार/५२८/२०२५ दिनांक ७/११/२०२५

प्रति,
१. श्रीमती शोभाताई गंगाधरराव आवारे, २. श्री.भिमराव चंद्रभानजी ईचे, ३. श्रीमती सुमनबाई विश्वासराव कडू, ४. श्रीमती आशाबाई माणिकराव कडू, ५. श्री.रमेश वामनराव काकडे, ६. श्रीमती अलका रमेशराव काकडे, ७. महम्मद सादीक महम्मद अकबर, ८. श्री.प्रेमनाथ जगन तंतरपाळे, ९. श्री.रमेशचंद्र पुरणचंद्र शर्मा, १०. श्री.सतीश मधुकर खडके, ११. श्री.रविंद्र मधुकर खडके, १२. श्री.प्रविण विजय खडके, १३. श्री.प्रशांत सुरेश खडके, १४. श्री.नंदकिशोर भगवंत नांदुरकर, १५. श्री.नंदु रामराव धाकडे, १६. श्री.किशोर आनंदराव सोनखासकर, १७. श्री.भदुजी केळाजी तंतरपाळे, १८. गोपाल रमेश कुरवाडे.

**विषय -महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ११ व २५-अ अन्वये खालील सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याबाबत.**

**संदर्भ** - १. श्री.प्रमोद लक्ष्मणराव आवारे, दिनांक २१.०३.२०२५ रोजीचा अर्ज
२.श्रीकांत साहेबराव कडू व ईतर-३ यांचा दिनांक ७.४.२०२५ रोजीचा अर्ज
३.श्री.अनिल भाऊराव ठाकरे यांचा दिनांक २.०३.२०२५ रोजीचा अर्ज
४.या कार्यालयाचे पत्र ७.४.२०२५, २८.३.२०२५, १५.९.२०२५
५.या कार्यालयाचे पत्र, २८.०९.२०२५
६.या कार्यालयाचे पत्र १५.०९.२०२५
७.या कार्यालयाचे पत्र १५.०९.२०२५

उपरोक्त विष्याबाबतचा संदर्भीय क्र.१,२,३ अन्वये चा अर्ज या कार्यालयास प्राप्त आहे.

अर्जदार यांचे अर्जात नमुद नुसार सेवा सहकारी संस्था म.तोंडगांव र.नं.१०९४ चे सभासद झालेल्या सभासदांकडे शेती नाही व रहिवासी नाही. अशा सभासदांना संस्थेच्या रेकॉर्डवरुन त्यांचे सभासदत्व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ११ व २५-अ अन्वये सभासदत्व रद् करण्यात यावे असा अर्ज प्राप्त झाला आहे.

वरील संदर्भ क्र.४,५,६,७ अन्वये आपणास या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत सुचित करण्यात आले होते, परंतु आपण उपस्थित झाले नाहीत.

तरी पुनःच्च सदर प्रकरणी दिनांक २१.११.२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता न चुकता या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून ठोस पुराव्यानिशी आपले लेखी म्हणणे सादर करावे.

**सहायक निबंधक**
सहकारी संस्था, चांदूर बाजार

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ६२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### विद्यानिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट स्कूल येथे सेवापूर्ती व सैनिक सन्मान

**लेहेगाव** - विद्यानिकेतन इंग्लिश कॉन्व्हेंट नेरपिंगळाई येथे सेवानिवृत्त शिक्षक भास्कर रावजी आखरे यांचा सेवानिवृत्ती सत्कार व सैनिकाचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. देशभक्तीपर गीत, राष्ट्रीय ध्वजाचे पूजन आणि भारत मातेच्या फोटोचे पूजन आणि हारार्पण माजी सैनिकांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या सोहळ्यामध्ये भाष्करराव किसन आखरे यांचा सेवापूर्ती निमित्ताने स्वागत आणि सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर प्रमिला आखरे आणि गजानन काकडे यांना जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र राज्य मिळाला असल्याने यांचा सुद्धा सत्कार येथे करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने भारतीय सैन्यातील माजी सैनिकांचा सत्कार सोहळा झाला. त्यामध्ये स्व.माजी सैनिक साहेबरावजी मंगळे यांच्या पत्नी सुचिता मंगळे, दीपक खटाळे यांच्या पत्नी रंजर्ना खटाळे, धर्मपालजी मोंढे, संजयभाऊ भोपळे, अनिलजी धुर्वे, गजाननजी बानते, केशव बेहेरे, राघवेंद्र खटाळे, बंडू पैठणकर, सुनील लांडगे, अनिल तायडे, अशोक खटाळे, पंकज इखार, कुलकर्णी इत्यादी माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर विलासी खासबागे (माजी सरपंच ग्रामपंचायत कार्यालय नेरपिंगळाई), निळकंठ यावले (माजी शिक्षण विस्तार अधिकारी) यांचा सुद्धा सत्कार घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान सोनाली नवले (महिला जिल्हाध्यक्ष युवा स्वाभिमान पार्टी तसेच माझी उपसभापती पंचायत समिती मोर्शी) यांनी स्वीकारले, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथींचे स्थान प्रकाश भोपळे यांनी स्वीकारले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक खटाळे (सेवानिवृत्त शिक्षक कॅप्टन एनसीसी दिल्ली परेड) यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये अनेक शिक्षकांनी भाष्कर आखरे यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांच्याविषयी मनोगत आणि गीत सादर केले. या कार्यक्रमांमध्ये शिक्षक शिक्षिका आणि माजी सैनिकांनी मोठ्या प्रमाणात आपली उपस्थिती दर्शवली आणि मोठ्या उत्साहामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.




### गणेश रेखे यांची नियुक्ती

**खल्लार**-दर्यापूर येथिल अ. भा. मराठा महासंघाचे अमराती जिल्हा कार्याध्यक्ष गणेश रेखे यांची अ.भा. मराठा महासंघ अमरावतीचे अध्यक्ष भानुदास पाटील बोदडे यांनी मार्गदर्शक पदी नियुक्ति केली आहे. श्री दत्त मंदिर, दर्यापूर येथे नुकतीच मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची समन्वय बैठक पार पडली. या बैठकीत समाजाचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक,राजकीय उत्थानाचे दृष्टिने विविध अंगाने चर्चा करण्यात आली. या बैठकिला प्रामुख्याने महानगरचे कार्यकारी अध्यक्ष अनिल उपाख्य अण्णासाहेब धोटे, प्रसिद्धी प्रमुख प्रमोद धोटे, उपाध्यक्ष गजेंद्र पाथरे,कार्यकारी सदस्य व्ही. बी देशमुख, दर्यापूर तालूकाध्यक्ष अनिल गावंडे दर्यापूर, शहर अध्यक्ष राजाभाऊ तराळ,तालुका सरचिटणीस सागर गिर्हे, शहर सरचिटणीस धर्माळे पाटील उपस्थित होते.

### श्री.संत नानागुरू महाराज पुण्यतिथी

**लेहेगाव** - मोर्शी तालुक्यातील शिरखेड येथील श्री संत नानागुरू महाराज पुण्यतिथी प्रित्यर्थ यावर्षीही ५ ते १२ नोव्हेंबरपर्यंत दररोज श्री विठ्ठल कथा ज्ञानयज्ञ भागवत कथा सप्ताहाला सुरुवात होत आहे.कथा प्रवक्ते ह.भ.प. कैलाश महाराज चांदूरकर, अमरावती यांच्या मधुर वाणीतून श्री विठ्ठल कथा ज्ञानयज्ञ भागवत कथा सप्ताहाला सुरवात झाली आहे. तसेच ५ ते ११नोव्हेंबरपर्यंत दैनंदिन कार्यक्रम सकाळी काकड आरती, दुपारी श्री संत नानागुरू महाराज ग्रंथपारायण, सायंकाळी हरिपाठ, भागवत कथा आणि साप्ताहिक भजनी तीर्थस्थापना व विनापूजन गंगा व सुधाकर गोमकाळे यांच्या हस्ते करण्यात येत आहे.१२ नोव्हेंबरला सकाळी ९.३० ते ११.३० नीलेश महाराज तट्टे महाराज यांचे गोपालकाल्याचे कीर्तन तसेच श्रीरामजी बनसोड, यांचे वैष्णव पूजन व दुपारी १२ ते १ लोटांगण तसेच श्रींची मिरवणूक,दुपारी चार वाजता महाप्रसाद होईल. श्री विठ्ठल कथा ज्ञानयज्ञ भागवत कथा व १२ नोव्हेंबर रोजी लोटांगण आणि महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, अशी विनंती शिरखेड येथील श्रीसंत नानागुरू महाराज विश्वस्त मंडळाने केली आहे.



# भाजपा कार्यालयात सामूहिक ‘वंदे मातरम’ गायन कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

वंदे मातरम् या राष्ट्रगानला १५० वर्षे पूर्ण झाले असून देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशभरात मोठ्या थाटात ’वंदे मातरम् १५०’ हे अभियान राबविण्याची सूचना दिलेली आहे.

या अंतर्गत भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. तीमध्ये स्थानिक भाजपा राजापेठ अमरावती कार्यालयात भारत माता पूजन करून सामूहिक राष्ट्रगान ‘वंदे मातरम’ हा कार्यक्रम झाला. प्रा. रविंद्र खांडेकर यांनी राष्ट्रगान म्हंटले स्वातंत्र्यपूर्व काळात १८७५ मध्ये बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी या



गीताची रचना केली होती, अनेक क्रांतिकार्यांना प्रेरणा देणारे हे गीत ठरले, त्यामुळे आता संपूर्ण देशात हा कार्यक्रम विविध स्तरावर साजरा केला जाणार आहे. या अभियानाचे संयोजक म्हणून रार्धा कुरील, तसेच सह संयोजक म्हणून सुरेर्खा लुंगारे, व मिलिंद बांबल यांना जबाबदारी देण्यात आली आहे. कार्यक्रमात व्यासपीठावर भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ नितीनजी धांडे, प्रदेश सचिव जयंत डेहनकर, अमरावती शहर जिल्हा महामंत्री बादल कुळकर्णी, ललित समदुरकर, राधा कुरील, माजी पक्षनेता सुनील काळे, माजी स्थायी समिती सभापती सचिनजी रासने सुरेखा लुंगारे, युवा मोर्चा अध्यक्ष विक्की शर्मा उपस्थित होते. तसेच यावेळी कार्यक्रमाला मंडळ अध्यक्ष संतोष कावरे उमेश निलगिरे, प्रफुल बोके, मनीष चौबे, सचिन नाईक,अमोल थोरात, भारती गुहे, उपाध्यक्ष संजय तीरथकर, मंगेश खोंडे, संध्यर्ा टिकले, सुनील साहू, कुसुम साहू,राजू राजदेव, राजू मेटे, श्रीकांत धानोरकर, श्याम पाध्ये, किशोर जाधव, राजेश आखेगावकर, प्रमोद राउत, प्रदिप सोळंके, मनोज काळे, राजू कुरील,सदू पुंशी, लता देशमुख, रिता मोकलकर, सविता भागवत,जया मोहोरे, ज्योती मेघवानी, लविना हर्षे, मेघा हिंगासपुरे, तृप्ती वाठ, अलका सप्रे, .बरखा बोजे, शिल्पा पाचघरे, सचिन डाके,रोशनी वाकळे, श्रद्धा गहलोत, रविकांत कोल्हे, योगेश वानखेडे, रश्मी नावंदर, राजेश किटुकले, श्रीकांत फणसे, विजय कुळकर्णी, अपूर्वा केवले, सुधीर वाघ,आकाश पाटील, कीर्तिदीप सराफ, अश्विन राऊत, रमेश टेंभरे, विलास माहोरे, धनराज चक्रे, इत्यादी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वंदे मातरम गीताच्या १५०व्या वर्षानिमित्त नांदगाव हायस्कूलमध्ये

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या ऐतिहासिक पर्वानिमित्त एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), नांदगाव खंडेश्वर यांच्या वतीने स्थानिक नांदगाव हायस्कूलच्या प्रांगणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशभक्तीच्या उत्साहाने आणि देशप्रेमाच्या भावनेने भरलेला हा कार्यक्रम सामूहिक ‘वंदे मातरम’ गायनाने सुरू झाला.

कार्यक्रमाची सुरुवात गायत्री बैस हिने सुमधुर आवाजात वंदे मातरम गीत सादर करून केली. यानंतर विद्यार्थ्यांनी ‘वंदे मातरम’ विषयी जनजागृती करणारी एक



सुंदर नाटिका सादर केली. या नाटिकेमधून वंदे मातरम गीताचे ऐतिहासिक महत्त्व, स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका आणि आजच्या पिढीने जोपासावयाची राष्ट्रीय भावना प्रभावीपणे व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते श्रीराम बालेकर यांनी वंदे मातरम गीताचा इतिहास, त्यामागील राष्ट्रप्रेमाचा संदेश आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणादायी भूमिका याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य प्रदीप ठाकरे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआयचे प्राचार्य सुरेश मेंढे, वाय.ई.एस. स्कूलचे उपप्राचार्य निलेश देशमुख, मंगेश देवळे, दिनेश शेळके, फटकाळे, प्राध्यापिका वैशाली अंबाडकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास एकनाथराव रानडे आयटीआयचे प्रशिक्षणार्थी, नांदगाव हायस्कूल तसेच वाय.ई.एस. इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन शिल्प निदेशिका रूचिका डोरस यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता आयटीआयचे शिल्पनिदेशक राजकुमार धोटे, तुषार जैन, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, सुरक्षारक्षक धिरज तायडे व धर्मदिप राणेकर यांच्यासह प्रशिक्षणार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## देशभक्तीचा उत्साह, ऐक्य आणि राष्ट्रीय अभिमानाची अनुभूती

### भारत माता स्तुतीच्या गौरव दिनानिमित्त वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन



**अमरावती/का.प्र.**

‘वंदे मातरम’ राष्ट्रगीताच्या १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आज सामुदायिक वंदे मातरम् गीत गायनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या उपस्थितीत ‘वंदे मातरम’ या राष्ट्रभावना जागवणाऱ्या गीताचे उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी एकसुरात सामूहिक गायन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, तहसीलदार विजय लोखंडे, निलेश खटके, तसेच विविध कार्यालयांचे प्रमुख, शासकीय अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. देशभक्तीचा उत्साह, ऐक्य आणि राष्ट्रीय अभिमान यांची अनुभूती सर्वांना यावेळी आली.स्वातंत्र्य सेनानी व थोर कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी क्रांतीची जाज्वल्य ज्योत आपल्या गीतातून सबंध देशभर पेटवली. ‘वंदे मातरम’ या गीत रचनेला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित येथील संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या क्रीडांगणावर हजारो विद्यार्थी, तरुणांच्या उपस्थितीत ‘वंदे मातरम’ गायनाचा सामूहिक सोहळा संपन्न झाला. यावेळी मुलांनी देशभक्तीपर लघू नाटिका सादर केली, तर मुलींनी लेझीम पथक सादर केले.खा. डॉ. अनिल बोंडे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक अनंत सोमकुवर, प्राचार्य अनिल बोरकर, प्राचार्य राजेश शेळके, तहसीलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख वक्त्या पायल किनाके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती, भगिनी निवेदिता मुलींची औद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रहाटगाव येथील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. निदेशक प्रकाश गंडोधर यांनी सूत्रसंचालन केले.

## महानगरपालिकेत सामूहिक गायनातून राष्ट्रभक्तीचा उत्सव

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रभावनेचा आणि देशभक्तीचा अद्वितीय संगम घडवून आणत आज अमरावती महानगरपालिकेत ‘वंदे मातरम’ गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त एक भव्य कार्यक्रम पार पडला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झालेल्या या विशेष सोहळ्यात महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या उत्साहात सहभागी झाले.सर्व उपस्थितांनी एकसुरात ‘वंदे मातरम’ या राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले.

या प्रसंगी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ‘वंदे मातरम’ हे केवळ एक गीत नाही, तर ते आपल्या स्वातंत्र्य संग्रामाचे प्रेरणास्थान आहे. हे गीत आपल्याला राष्ट्रनिष्ठा, एकता आणि त्यागाची जाणीव करून देते. प्रत्येक भारतीयाने या गीताचा अभिमान बाळगावा



आणि त्यातील मूल्ये आचरणात आणावीत.कार्यक्रमाला महेश देशमुख शिल्पा नाईक, योगेश पिठे, डॉ. मेघना वासनकर, श्यामसुंदर देव, दत्तात्रय फिस्के, सागर वानखडे, रविंद्र पवार, भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, डॉ.विशाल काळे, डॉ.अजय जाधव, श्रीकांतसिंह चौहान, डॉ.प्रकाश मेश्राम, अविनाश रघटाटे, अजय विंचुरकर, अक्षय निलंगे, उपअभियंता, अभियंता यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी या प्रसंगी आपल्या भाषणात सांगितले की, ‘वंदे मातरम’ हे केवळ एक गीत नसून भारताच्या आत्म्याचे प्रतीक आहे. हे गीत राष्ट्रप्रेम, एकता आणि त्यागाच्या भावनेचे द्योतक असून स्वातंत्र्य संग्रामाच्या प्रत्येक टप्प्यावर याने असंख्य भारतीयांना प्रेरणा दिली.आजच्या आधुनिक युगात देशभक्तीची भावना जागविणे आणि युवकांना आपल्या सांस्कृतिक वारशाची जाणीव करून देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे या उपक्रमात सहभागी होऊन देशभक्तीचा संदेश दिल्याबद्दल अभिनंदन केले. ‘महानगरपालिका केवळ शहराच्या विकासासाठी नव्हे, तर नागरिकांच्या मनामनात राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजविण्यासाठीही कटिबद्ध आहे,’ असे आयुक्तांनी नमूद केले.

## विद्यापीठात ‘वंदे मातरम्’ गीताचे समूहगान



**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रभक्तीचे प्रतीक ‘वंदे मातरम्’ या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाले आहेत. या निमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीजवळ असलेल्या ध्वजस्तंभाजवळ वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. थोर कवी, तत्त्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी सन १८७५ साली वंदे मातरम् हे गीत लिहिले. भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये वंदे मातरम् गीताचा मोठाच प्रभाव राहिला आहे व आज शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी या गीताला दीडशे वर्ष पूर्ण झाले आहेत. वंदे मातरम् गीताने जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.या पार्श्वभूमीवर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी वातावरण अगदी राष्ट्रभक्तीमय झाले होते. याप्रसंगी विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, संवैधानिक अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले.

## संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व अभ्यास दौरा

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या वतीने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी तीन दिवसीय राज्याबाहेरील प्रशिक्षण व अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा दौरा केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था (CFTRI), मैसूर येथे ११ ते १३ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश अमरावतीतील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना संत्रा पिकावर दुय्यम व तृतीय प्रक्रिया करून मूल्यवर्धन करणे आणि निव्वळ नफा वाढविणे हा आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र यांच्या



सहकार्याने व मार्गदर्शनाखाली या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना या अभ्यासदौऱ्यानंतर स्वतःचे प्रक्रिया युनिट उभारून संत्रा उत्पादनात मूल्यवर्धन करण्याचे आवाहन केले. तसेच प्रशिक्षणातून मिळालेल्या तांत्रिक ज्ञानाचा लाभ इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, अशा सूचनाही दिल्या.या उपक्रमासाठी कृषि विकास अधिकारी मल्ला तोडकर यांनी पुढाकार घेत दौऱ्याचे नियोजन केले असून, आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांचे सहकार्य लाभले आहे. सदर राज्याबाहेरील प्रशिक्षण दौऱ्याची अंमलबजावणी निलेश राठोड, जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती हे करणार आहेत.

## २३नोव्हेंबरला ‘प्रज्ञा प्रबोधिनी’चा सन्मान; डॉ. रमेश गोडबोले स्मृती पुरस्कार वितरण

**अमरावती/का.प्र.**

डॉ. रमेश गोडबोले स्मृती प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्कार यंदा प्रज्ञा प्रबोधिनी या संस्थेला जाहीर करण्यात आला असून, पुरस्कार वितरण समारंभ २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

हा कार्यक्रम श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृहात पार पडणार आहे.या प्रसंगी प. पू. आचार्य जितेंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल, अशी माहिती श्रमिक पत्रकार भवनात आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांनी दिली.प्रज्ञा प्रबोधिनी ही संस्था मागील २२ वर्षांपासून जिल्ह्यातील पारधी समाजासाठी विविध सेवा उपक्रम राबवत आहे. सुमारे ३५ पारधी बेड्यांमध्ये आरोग्य रक्षक योजना, कृषी सहाय्य योजना,



सांस्कृतिक कार्यक्रम, दीपावली मिलन, आरोग्य शिबिरे आणि बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण अशी कामे संस्थेमार्फत केली जात आहेत.अमरावतीत संस्थेच्या ‘विवेकानंद छात्रावास’ या प्रकल्पाद्वारे पारधी समाजातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, निवास आणि भोजनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून सध्या सुमारे ४० विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. प्रज्ञा प्रबोधिनीच्या या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून यावर्षी त्यांना स्व. डॉ. रमेश गोडबोले स्मृती सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.मागील वर्षी हा पुरस्कार संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला प्रदान करण्यात आला होता.पत्रकार परिषदेला प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष प्रा. मोहन काटे, सहसचिव सोपान गोडबोले, विश्वस्त अतुल गायगोले, विवेक घळसासी, रवींद्र देशपांडे, अमित आरोकर, सुबोध क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## प्लॅस्टिक कचरा संकलनाबाबत प्रशासनावर ग्राहक पंचायतचा सवाल

**अमरावती/का.प्र.**

शहरात वाढत चाललेल्या प्लॅस्टिक कचऱ्याबाबत अखिल भारतीय ग्राहक पंचायतने प्रशासनाला जाब विचारला आहे ‘नागरिकांना प्लॅस्टिक कचरा संकलनाची ठोस व्यवस्था प्रशासन केव्हा उपलब्ध करून देणार?’ असा परखड सवाल पंचायतचे विदर्भ प्रांत सचिव चारुदत्त चौधरी यांनी उपस्थित केला.

ग्राहक पंचायत जिल्हा कार्यकारिणी बैठकीत ते बोलत होते. या वेळी जिल्हा अध्यक्ष अशोर्क हांडे, जिल्हा सचिव डॉ. चंदनसिंह राजपूत, व महानगर सचिव किरणी गरीबे




व्यासपीठावर उपस्थित होते. चौधरी म्हणाले, ‘शहरात अनेक ठिकाणी प्लॅस्टिक पिशव्या व कचरा दिसून येतो. नागरिक प्लॅस्टिक कचरा वेगळा जमा करत असले तरी तो घेण्यासाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. ’प्रत्येक वार्डात प्लॅस्टिक संकलनासाठी जाळीचे स्वतंत्र कंटेनर बसवावेत, घराघरातून कचरा गोळा करणाऱ्या वाहनांना ओला, सुका आणि प्लॅस्टिक कचरा स्वतंत्रपणे घेण्यासाठी कठोर निर्देश द्यावेत.या बैठकीत पर्यावरण रक्षण, महिला उन्नती, रोजगार सृजन व विधी आयाम या क्षेत्रातील विविध ठराव मंजूर करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ.चंदनसिंह राजपूत यांनी केले, आभारप्रदर्शन किरणी गरीबे यांनी केले, तर ग्राहक गीत गजेंद्र पाथरे यांनी सादर केले.बैठकीला मधुकर भोपाळे, अनिल वानखडे, भगवानी पाटील, राजेंद्र बिजागरे, प्रभाकर काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिराळा परिसरातील शेतात आढळला जळालेला मृतदेह

## तरुणाला चाकू मारून संपविले

-मृतकाची ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आवाहन





**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव पोलीस स्टेशन अंतर्गत शिराळा परिसरातील एका शेतात आज शुक्रवार ७ नोव्हेंबरच्या सकाळी अर्धवट जळालेला मृतदेह मिळाल्याने खळबळ उडाली आहे. तरुणाचा खून करून पुरावे नष्ट करण्याचा हा प्रयत्न असावा असे संशय पोलिसांना आहे.

माहितीनुसार शिराळा गावातील एका शेतात शुक्रवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास एका वीस ते पंचवीस वर्षीय तरुणाचा अर्धवट जळालेला आणि रक्तरंजित मृतदेह मिळाल्याने खळबळ उडाली. कापसाच्या शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांना हा मृतदेह दिसला. त्यांनी तात्काळ याची माहिती गावातील पोलीस पाटील यांना दिली. पोलीस पाटलाने वलगाव पोलिसांना माहिती दिली.सूचना मिळताच वलगांव पोलीस तत्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. मृतकाचे वय २० ते २५ वर्ष आहे. त्याच्या शरीरावर ☞(पान २ वर)

# परतवाडा आगार प्रमुखाविरोधात पुन्हा दाखल

## -कर्तव्यावर असतांना मद्यधुंद अवस्थेत आढळल्याचा आरोप

-सुरक्षा व दक्षता विभाग अकोलाच्या पथकाची कारवाई



**अचलपुर/प्रतिनिधीः-** राज्य परिवहन महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांचे पथक परतवाडा आगारात आले असता परतवाडा आगाराचे व्यवस्थापक हे मद्यधुंद अवस्थेत आढळले. हा प्रकार समोर आल्याने संबधीत भरारी पथक अधिकाऱ्यांनी वरीष्टांना माहीती देत आगार व्यवस्थापक विरोधात परतवाडा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली .

प्राप्त माहितीनुसार ६ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी विभागीय कार्यालय अकोला चे डोंगरे नामक अधिकारी यांनी परतवाडा बस आगाराला भेट दिली. यावेळी रात्री ९ ते १० च्या दरम्यान त्यांना परतवाडा बस आगाराचे व्यवस्थापक हे मदयधुंद अवस्थेत आढळले . ते मद्यधुंद अवस्थेत असल्याची माहिती मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळाली .त्यानंतर सुरक्षा व दक्षता अधिकारी विभागीय कार्यालयाचे अधिकारी अकोला यांनी परतवाडा आगारात दाखल होऊन संपूर्ण तपास व माहिती घेतली .त्यामध्ये त्यांना परतवाडा बस आगार प्रमुख हे मद्यधुंद अवस्थेत आढळले. त्यानुसार डोंगरे नामक अधिकारी यांनी परतवाडा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली . पोलीसांनी आगार व्यवस्थापकाची आरोग्य तपासणी केली असता त्यात ते दोषी आढळले . त्यामुळे आगार व्यवस्थापक यांच्या विरुद्ध महाराष्ट्र ☞(पान २ वर)

**कामात हलगर्जीपणा केल्याचा फटका-**

एसटी महामंडळात कर्तव्यावर असताना मद्यप्राशन करून कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल अमरावती विभागातील परतवाडा आगार व्यवस्थापक जीवन दत्तात्रय वानखेडे यांना एसटी महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापकांनी निलंबित केले आहे. या बरोबरच त्यांची विभागीय चौकशी करून त्यात ते दोषी आढळल्यास त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची कारवाई सुरू करण्यात येणार आहे. सहकार विभागात तक्रारीची चौकशी पूर्ण होऊन निर्णय

# युती झाली नाहीतर स्वबळावर लढणार- धाने पाटील

## -विधानसभा क्षेत्रातील तीन पैकी एक नगराध्यक्ष पदाची मागणी

**-चांदूर रेल्वेत शिंदे गट शिवसेनेची आढावा बैठक**




**चांदूररेल्वे/प्रतिनिधीः-** धामणगाव विधानसभा मतदारसंघातील शिंदे शिवसेना ची आढावा बैठक चांदूररेल्वे मारोती देवस्थान येथे संपन्न झाली. यामध्ये सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली.या मध्ये धामणगाव, चांदूररेल्वे नगरपरिषद व नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत मध्ये मित्र पक्ष भाजप ने सन्मान जनक युती करत तीन नगराध्यक्ष पैकी एक नगराध्यक्ष पद शिंदे गटाला दिले तर आम्ही युती मध्ये नगरपरिषद निवडणूक लढवणार अन्यथा तीनही ठिकाणी नगराध्यक्ष सह नगरसेवक पदांवर उमेदवार उभे करू, त्यापैकी चांदूररेल्वे मध्ये जयश्री प्रशांत कातकिडे,वैशाली अतुल शिरभाते ह्या दोन महिला उमेदवारांची नावे नगराध्यक्ष पदाकरीता आली असून २० नगरसेवक पदांवर इच्छूक उमेदवारांची यादी बोलाविण्यात आली, अशी माहिती पत्रकार परिषदेत माजी आमदार व शिवसेना उपनेते ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी दिली. यावेळी

जिल्हा प्रमुख आशिष धर्माळे,शाम देशमुख,उप जिल्हा प्रमुख राजेश पांडे, केने गुरूजी,तालुका प्रमुख निलेश तिवारी, ☞(पान २ वर)

# तुटलेल्या विज तारांच्या संपर्कात येऊन ४ गाईंचा मृत्यू

## -दत्तापुर शेतशिवारातील घटना



**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** दत्तापुर शेत शिवारातील एका शेतात विजेच्या तार तुटल्याने त्या जिवंत ताराच्या संपर्कात येऊन ४ जर्सी गाईंचा जागीच मृत्यू झाल्याची घटना आज शुक्रवार ७ नोव्हेंबर रोजी घडली. माहिती नुसार दत्तापूर परिसराला लागुन असलेल्या शेत शिवारात शुक्रवारी अचानक शेतातल्या विजेच्या पोल वरुन जिवंत तार तुटुन खाली पडल्या.त्या जिवंत ताराच्या संपर्कात येऊन दत्तापुर येथील शेतकरी केने पाटील यांच्या शेतात चरणाऱ्या ४ जर्सी गाईंचा शॉक लागून मृत्यु झाला.

विज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप येथील शेतकऱ्यांनी केला आहे. तुटलेल्या ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वेत पहिल्याच दिवशी १७०० अर्ज

## -बायोमेट्रिक अटीमुळे नोंदणी १२०० शेतकऱ्यांचीच

**-शेतकऱ्यांच्या हितावर गदा, अटीमुळे खरेदी प्रक्रियेत गोंधळ !**



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** शेतकरी आधीच अवकाळी पावसाने, उत्पादन खर्चाच्या वाढीने आणि बाजारभावातील घसरणीने हैराण आहेत. त्यात आता शासनाने सोयाबीन खरेदीसाठी लावलेली बायोमेट्रिक पडताळणीची सक्ती म्हणजे जखमेवर मीठ चोळल्यासारखं ठरत आहे. राज्यात सोयाबीनचा हंगाम सुरू असून, बाजारात भाव घसरले आहेत. व्यापारी शासनाच्या हमीभावापेक्षा कमी दराने सोयाबीन खरेदी करीत आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने शेतकऱ्यांना दिलासा म्हणून खरेदी केंद्रे सुरू करण्याची घोषणा केली. मात्र, नोंदणी प्रक्रियेत बायोमेट्रिक अट सक्तीची केल्याने शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये आणखी वाढ झाली आहे. पहिल्याच दिवशी तब्बल १७०० शेतकऱ्यांनी अर्ज सादर केले, पण बायोमेट्रिक पडताळणीअभावी केवळ १२०० जणांचीच नोंदणी पूर्ण झाली. वृद्ध शेतकरी, महिला शेतकरी, तसेच बाहेरगावी वास्तव्यास असलेले शेतकरी हे सर्व जण यामुळे त्रस्त झाले आहेत. ☞(पान २ वर)

# बुरखा परिधान केलेल्या महिलेने ज्वेलर्स दुकानातून दागिने पळविले

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील बस स्थानकासमोरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या सचिन हिरुळकर ज्वेलर्स मध्ये काल ६ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजताच्या दरम्यान एक महिला ग्राहक बुरखा वस्त्र परिधान करून दागिने खरेदी करण्याच्या बहान्याने आली. तिने हातचालाकी करून सचिन



हिरुळकर यांच्या ज्वेलरी मधून सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. सदर महिलेने यापूर्वी सुद्धा दर्यापूरमधिल एका ज्वेलर्स मधून अशाच हातचालकीच्या माध्यमातून दागिने पळविले असल्याचा संशय व्यक्त होत आहे. याबाबत संचालक सचिन हिरुळकर यांनी दर्यापूर पोलिस स्टेशनला घडलेल्या घटनेची माहिती दिली असून पुढील तपास दर्यापूर पोलिस करीत आहेत.

# मनपा आयुक्तांची स्वच्छता मोहिमेअंतर्गत शहरातील विविध भागांची पाहणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेअंतर्गत आज आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सकाळी प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज सकाळी वेलकम पॉईंट, रहाटगाव रोड, नागपूर रोड आणि विभागीय आयुक्त कार्यालय रोड परिसर याठिकाणी स्वच्छतेची स्थिती तपासली. या पाहणीदरम्यान त्यांनी परिसरातील रस्ते, नाले, कचरापेट्या आणि सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करून संबंधित अधिकारी व सफाई निरीक्षकांना आवश्यक सूचना दिल्या.

पाहणीदरम्यान आयुक्तांनी सांगितले की, ’शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग घ्यावा. नागरिकांनी कचरा नियोजित ठिकाणी टाकावा, प्लास्टिकचा वापर टाळावा आणि परिसर स्वच्छ ठेवावा.’

त्यांनी पुढे सांगितले की, शहरातील सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न केल्यास ‘स्वच्छ अमरावती, सुंदर अमरावती’ हे स्वप्न साकार होऊ शकते. यावेळी त्यांनी सफाई कामगारांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न ऐकून घेतले व आवश्यक ती उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने गेल्या काही दिवसांपासून शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा आणि वसाहतींमध्ये विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत कचरा संकलन, रस्ते धुणे, झाडांची छाटणी, ☞(पान २ वर)

# खासदार वानखडे, आ.गजानन लवटेकडून आचारसंहितेचे उल्लंघन

## -दर्यापूर पंचायत समितीच्या इमारतीचे केले भूमिपूजन

**-भाजपच्या नकुल सोनटक्केंची मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार**

**खल्लार/प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या दर्यापूर पंचायत समितीच्या इमारतीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून आदर्श आचारसंहिता लागू झाल्यावर दर्यापूर पंचायत समितीच्या नूतन इमारतीच्या कामाची भूमिपूजन केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यासंदर्भात भाजपच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला असून मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार करत संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता पत्रकार परिषद घेऊन आदर्श आचारसंहिता ☞(पान २ वर)

राष्ट्रवादीची स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला घेऊन आढावा बैठक

# आ.सुलभा खोडके यांनी दिली अमरावती जिल्ह्यातील विस्तृतपणे माहिती



**मुंबई/प्रतिनिधीः-** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे जिल्हा निहाय आढावा बैठका सुरु आहे.आज दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजी अमरावती जिल्हा आढावा बैठकीत स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणूका व जिल्हा परिषद निवडणुकी संदर्भात आढावा घेण्यात आला. या बैठकीमध्ये अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आ. सुलभा संजय खोडके ☞(पान २ वर)

# काँग्रेसतर्फे नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

## -अनेक इच्छुकांनी केली दावेदारी



**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी काँग्रेस पक्षातर्फे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आज अमरावती येथील काँग्रेस भवन येथे पार पडल्या. जिल्ह्यातील अचलपूर, दर्यापूर, चांदूरबाजार, अंजनगाव सुर्जी, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, धारणी, चिखलदरा, वरूड, मोर्शी, शेंदुरजना घाट आदी नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रांतील नगराध्यक्ष, नगरसेवक पदांकरिता उमेदवारांनी ☞(पान २ वर)

# क्षुल्लक वादात तिघांवर चाकूने हल्ला

## -हैदरपुरा परिसरातील घटना





**अमरावती/प्रतिनिधीः-** खोलापुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या हैदरपुरा मध्ये गुरुवारी रात्री क्षुल्लक वादात ३ तरुणांवर प्राण घातक हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. तिघांवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. या हल्ल्यात शाहीन परवीन रफिक शहा (वय ३५), शेख अहेफाज उर्फ पप्पू शेख शफी (वय २१) व शेख आबिद शेख हाफिज (वय २५) जखमी झाले आहे. तिघांमधून एकाची प्रकृती गंभीर आहे. माहिती नुसार क्षुल्लक कारणावरून तिघांवर गुरुवारच्या रात्री चाकूने हल्ला करण्यात आला. यानंतर त्यांना कुटुंबीयांनी जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात दाखल केल्यानंतर रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास सर्जन डॉक्टरला बोलविण्यात आले. पण डॉक्टर एक ते दीड तास उशिरा दवाखान्यात पोहोचल्याने जखमींच्या कुटुंबीयांनी तेथे हंगामा केला. त्याचवेळी दर्यापूर मधून आलेल्या ☞(पान २ वर)

# बालविवाह रोखण्यासाठी लोकप्रतिनिधींची भूमिका महत्वाची | जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** बालविवाह होत असल्यास गावातील नागरिकांना याची माहिती असते. त्यामुळे बालविवाह रोखण्यासाठी प्रामुख्याने मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका आणि लोकप्रतिनिधी यांची भूमिका महत्वाची असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज ‘बालविवाह मुक्त महाराष्ट्र, आपला संकल्प अभियाना’च्या अनुषंगाने बैठक पार पडली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, महिला व बालविकास उप मुख्य कार्यकारी अधिकारी विलास मसराळे, माविमचे जिल्हा समन्वयक डॉ. रंजन वानखडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी उमेश टेकाळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डबले, पोलिस विभागाच्या दिप्ती ब्राम्हणे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, मुलामुलींचा जन्मदर हा समाधानकारक आहे. मात्र काही भागात बालविवाह होत आहे. त्यामुळे ☞(पान २ वर)

# आयटीआय परिसरात इसमाने घेतला गळफास

**अचलपूर/प्रतिनिधीः-** सुलतानपूरा येथील आयटीआय कॉलेजच्या परिसरात एका शेतामध्ये एका ६५ वर्षीय व्यक्तीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना आज ७ नोव्हेंबर रोजी समोर आली आहे .प्राप्त माहितीनुसार सुलतानपूरा येथील आयटीआय कॉलेजच्या परिसरात महादेवराव पाटील यांचे शेताच्या बाजूला मृतात दीपक यादवराव धूर्वे (वय ६५,रा.विलायतपुरा अचलपूर) यांनी गळाफास लावून आत्महत्या केली आहे. त्यांचे अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केले जाणार आहे. या आत्महत्येचे नेमके कारण वृत्त लीहेपर्यंत कळू शकले नाही .पुढील तपास अचलपूर पोलीस स्टेशनचे अधिकारी करीत आहे.

# इयत्ता बारावीच्या परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याची प्रक्रिया सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी.) फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवेदनपत्रे भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होणार असून विद्यार्थ्यांनी त्यांची आवेदनपत्रे संबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत सादर करावीत, असे आवाहन राज्य मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेंतर्गत व तुरळक विषय, आयटीआय विषय घेऊन प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्र www.mahahscboard.in या संकेतस्थळावर भरण्याबाबतच्या विलंब शुल्काच्या तारखांना अंतीम मुदतवाढ देण्यात आली असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. ☞(पान २ वर)